श्रद्धेची पहाट



डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

* श्रद्धेची पहाट *

(खऱ्या सुखाचा कथारूप बोध...)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* श्रद्धेची पहाट

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : जून २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

अनुक्रम

१.	जमिनीवरचा स्वर्ग.....	५
२.	वर्क कल्चर ?.....	१८
३.	तळ्यातली कमळं.....	२५
४.	प्रसाद.....	४२
५.	भरकटलेले प्रवास.....	६९
६.	श्रद्धेची पहाट.....	८२

*

*

सत्य, प्रेम अशा शाश्वत मूल्यांचा सन्मार्ग
जगता येतो,
तसंच तो जगणाऱ्या
यांतल्या अनेक व्यक्तित्वांचं
दर्शन घेण्याचं भाग्यही लाभतं,
हा अनुभव आहे -

- तसंच ते
आपल्यालाही आजच्या काळात
जगता येऊ शकतं
आणि
अशा व्यक्तित्वांचं दर्शन
आपल्यालाही घडू शकतं
या श्रद्धेनं
वाचणाऱ्या आणि जगणाऱ्या
सर्वांना सादर अर्पण...

- सुहास पेठे

१. जमिनीवरचा स्वर्ग

मंगल कार्यालयाच्या दाराशी बाबासाहेब पोचताच अप्पा स्वागतासाठी पटकन पुढं आले. बाबासाहेबांना ते अपेक्षित होतं. त्यात ते वयानं, मानानं मोठे होते, हेही होतं - पण त्यापेक्षाही अप्पांचा आतिथ्यशील व प्रेमळ स्वभाव हीच कारणं त्यांना स्वतःलाही जाणवत होती. कितीही घाईगर्दी असली, कुठंही भेट झाली तरी, अप्पा पुढं होऊन दखल घेणार, नमस्कार करणार - हा अनुभव बाबासाहेबांनाच काय पण इतरांनाही नवीन नव्हता. त्यात कुठलाही दिखाऊपणा नाही, कृत्रिमता नाही. भेटल्याची निखळ दखल. आज तर अप्पांच्या घरचंच लग्न. तेच आमंत्रक म्हटल्यावर प्रश्नच नव्हता.

बाबासाहेबांनी या विचारांतच स्वागत स्वीकारलं. आपल्याच विचारात इकडंतिकडं पाहात ते पुढच्या रांगेत खुर्चीवर कधी जाऊन बसले ते त्यांना कळलंही नाही. आजूबाजूला सगळ्या थरांतले लोक दिसत होते. विशेष करून मध्यमवर्गच. काही प्रतिष्ठित, मान्यवरही होते. पण या कार्याला येताना त्यांचे नेहमीचे उच्चभ्रू भाव ते घरी ठेवून आल्यासारखे वाटत होते. हाही दिखाऊपणा असेल काय, अशी शंका बाबासाहेबांच्या मनात चुकचुकली. दुसऱ्या क्षणी त्यांचं त्यांनाच ओशाळल्यासारखं झालं. त्यांना वाटलं, आपलं मन किती शंकेखोर ! त्याला सरळ म्हणून काही पहाताच येत नाही. त्यांनी पुन्हा एकदा अशा प्रतिष्ठित लोकांकडं निरखून पाहिलं. काहीही कृत्रिमता त्यात नव्हती. उलट अप्पांच्या प्रेमळ-साधेपणाचा तो मानच होता. किंबहुना नेहमीचे मुखवटे दूर ठेवून या साऱ्या परिवारात मोकळेपणानं मिसळायला मिळाल्याचा आनंदच त्यांच्या चेहऱ्यांवर होता.

बाबासाहेबांना मनाशी उगीचच वाटलं की, आपणच जास्त रुबाबात आलो आहोत. चेहऱ्यावर साधेपणा आणायलासुद्धा आपल्याला कष्ट पडताहेत, हेही त्यांच्या लक्षात आलं. खरंच साधं राहाणाऱ्याला किती सहज असेल हे ! तितक्या गर्दीतही तेवढ्यात अप्पा बाबासाहेबांच्या हातात अक्षता ठेवायला आले, सहज बोलून गेले, 'तुमच्यासारख्यांच्या आशीर्वादांच्या अक्षता मिळू देत मुलांना !' अप्पा जितक्या सहज आले, तितक्या सहज निघूनही गेले. बाबासाहेबांच्या लक्षात यायच्या आत. मनापासून आलेल्या अप्पांच्या वाक्यानं प्रफुल्लित होणारे बाबासाहेब नंतर उलट मनातून पुन्हा एकदा अवघडलेच.

मुहूर्ताची वेळ आली. बाबासाहेबांनी सर्वांबरोबर अक्षता टाकल्या. या मंगलाक्षता आपल्याला टाकण्याचा अधिकार कितपत आहे, अप्पांनी दिलेल्या मानाला आपण कितपत पात्र आहोत, अशा शंका आज बाबासाहेबांच्या मनात आल्या. आजूबाजूचं वातावरण आनंदमय होतं, सारे उत्साहात होते. त्या साऱ्याला साधेपणाची, पण तृप्तीची झालर होती. बाबासाहेबांना सारा आनंद कळत होता, होत होता, पण अजूनही फारसा उलगडत नव्हता. पण या निर्मळ आनंदानं त्यांच्या ठाम कल्पना, रुबाबाचे बुरूज, जगाबरोबरच नव्हे तर सतत जगापुढं जाण्याच्या कल्पना, त्यांचा आजवर केलेला पाठपुरावा - यांचा चित्रपट तरळत होता.

आजूबाजूच्या मंडळीतली काही प्रतिष्ठित मंडळी त्यांच्या ओळखीची होती. पण बाबासाहेबांनी स्वतःभोवती स्वतःच घातलेल्या वेगळेपणाच्या नि मोठेपणाच्या कुंपणामुळं कुणी सहज पुढं होत नव्हतं. ओळख देत होते पण दुरूनच. कुठूनही कुठंही आनंदानं मुक्त संचार करीत होते, ते मात्र अप्पा, त्यांच्या भोवतीची माणसंही. 'चला बाबासाहेब, जेवायला येणार ना?' या अप्पांच्या प्रश्नानं ते भानावर आले. तेवढ्या गडबडीतही अप्पांचं

लक्ष होतं. त्यांना जेवायला नेऊन बसवताना तितक्या धावपळीतही अप्पांच्या इतकंच सगळीकडं लक्ष असलेली अप्पांची मोठी मुलगी-जावई येऊन नमस्कार करून गेले. आपण काही वेगळं मुद्दाम लक्षात ठेवून करतो आहोत - असा भावसुद्धा नव्हता. बाबासाहेबांच्या नजरेतून सहसा काही सुटत नसेच. जेवून अप्पांचा निरोप घेताना मनातल्या या सगळ्या उलाघालीपोटी बाबासाहेबांनी अप्पांचे हात हातात घेऊन म्हटलं, 'अप्पा, कार्य उत्तम ! सर्व आनंदात झालं. तुम्ही आता घ्या आठवडाभर विश्रांती. तुमच्या सवडीनं मीच येईन तुमच्याकडं, तुम्हाला भेटायला !'

'छे, छे ! तुमच्या सवडीनं तुम्ही कळवा, मी अगत्य येईन !'

'नाही, नाही, तसं नाही. मलाच तुमच्याशी जरा मोकळेपणानं बोलायचं आहे !' बाबासाहेब.

'वा, वा, तसं असेल तर मला त्यासारखा आनंद नाही. त्यानिमित्तानं तुम्ही घरी याल. या मात्र अवश्य. कळवा !' अप्पा निखळ आनंदानं म्हणाले. बाबासाहेबांच्या मनातल्या विचारचक्राची थोडी कल्पना अप्पांना आली होतीही. चेहऱ्यावर त्याची पुसटशी जाणीव दिसली तरी त्यामुळंही बाबासाहेबांचं मन दुखवेल, हे लक्षात घेऊन त्यांनी कुठला विषय न वाढवता, आनंदी वातावरणात बाबासाहेबांचा निरोप घेतला. शेवटी आठवणीनं विनंतीही केली, 'या मात्र तुमच्या सवडीनं, वाट पहातो.'

त्यातल्या जिव्हाळ्यानं बाबासाहेबांच्या मगाचपासूनच्या नकारात्मक विचारांना विराम दिला. मनाला दिलासा मिळाला. मुळात बाबासाहेब बड्या घराण्यातले. चाळीस वर्षांपूर्वीचे पहिल्या श्रेणीचे इंजिनिअर. परदेशी शिक्षण घेतलेले तेवढेच एक त्या काळात. वडिलांचा वकिलीचा एक नंबरचा व्यवसाय. बाबासाहेबही तितकेच करिअरिस्ट. स्वतःची कंपनी गावात उभी करणारे पायोनिअर. यशाचा आलेख सतत चढताच. सर्व जुन्या तंत्रज्ञानात

ते जसे तेव्हा आघाडीवर होते, तसेच बदलत्या काळाबरोबर संगणकाशी, नवनव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यातही तितकेच आघाडीवर. वयाच्या पन्नाशीतसुद्धा पुन्हा नव्या तंत्रज्ञानासाठी रीतसर नव्या तज्ज्ञ तरुण मंडळींकडं क्लासला जाऊन बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांच्या पिढीशीही स्पर्धा करू शकलेलेही ते पहिलेच. त्यामुळं कर्तृत्वाच्या नि रुबाबाच्या अनेक मजली बिल्डिंगवरून जमिनीवर चालणाऱ्या जगाकडं नकळत तुच्छतेनं पाहाण्याची पिढीजात सवय अधिकच वाढलेली. क्वचित बदल म्हणून कुणाबद्दल, त्याच्या धडपडीबद्दल सहानुभूतीचा कटाक्ष, कधी मदत - मार्गदर्शन ! अप्पा अशा सहानुभूती लाभलेल्यांपैकीच एक !

पण आज अप्पांच्या दारावरची बेल वाजवताना, बाबासाहेबांना गेल्या आठवडाभराच्या विचारमंथनानंतर, अप्पांची आपण आधीच मदत घ्यायला हवी होती, त्यांच्याजवळ मन मोकळं करायला हवं होतं, त्यांच्या सहानुभूतीची आपल्याला गरज आहे - असं मनोमन वाटत होतं. तसे अप्पा त्यांच्यापेक्षा चांगले आठदहा वर्षांनी लहान. पण समजुतीला आणि आनंदाला वय नसतं. लागतो तो मनाचा मोकळेपणा, जिज्ञासा, निरहंकार वृत्ती. अप्पांनी नेहमीच्या आनंदानं दार उघडून बाबासाहेबांचं स्वागत केलं.

आठ दिवसांपूर्वीच त्यांच्या घरी एवढं कार्य पार पडल्याचा, घरावर गडबड गोंधळाचा कुठला परिणाम नव्हता. बाहेर हॉलमध्ये औपचारिक चहापाणी-बोलणं झालं. बाबासाहेबांच्या बोलण्याचा, विषयाचा अंदाज घेऊन अप्पा त्यांना म्हणाले, 'बाबासाहेब, आपण आतल्या खोलीत बसूया का?'

'चालेल. अधिक ठीक राहील.'

आत गेल्यावर बाबासाहेब म्हणाले, 'चिरंजीव अजून आले नाहीत?'

'नाही. आज एक तारीख आहे. दोघंही कामाला बसले आहेत. आता सून आहेच मदतीला. पहिल्या दिवसात आढावा, दुसऱ्या दिवशी

पुढच्या महिन्याचं प्लॅनिंग. गेली दोन वर्षं आता तोच पाहातो आहे. आता या आठवड्यापासून सुनेची मदत होईल. तिला एक-दोन फॅक्टरींचा दोन-चार वर्षांचा अनुभव आहेच. पण त्यापेक्षा तिचं अकाउंटिंग चांगलं आहे. एक बाजू तिनं सांभाळली तरी मदत होईल. एखादी चूक होते - निर्णयात, मॅनेजमेंटमध्ये पण त्यातून शिकतो आहे. अनुभवासाठी त्यामानानं खूप कमी किंमत मोजतो आहे बेटा ! काळजी नाही...!

मध्येच थांबून अप्पा म्हणाले, 'बाबासाहेब, हे सगळं तुमच्याकडून शिकलो मी, तुम्हालाच काय सांगतो आहे !'

त्यांना अडवीतच बाबासाहेब म्हणाले, 'अप्पा, सांगा, तुम्हाला काय सांगायचं असलं तर सांगाच पण ...'

'पण काय ?' अप्पांनी थबकून विचारलं.

'पण.. असं काही नाही.. खरं सांगू अप्पा, मला काही - काही नव्हे बरंच काही, तुम्हाला विचारायचं आहे.. समजून घ्यायचं आहे.. तेही मोकळेपणानं सांगा..' बाबासाहेबांच्या बोलण्यातली तळमळ, खरेपणा अप्पांच्या मनाला स्पर्श करून गेला. ते म्हणाले, 'बाबासाहेब, मला काही सांगता आलं तर ते माझं भाग्यच आहे.. माझ्या उमेदीच्या काळापासून तुमचं मार्गदर्शन, सल्ला, प्रसंगातली मदत... सारं काही मी विसरलो नाही, मला चार शब्दांनीच काय कशानंही मदत करता आली, तरी ती मी मनापासून करीन...'

'त्याची खात्रीच आहे मला. अप्पा, गेल्या आठवड्यातलं तुमचं कार्य पाहिलं. निखळ आनंद अनुभवला. तुम्ही फॅक्टरीत तीसेक वर्षं घातली असतील. आता सोडूनसुद्धा पाचेक वर्षं झाली असतील. पण तुमचा त्यापूर्वीचा सगळा गोतावळा आजही तितक्याच आपुलकीनं जमा झाला होता. आज तुम्हाला साठी गाठायच्या आधीच केवढा आनंद-समाधान

आहे ! आमच्या कंपनीचा व्याप तुम्हाला माहीत आहे. मी जवळपास पन्नास वर्षं यात काढली. आता सत्तरी जवळ आली. थकून जायला होतं. हिच्यामुळं घर उभं आहे. पण एवढं कर्तृत्व उभं करूनही मी मात्र मोडकळीला आलो आहे...'

'मोठ्या मुलाचं तुम्हाला माहीतच आहे. तो अमेरिकेत गेला तो परतलाच नाही. मुलगी तिथलीच. तिला भारत बघावा वाटला तर पॅकेजटूरसारखी ती येणार...'

'असू दे, बाबासाहेब. मधला आहे ना..?' अप्पा.

'आहे. पण आमचे संबंध किती ताणाचे आहेत. सर्वांना करिअर करायला मीच शिकवलं. थोरल्याचं मी आता स्वीकारलं. माझ्याच वृत्तीचा तो परिणाम. पण यानं तरी परतावं. कंपनी सांभाळावी. ते तर सोडाच..तो म्हणतो, माझं मुंबईत उत्तम चाललं आहे. गावात मला काही इंटरेस्ट वाटत नाही. त्यानं आता पस्तिशी ओलांडली. लग्नाचा विषय काढला की, बघू म्हणतो. कन्या तर त्याच्या पुढचीच. मी पुण्यात सेटल्ड् आहे. ती म्हणते, मला लग्नाची काही गरजच वाटत नाही. आज ही दोघं तरुण आहेत. मित्रमैत्रिणी परिवार आहेत. पुढं काय करतील ? एकतर भलत्यासलत्या मार्गाला जातील, नाहीतर, कुठल्याही तडजोडी करायला लागतील...! कन्येचीसुद्धा बत्तीशी झाली.. सॉफ्टवेअर मास्टर आहे.. भरपूर पगार आहे.. पण जिवाला घोर आहे..'

'अप्पा, मला सांगा यांना करिअरसाठी मी अति प्रोत्साहन देण्यात चुकलो की, वेळीच थांबवण्यात चुकलो, काय झालं ?...' बाबासाहेब थांबले.

'तुम्ही तुमची कर्तव्यं केलीत बाबासाहेब, त्यात काय चुकलं...उगीच फार लावून घेऊ नका...' अप्पांनी समजुतीच्या सुरात म्हटलं. पण आज

बाबासाहेब आज सत्य कळावंच या अजीजीनं आले होते. ते उद्‌गारले, 'अप्पा, हा मला वाईट वाटणं, न वाटण्याचा प्रश्न नाही. मला कंपनी चालवता आली. मुंबईतल्या ज्या कंपनीतून मुलगा येणार नाही म्हणतो तिच्या दुप्पट टर्नओव्हर माझ्या कंपनीचा आहे. मुलीला पगार भरपूर आहे, हे खरं. पण तेवढाच काय त्याच्यापेक्षा जास्त पगार असणाऱ्या मुलाबरोबर तिनं लग्न का करू नये, हे मला कळत नाही. मला कंपनीत एक वर्षही मागं बघावं लागलं नाही, व्यवसायाची सारी गणितं उत्तम समजली. पण नाही समजलं, ते हे जीवन... हे यातनामय आहे...'

बाबासाहेब पुढं म्हणाले, 'मी आता हे कबूल करायलाच आलो की, मी म्हटलं तसं काहीतरी चुकलं आहे. कारण आपण आता तीस-चाळीस वर्षं जवळ आहोत, ओळखतो. तुम्ही पंचवीस कामगारांच्या फॅक्टरीवर थांबला. तुम्हाला विस्तार शक्य होता. पंचावन्नाव्या वर्षी तुम्ही फॅक्टरीच्या गेटमधून एखादा वर्कर निवृत्त होऊन संध्याकाळी घरी जावा, तसे त्या संध्याकाळी घरी आला. मला वाटतं तुमची तब्येतीची तक्रार नव्हती. मुलगा फॅक्टरी बघायला लागून दोनच वर्षं झाली होती, तुम्हाला शक्य होतं, मार्गदर्शनही उपयोगी पडलं असतं...होतं ना शक्य..?'

आता मात्र अप्पांना आपली खरी तत्त्वं, विचार सांगितले नाहीत तर, तो मैत्रीचा अपराध ठरेल असं वाटलं ! म्हणून ते किंचित स्पष्ट स्वरात म्हणाले, 'बाबासाहेब विस्तार शक्य होता, म्हणूनच तो केला नाही, मार्गदर्शन-मदत शक्य होती म्हणूनच केली नाही...!'

'मग महत्त्वाकांक्षा ठेवणं चुकतं का ? शक्य असताना न करणं हे कसं बरोबर आहे ?' बाबासाहेबांना सारंच समजून घ्यायचं होतं.

अप्पा म्हणाले, 'बाबासाहेब, शक्य असले म्हणून सगळेच रस्ते चालावेत, बळ आहे म्हणून आपलं गाव गाठल्यावरही चालत रहावं असं

नाही. आपल्याला व्यवसायात निवृत्ती नाही. तशी ती प्रपंचातही नाही, मुलांच्या आयुष्यातही नाही. रेघ आपण ओढायची. थांबायचं. चालल्याचंही समाधान राहातं आणि पोचल्याचंही ! दुसरं, हा दृष्टिकोनातला फरक आहे, पण एक नक्की की, जमिनीवरून चालण्यात नि योग्य ठिकाणी थांबण्यात, वेळी बाजूला होण्यात अधिक आनंद आहे. मला पहिल्या काही वर्षांत लक्षात आलं. पंधराएक कामगारांवर आपण कमवू शकतो तो नफा आपल्या प्रपंचाला पुरेसा आहे. थोडी सुरक्षितता, आकस्मिक अडचणींसाठी अजून पाच, कुणा गरजूंसाठी म्हणून अजून पाच. यापेक्षा जास्त करू जाईन तर इतर कुणा उमेदीच्या नव्या उद्योजकाच्या तोंडचा अर्धा घास काढून घेण्यासारखं आहे. मार्केटमध्ये अजून वाव असेल तर, अजून दोन व्यवसाय-घरं उभी राहातील. दुवा देतील. म्हणून मी पंचवीसवर थांबलो...'

'आता मदत-मार्गदर्शन म्हटलं ना तर, मुलांना ड्रायव्हिंग शिकवणं, येतंय ना पाहाणं एवढंच आपलं काम. मार्गच दाखवायचा म्हटलं तर शेवटपर्यंत गाडीत शेजारीच बसावं लागेल आणि हे तरी त्यांना कुठं अपेक्षित असेल ?'

'काळजी वाटली तर आपल्याकडून हे कधीच सुटणार नाही. म्हणून त्याला म्हटलं, या तारखेला मी तुझ्याकडं सोपवीन. तोवर विचारायचं-शिकायचं-अनुभव घ्यायचा-पुढं तुझ्या हातून होईल ते नफानुकसान मला चालेल...मी माझ्यासाठी, माझ्या या समाजासाठी काही जगणं लागतो, ज्या भगवंताच्या कृपेनं हे यश मिळालं त्याचं देणं लागतो, त्यासाठी काही वेळ, श्रम, पैसा - हे मला द्यायला काही कार्यकाल हवा ना...म्हणून थांबलो. मी बाजूला झाल्याशिवाय हे शक्य कसं होणार ? त्यातून तो स्वतंत्र जबाबदारी कशी घेणार ? त्याला मदतीची गरज पडली तर, काय करावं, हे तो कसं शिकणार ... ?'

'...शिवाय, मी जमिनीवर आहे, त्यांनाही जमिनीवरच राहायला सांगितलं आहे. स्वप्नांत आणि अधिक उंचउंच भराऱ्या घेण्यात चांगलं वाटलं तरी ते दोन तासांच्या सिनेमासारखं. तिकिट संपलं किंवा डोळे दुखायला लागले की, जमिनीवरची पथारीच खरी, नाही तर गच्चीत वाऱ्यावर टाकलेली चटई सुख देते ! इकडं आज दार्जिलिंग, उद्या युरोप...पडद्यावर काय, प्रत्यक्ष काय... शेवटी विमानसुद्धा जमिनीकडं झेपावूनच विसावा घेतं...!'

बाबासाहेब फक्त होकारार्थी मान हालवीत होते.

'खरं सांगू, जमिनीवर चालायचं शिक्षण दिलं म्हणून चिरंजीव आनंदानं मी फॅक्टरी चालवतो म्हणाला. मी स्वातंत्र्य दिलं. विश्वास टाकीत त्यांना मोठं करीत जाणं - ही करिअर-पैशापेक्षा आनंदाला अधिक उपयोगी पडणारी कला आहे. एखाद वेळेस चुकतं. आमच्या कन्येचं नाही का चुकलं? पण विश्वासानं तिनं सांगितलं. पहिल्या महिन्यातच प्रामाणिकपणे घरी येऊन म्हणाली - माझ्या निवडीवर तुम्ही विश्वास टाकला पण माझं चुकलं आहे. मी तिला बोल नाही लावला. कारण जमिनीवर काही खड्डे-दगड, ठेचा असणारच. स्वप्नं बाळगण्यातली चूक तिलाच कळली. तिनं सांगितलेली तीनंही कारणं खरी होती - तिला त्याचं प्रतिष्ठेसाठी व्यसन नि मांसमद्य पटलं नाही, हिला छानछोकीची आवड होती - थोडी वयाप्रमाणं स्वप्नाळूही पण त्याच्या पैसा मिळवण्याच्या कल्पना एवढ्या भस्मासुरी असतील याचीही तिला कल्पना आली नाही. असं जगणं दोघांनाही कठीण. मी समजुतीनं घेतलं. तिच्या चुका माझ्या म्हणून स्वीकारल्या. परतीचा मार्ग स्वीकारला... सगळीकडं जिंकत जाणं, यश येणं कुठं चांगलं असतं.. आता तिला साजेसा साधा - सरळ मुलगा शोधण्यात मदत केली. तिनं शहाणपणानं ती घेतली...'

'होय, परवा ती दोघं नमस्कार करून भेटून गेली. त्याक्षणीही माझ्या मनात हेच आलं. किती समंजसपणे सर्वांनी तुम्ही हे घेतलं... मला वाटतं सूनसुद्धा तुम्ही समजुतीनं...' बाबासाहेब थांबले.

'खरं आहे. ती गरिबाघरची आहे. आमच्याच वर्करची मुलगी. पण मी समजूत, परिपक्वता पाहिली. मला यांच्या निवडीत समजूत दाखवावीच लागली नाही. उलट त्यालाच काय, तिलाही मी दाद दिली... त्यामुळं आम्ही सर्वच आनंदात आहोत...'

इतक्यात 'आज कसल्या आनंदात आहात, अप्पा..' म्हणत त्यांचा मुलगा-सून आले. अप्पांना वाटलं आपला आवाज अकारण मोठा नव्हता ना झाला. पण त्यांच्या घरात एकमेकांनी आनंद निर्माण करायची नि घ्यायची घरातली रीतच होती. मुलाला मात्र आत आल्यावर एकदम बाबासाहेब दिसले. तो पटकन थांबला, पत्नीला खूण केली. दोघांनी पुढं होऊन बाबासाहेबांना वाकून नमस्कार केला. करताकरता तो म्हणाला, 'बाबासाहेब, सॉरी फॉर इन्टरप्शन. आपल्या संभाषणात मी व्यत्यय आणला. आत आपण असाल, ही कल्पनाही नव्हती..सॉरी..!'

बाबासाहेबांच्या डोळ्यांतल्या कडा पाणावल्या होत्या. पण आज त्या चष्म्याखाली लपवाव्या अशा वाटल्या नाहीत. दुसऱ्या क्षणी सूनही पुढं होऊन नमस्कार करीत अजीजीनं म्हणाली, 'सॉरी हं, सर !' क्षणार्धात बाबासाहेबांच्या समोर चमकून गेली ती चार-पाच वर्षांपूर्वी त्यांच्या कंपनीत अर्ज घेऊन आलेली ही मुलगी. तरतरीत. पण ॲम्बिशिअस आणि नॉलेजेबल नाही, असा शेरा देऊन बाजूला ठेवलेला तिचा अर्ज. न दिलेली संधी.

बाबासाहेब मनापासून म्हणाले, 'बाळांनो, इथं सॉरी नाही नि सर नाही !! उलट मीच तुमच्याकडं येऊन अप्पांचा वेळ घेतलाय. तुम्ही भाग्यवान आहात बाळांनो ! तुमच्याजवळ आज इतकी वर्षं अप्पा आहेत.

मला ते 'आज' भेटले ! खोटं नाही सांगत - आमची ती कंपनी, तो रुबाब, आकडेवारी, आलेख, प्रगती - सगळं खूप तकलादू आहे तुमच्या या आनंदापुढं...आमचे ते पाच मजलेसुद्धा ठेंगणे आहेत, तुमच्या या जमिनीवरच्या एक मजली घरापुढं... मला वाटे जमिनीवर कोंदट असतं, वारं खेळत नाही, वरवर जाऊ तसं आणखी वारं-आणखी वारं- पण ते झोंबरं असतं, पेलत नाही, गरजही नसते. जमिनीवरच्या घरात खेळतं तेवढंच वारं पुरतं आपल्याला.. आनंदानं जगायला ! छान. अप्पा, आनंदाचं कवाड किलकिलं का होईना.. दिसलं ! मुलांनो, मला आनंदी व्हायचं, इतरांना कसं करायचं हे जमायला थोडा वेळ लागेल पण आनंदात सहभागी कसं व्हायचं हे तरी आज प्रथम कळलं, तुमचं इन्टरप्शन नाही झालं आनंदात - भरच पडली उलटं !'

मुलंही बाबासाहेबांचा हलका, आनंदी चेहरा बघून घरात वळली - त्यांच्यासाठी काही चहा-कॉफी-खाणं यांची तयारी करण्यासाठी. बाबासाहेब अजून जिज्ञासेच्या मूडमध्ये होते. कन्फेशनच्याही. तो धागा पकडून अप्पा म्हणाले, 'बाबासाहेब, तुमच्या कन्येच्या लग्नाला आधीच वेळ झाला आहे. तिला खरं तर करायचं आहे. नाहीतरी प्रतिष्ठा तकलादूच आहे. मला अडचणींची कल्पना आहे. पण मला वाटतं तिच्या पसंतीच्या मुलाशी करूदे ना, तो गरीब आहे, तिच्यापेक्षा पगारानं कमी आहे. पण जगूदे ना तिला तिचं आयुष्य. मुलगा वाईट नाही...'

तुम्हाला हे कसं कळलं हेही विचारायचं बाबासाहेबांच्या लक्षात राहिलं नाही. अप्पा त्यांना आता थोरल्या भावासारखे वाटायला लागले. मुलगी अप्पांशी संपर्क ठेवून असेल, तर ते बरोबरच आहे, असं नकळत वाटून ते म्हणाले, 'ते खरं आहे. माझा कोट्याधीशपणा मी तिच्या आयुष्यावर का लादावा... आणि तेच खरं कारण असणार आहे ...अप्पा, मी तुमचा

ऋणी आहे. आता लक्षात यायला लागलं आहे एकेक...पण तुमच्यासारखा खरा हितकर्ता मित्र मला देवानं दिला, त्याच्याही उपकारांची जाणीव मला आता जपावी लागेल...!'

अप्पांकडून परतताना बाबासाहेबांना सारं मळभ जाऊन आकाश मोकळं, प्रकाशित व्हावं तसं वाटायला लागलं. अनेक मजली इमारतीच्या लिफ्टमधून जमिनीला पाय लागताच, लिफ्टमधलं गुदमरणं सुटून, रस्त्यावरच्या मोकळ्या हवेत केव्हा पायी फिरतो असं व्हावं तसं वाटलं ! 'आनंद जमिनीवर चालण्यातला - खरा..! कल्पनांतलाही नाही आणि तथाकथित स्वर्गातलाही नाही !'

महिन्याभरानं सकाळसकाळी अप्पांच्या दारावरची बेल वाजली. अप्पांची पूजेनंतर ज्ञानेश्वरीवाचनाची वेळ. मुलानं दार उघडून जरा आश्चर्यानं केलेलं बाबासाहेबांचं स्वागत त्यांना आत ऐकू आलं. मुलानं आत येऊन खूण केली. ज्ञानेश्वरीच्या पानात खूण ठेवून 'आलो माउली' म्हणून श्री ज्ञानेश्वरांना नमस्कार करून त्यांनी ग्रंथ बंद केला.

बाबासाहेबांना अचानक आलेले पाहून आनंद झाला. आश्चर्यही वाटलं. मागोमाग वहिनीसाहेब प्रकृतिमानामुळं हळूहळू पायऱ्या चढत होत्या. अप्पांचा आनंद दुणावला. 'या, या, अलभ्य लाभ ! काय आज सकाळसकाळी कुठं देवाला जाऊन आलात की काय ?'

'देवालाही जाऊन आलो आणि देवालाही आलोय !' बाबासाहेब.

'कोडं नका बुवा घालू. आधी बसा.' अप्पा म्हणाले.

'कोडी काय घालतोय, आम्हीच कोडी करून ठेवली ती सोडवणारा देव भेटला. मुलीचं पुण्यात रजिस्टर लग्न होतंय. इथं स्वागतसमारंभ. पहिली पत्रिका देवाला ठेवली आणि आता आम्हाला जमिनीवर आणून आनंद देणाऱ्या दुसऱ्या देवाला - तुम्हाला !'

'हे फारच झालं बाबासाहेब, लाजवू नका !' अप्पा अजीजीनं म्हणाले.

'खोटं नाही. या दसऱ्यापासून मुलाकडं सोपवतोय कंपनी. तो येतोय मुंबईतनं परत. फुल चार्ज. तोच म्हणतोय निदान हे आर्थिक वर्ष तरी बरोबर रहा. लग्नाला अमेरिकाही येतेय..!' बाबासाहेबांना काय सांगू, काय नको - असं झालेलं बघून वहिनीसाहेबही फार आनंदात होत्या. राहवेना, म्हणाल्या, 'अप्पा, कळलं बरं का आम्हालाही - जमिनीवरचा स्वर्ग - आनंद, समजुतीतला आनंद !'

'पण कळलं तरी बाबासाहेबच ते करू जाणे !' अप्पा सहज आनंदात म्हणाले.

'हेच ते, हेच ते ! यामुळंच तुम्ही आनंदात राहाता !' बाबासाहेबांच्या दिलखुलास कबुलीवर सारेच निर्मळ आनंदानं हसत सहभागी झाले !

*

२. वर्क कल्चर ?

सकाळी आठची वेळ. आबासाहेब प्रभातफेरी करून मोकळ्या हवेत ताजेतवाने होऊन आले. हॉलमध्ये कोचावर जरा विसावले. त्यांची चाहूल लागताच आतून काकूंनी टीपॉयवर गरम चहा आणून ठेवला. घेण्यापूर्वीच त्यांना बाहेरच्या गेटमधून अप्पासाहेब येताना दिसले. आबांना आनंद झाला. ते तिथूनच त्यांना 'या रावसाहेब, या या !' म्हणाले. आबासाहेबांचा आवाज खणखणीत. स्वयंपाकघरात पोचला होताच. त्यामुळं अप्पासाहेब आत येऊन खुर्चीवर विसावण्याच्या आत त्यांचा चहाचा कप टीपॉयवर पोचला होता.

आबासाहेब म्हणाले, 'अहो, काय, आज किती दिवसांनी भेटता आहात ?'

अप्पासाहेब जरा विसावत म्हणाले, 'अहो, आज रविवार !'

'अहो, रावसाहेब असे किती वार मध्ये गेले, चार-पाच तरी असतील, ते रविवारच होते की !' आबा उद्‌गारले.

गळ्यातला मोबाईल समोर टीपॉयवर काढून ठेवीत अप्पासाहेब थोड्या त्रस्त स्वरात म्हणाले, 'अहो, आता तुमचा जमाना नाही, हे आमचे साहेब ! आमच्या बरोबर फिरत असतात अगदी ऑफिसपासून टॉयलेटपर्यंत!'

आबासाहेब हसले. म्हणाले 'खरं आहे !'

आबा आणि अप्पा एकाच ऑफिसमध्ये कामाला होते. आबा निवृत्त झाले. अप्पा अजून व्हायचे होते. मधल्या पाचसात वर्षांत त्यांना पुढची-पुढची प्रमोशन मिळून ते आता आबांच्याही खूप वरच्या हुद्दयावर पोचले होते. म्हणून आबा त्यांना कौतुकानं रावसाहेब म्हणत. एकमेकांनी बरोबर काम केलेली, राहायला शेजारी, चांगले संबंध, घरोबाच.

अप्पासाहेब म्हणाले, 'अहो, चार-पाच नव्हे सहा रविवार गेले. आजचा सातवा रविवार आहे. अजून तरी हे मोबाईलसाहेब ओरडले नाहीत. म्हणून सकाळ-सकाळी तुमच्याकडं आलो. अहो, कामकाज पटपट व्हावं, अचूक व्हावं म्हणून हे संगणकाचं प्रकरण कंपनीनं गळ्यात घेतलं. त्यांच्या सोयी झाल्या, काही प्रमाणात आमचंही काही काम कमी झालं. थोडं जगाबरोबर राहायला हवं तेही ठीक. पण त्याबरोबर हे नवं 'वर्क-कल्चर' आलं-ते भयाण आहे. हे आता कळायला लागलं. आपण पूर्वी कामं करीत नव्हतो का, कधी कधी घड्याळाकडं न पाहाता प्रसंगाला रात्री आठ-आठ, दहा-दहा वाजेपर्यंत आनंदानं कामं केली नाहीत का ? पण ते सारे अपवाद होते, त्यात मॅनेजमेंट काय, वर्कर्स काय दोघांचंही सौजन्य होतं. दोघंही एकमेकांच्या वेळेला धावत होतेच. पण त्यात दडपण नव्हतं, पिळवणूक नव्हती, जादा कामं सांगण्यातसुद्धा हक्क होता, पण तोही आपला माणूस म्हणून. तीच बाजू कामगारांचीही नव्हती का ? तुम्ही किती कामगारांच्या मदतीला, किती वेळा, वार-वेळ-नियमसुद्धा बाजूला ठेवून धावून गेला-आम्हीही पाहिलं आहे. त्यावेळी तरी तुम्ही वार कुठं पाहिला ? असे किती रविवार सुट्ट्या गेल्या असतील ! पण त्यात त्रागा नाही, त्रास नाही-आनंद होता. हेसुद्धा 'वर्ककल्चर' नाही का ?'

'पण हे जे काय अलीकडं चाललं आहे, ते सगळं इम्पोर्टेड आहे. मुंबईत काय, दिल्लीत काय कुठंही बसून मोबाईलवर फोनचा मारा, काम झालंच पाहिजे, उद्याच्या उद्या - संध्याकाळीच. रात्री मेल केल्याशिवाय ऑफिस सोडू नका. हॉलमध्ये, केबिनमध्ये कुठंही रिंग येते. वर वेब कॅम. अहो कंपनीत जाताना ओळखपत्र-कार्डपंच गेलं, अंगठा उठवा. आता तर फॉरिन-कोलॅबोरेशन आणखी नफा - आणखी नफा. दर वर्षी नफ्यात शंभर टक्के वाढ, दोनशे टक्के वाढ. इकडं काम जमत नाही, प्रेशर येतंय-सोडून जा..

असं करीत, किती लोक बाहेर पडले. काम कितीही पट होवो, आहे त्या माणसांवर भागवा. इतर कंपन्या बघा, तिथं कसं मॅनेज होतं. तुम्हाला करता येत नाही. रात्री दहा वाजले तरी वर काही कुणाचं समाधान नाही.'

'कधी तरी डिनर. त्याला जोडून आढाव्याची मीटिंग. आबासाहेब मीटिंग कसली, प्रत्येकाला झोडपतात. सर्वांच्या देखत. इतक्या खालच्या पातळीवर..' बोलताना अप्पासाहेबांचा गळा भरून आला...

एक दोन मिनिटांनी म्हणाले, 'आबा, तुम्हीही वरच्या हुद्द्यावर होता. पण आम्ही पाहिलं आहे, काय कल्चर होतं. काम खूप. चुका होत होत्या, कधीकधी वेळेत होत नव्हतं. एखादा चुकारही असायचा. तुमच्या काय लक्षात येत नव्हतं का ? की, तुम्ही कुणाला बोलला नाहीत ? ते व्यवस्थापनाचं एक कामच आहे. पण तुम्ही दिवसाची कामं आवरल्यावर त्याला एकट्याला केबिनमध्ये बोलावून, त्याच्या अडचणी लक्षात घेऊन, समजावून द्यायचा. मार्ग काढून द्यायचा. कामाचा बॅकलॉग कधीच भरून निघायचा. तोही समजुतीनं. ही कार्यसंस्कृती -वर्क कल्चर. आज उलट, जो सगळ्यांसमोर अधिकाऱ्याचा अधिक पाणउतारा करून शकतो, तो वरिष्ठांच्या दृष्टीनं कौतुकाचा ! त्या काम करणाऱ्यांचं घरदार, स्वास्थ्य, कामं याची पर्वा न करता त्याच्याकडून पिळवणूक करून, कामाची वसुली करून, कमीत कमी वेळात, कमीत कमी माणसांत जास्तीत जास्त फायदा उकळू शकणारा वरिष्ठ 'मोस्ट एफिशिअंट' !'

हे वाक्य पुरं होतंय तोवर अप्पासाहेबांचा समोर ठेवलेला चलध्वनी-मोबाईल वाजू लागला. त्यावर नजर टाकली आणि त्यांनी थोड्या हताशपणे आबासाहेबांकडं पाहिलं, आणि पुटपुटले, '..हेच ते.. आता सातवा रविवार बहुतेक संपला... हे थेट वर्क्स व्हाइस-प्रेसिडेंट..!' म्हणत म्हणत त्यांनी फोन घेतला. तीन चार मिनिटांत फक्त 'येस सर, नो सर, सॉरी सर, यस सर, बाय

फाय पी.एम्. सर.. शुअर सर..' एवढंच ते बोलू शकले. आबा-अप्पा दोघांनीही एकमेकांकडं पाहिलं. दोघांच्याही चेहऱ्यावर, सारं काही लक्षात आल्याचे, असहाय भाव होते. एकमेकांचं एकमेकांना प्रेम होतं. उठलेल्या अप्पांच्या खांद्यावर हात ठेवून आबांनी त्यांना पुन्हा खाली बसवलं.

तेवढ्यात आतून आबांना त्यांच्या नातवाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. दोन मिनिटांत तो मम्मी .. मम्मी.. करीत बाहेर आला. आबांजवळ गेला. तो हमसूनहमसून रडत होता. आबांनी त्याला उचलून मांडीवर घेतलं. थोपटलं. समजूत घातली. 'अरे येईल तुझी मम्मी आत्ता, काय असेल, उशीर झाला असेल.. आणि राजू कुठं गेला ? अरे पप्पा रे, उठले नाहीत का ?'

'पप्पा नाहीये...' नातू रडत म्हणाला.

'अरे, मग आजी नाही का ?'

नाही म्हणून नातवानं नुसतीच मान हलवली. त्याला शांत करीत ते म्हणाले, 'थांब. मी बघतो हं.' आबांनी आत कानोसा घेतला. आजीचं आंघोळ वगैरे आवरणं चाललं होतं. मुलगाही आत कुठं नव्हता. अप्पा हे सारं पाहात स्वस्थ बसले होते. त्यांना थांबायची खूण करून आबा नातवाला उचलून कडेवर घेऊन घरात गेले. त्याचं जरा थोडं तोंडबिंड धुऊन आवरून त्यांनी त्याला दूध दिलं. ते घेतल्यावर तो जरा शांत झाला. तोवर आजी आंघोळ करून आली. तिला सगळं सांगून, त्याला तिच्याकडं सोपवून, ते बाहेर आले.

आबा अप्पासाहेबांना म्हणाले. 'ही अशी परिस्थिती आहे. हे आता नवं होम-कल्चर, गृहसंस्कृती !'

अप्पा म्हणाले, 'पण मुलगा सून गेले कुठं-राजूचं काय... तो काल संध्याकाळी आला नाही की, कुठं बाहेर गेला ?' त्यांच्या सारं नीट लक्षातच येत नव्हतं.

आबासाहेबांनी अप्पासाहेबांना आपल्या शेजारी कोचावर बसवून घेतलं. हळू आवाजात म्हणाले, 'अहो अप्पा, आमच्या राजूचं तेच ते वर्क-कल्चर तुम्ही म्हणाला ते ! मला आत्ता आत हिनं सांगितलं. संध्याकाळी त्याचा फोन आला होता, उशीर होईल. तेवढं सांगून सूनबाई गेल्या ड्यूटीवर!'

'ड्युटीवर ? ती पण नोकरी करते का ?' अप्पा.

'तर ! फार शिक्षण नाही. आहे त्यावर काही चांगली देशी, दिवसाची नोकरी मिळत नाही. मग फार तर रात्रीची बीपीओ ! पगार चांगला. फक्त वेळ-काळ नाही, स्वास्थ्य नाही. रात्री नऊला जाते, सकाळी सातला येते, म्हणजे यायला हवी. पण काम पुरं झाल्याशिवाय नाही. आज आता नऊ वाजायला आले, आत येईल कॅब सोडायला ! ते बिचारं पोरगं रडतंय-मम्मी मम्मी करून, रात्रीचं उठतं...!'

त्यांना अडवत अप्पा म्हणाले, 'आबा पण राजू मोठा इंजिनियर आहे ना, त्यातही सॉफ्टवेअरमध्ये. त्याला काय कमी पगार असेल ? एवढी गरज आहे का तिला रात्रीचा दिवस करायची ?'

'सगळे आखाडे-अपेक्षा या नव्या कल्चरनं बदलल्यात, अप्पासाहेब. आता या घरात काय कमी आहे. हां, ठीक आहे. गाडी मी नाही घेतली. गरजही नाही वाटली. पण तिला हे सारं जुनं वाटतं, याचं काही रिनोव्हेशन करण्यापेक्षा सरळ पॉश लोकॅलिटीत फोरबीएच्क्ेत जायचं आहे. गाडीचं फायनल आहे. फक्त मॉडेलवर एकमत झालं की, ती येणार. मग हप्ते भरमसाठ. शिवाय सारखं शॉपिंग, वीकेंड ट्रिप - सारं भागायला हवं-म्हणून ती नोकरी करणारच म्हणते. तो म्हणतो, भागेल, पण ती म्हणते, 'तिला काही आयडेंटिटी नाही रहात..' आबांचा आवाज आणखीच हळू झाला.

अप्पांचं लक्ष दरवाजाकडं गेलं. सूनबाई शर्टजीन्समध्ये आत आल्या त्याच 'हुश्श' करीत. आबांना म्हणाल्या, 'राजू नाही आला अजून ?'

'नाही.' आबा.

'आणि बाळ उठलं ?' सूनबाई.

'हो. तुमचीच वाट बघतंय...' आबा.

'खरं तर मी राजूला रात्री कंपनीत थांबावं लागेल म्हणून त्याचा नंतर मला फोन आला, ते कळवलं होतं, आईंना... त्यांनी बघितलं नाही वाटतं...' म्हणत म्हणत सूनबाई आत गेल्या. आबा शांत राहिले.

अप्पांच्या सारं लक्षात येऊन चुकलं. आबा म्हणाले, 'गेल्या एक तारखेपासून राजू आता टीमलीडर झाला. पॅकेज वाढलं. आधी रात्री नऊवाजेपर्यंत तरी घरी येत होता. आता व्हॉइस नाही. विदेशी कंपनी आहे. हे निघायच्या वेळी ते हजर होतात आणि यांची हजेरी सुरू होते. जंकफूड-कॉफी बार-सर्व एसी. थांबा थांबा. पुरं करून जा म्हणतात. आता रेस्टरूमही असते तिथं. चारपाचला कधी तरी काम संपलं असेल. मेल करून, काहीतरी खाऊन झोपला असेल. आत्ता येईल. काल सकाळी आठला गेला आहे. आत्ता आला की, आवरून निघेल.'

'अप्पा, आपल्याकडं बेकारीचा भस्मासुर आहे. माणसांना काम कुठलं द्यायचं हा प्रश्न आहे. आहे ते काम वाढवून, अधिक शेती उद्योग काढून फक्त शहाण्यासारखं दिवसाउजेडी पोटासाठी काम करायचं सर्वांनी ठरवलं तरी खूप माणसांना काम मिळेल. हे श्रीमंती सोसही सुचणार नाहीत. ज्याच्याकडं लोकसंख्या कमी, जमीनउद्योग भरपूर त्यांना ते कल्चर ठीक असेल, पण आपण मोठ्या हौसेनं पत्करलं, गुलाम झालो आता त्या पैशाचे, जीवनपद्धतीचे. मग हे असं अस्वास्थ्य. घरोघरी असल्या वर्ककल्चरनं होमकल्चर बदलून टाकलं...' आबा हताश होऊन म्हणत होते.

अप्पाच त्यांना थांबवीत म्हणाले, 'आबा, ज्यांना हे कळतं आहे त्यांच्या हातात नाही, ज्यांच्या हातात आहे त्यांना करायचं नाही-कसं सुटणार

हे कोडं ? पुन्हा पुढचा फोन यायच्या आत निघतो. पण आबा हे वर्ककल्चर नाही, 'कल्चरलेस वर्क' आहे, होम कल्चर नाही, 'कल्चरलेस होम' करणारं आहे हे ! निघतो आता करायला 'कल्चरलेस वर्क !!'

'कल्चरलेस वर्क ! अप्पासाहेऽब खरं आहे !'

दोघांनीही एकमेकांचे हात हातात घेतले. फार न बोलताही तो जिव्हाळा एकमेकांच्या अंतःकरणाला विसाव्याचा स्पर्श करून गेला.

आबांनाही भरून आलं. आबा म्हणाले, 'अप्पा, तब्येतीला सांभाळून राहा !'

अप्पा मोबाईल घेऊन जड अंतःकरणानं बाहेर पडले. आजचा सातवा रविवारही त्यांचा नव्हता. वेठबिगारीचा होता.

अशा किती अप्पा-आबांची फरपट होणार आहे, किती आजी-मुलं-सुना-बाळं यांची फरपट अन् दिशाभूल होणार आहे आणि किती काळ ? निदान हे 'कल्चरलेस वर्क' थांबेपर्यंत तरी नक्की !

*

३. तळ्यातली कमळं

सकाळची शांत वेळ होती. कुणा लवकर उठणाऱ्यांचीच काय ती आवरण्याची, फिरायला जाण्याची गडबड. नेहमीप्रमाणं परागचा सकाळी साडेपाचचा फिरण्याचा दिनक्रम संपवून तो साडेसहाला घरी परतला होता. आता आंघोळ. दहा मिनिटांत. पुढं सातपर्यंत पूजा. हे सारं पालवीला नित्याचं होतं. सातला पूजा सुरू झाली, की सवासातला सारं आवरून तो आत येऊन तिच्यासमोर चहाला बसणार. तिची सकाळच्या परागच्या डब्याची गडबड सुरू असे. तरीही एकत्र येण्यासाठी ही दहा मिनिटं दोघांच्याही दृष्टीनं मोलाची. तेवढ्यात एखादा महत्त्वाचा निरोप, तिच्या ऑफिसची चौकशी, तिच्या वडिलांच्या आजाराची-परिस्थितीची हालहवाल-सारं थोडक्यात, मनापासून पण अगत्यानं होणार, याची तिला खात्री असे. ते होईसुद्धा. त्यामुळं तो दिवसभर बरोबर असल्यासारखा वाटे. आपापली कामं संपवून संध्याकाळी घरी आल्यावरची भेटही न चुकता, पण थोडी निवांतपणे.

अपवाद फक्त कुणाचं आजारपण, गावी जाणं, कार्यप्रस्थ, अपघात, चांगलेवाईट प्रसंग, त्या निमित्तानं आलेली हाक, धावपळ. आजही चहा समोर ठेवला आणि शेजारच्या साहेबांच्या बंगल्यातून धाडकन काही पडल्याचा आणि कुणाच्या ओरडण्याचा आवाज आला. दोघांनीही क्षणभर एकमेकांकडं पाहिलं. नेहमीच्या परागच्या स्वभावाप्रमाणं आता काय होणार, याचा तिला अंदाज होता. कप तसाच राहील. पराग उठून पळत बाहेर जाईल. शेजारी काय झालं आहे, ते पाहील. ते निभावेपर्यंत राबेल. कंपनीत जायला उशीर होईल. कदाचित अर्धा पगार जाईल. पुन्हा संध्याकाळी गरज असली तर कंपनीतून परतल्यावर घरची कामं, विश्रांती बाजूला ठेवून पराग बाहेर पडेल.

जरूर ती मदत करून येईल.

हे तिला नवीन नव्हतं. त्याबद्दल तिची तक्रारही नव्हती. तिच्यावर माहेरी तो संस्कार होता. तिचे आईवडील असेच दुसऱ्यांसाठी राबत, कुठली अपेक्षा न ठेवता. केवळ गरजेला उपयोगी पडल्याचा आनंद म्हणून. त्यात त्यांना मिळणारा आनंद आणि आजही म्हातारपणची त्यांची समाधानी वृत्ती, त्यामुळं त्यांना आपण होऊन मदत करणारे लोक - हे सारं ती पाहात होती. त्यामुळं चहा समोर तसाचा टाकून पराग असा मदतीला धावला, तर ते तिला कधीच वेगळं वाटलं नाही.

आज एकमेकांकडं बघण्याचा अर्थ थोडा वेगळा होता. ज्यांच्या मदतीला जायचं, ते जावं की न जावं, याबद्दलचा होता. हे दोघांच्याही मनात आलं होतं. शेजारचा आलिशान बंगला साहेबांचा होता. आवाजावरून शक्यता हीच होती की, त्यांना स्वतःला किंवा आईसाहेबांना काही घडलं असेल. माणूस म्हणूनही जाणं अशावेळी योग्य होतं. पण साहेबांच्यासारख्या माणूसघाण्या व्यक्तीसाठी ते करावं की नाही, अशी प्रतिक्रिया येत होती. याला कारण आजवरचं त्यांचं रोजचं अस्वस्थ करणारं स्वार्थी, संकुचित वागणं. आजवर दोन वेळा आजारात केलेल्या मदतीची उपेक्षा, त्यांच्या एकुलत्या एक मुलाला नसलेली त्याची किंमत...

हेच विचार दोघांच्या मनात घोळत होते. तरी शेवटी चहाचा कप तसाच टाकून पराग उठून पटकन पळत गेला, तरी पालवी नाराज झाली नाही. 'मी थोड्या वेळात येते मदतीला, त्या आधी काही लागलं तर फोन करा', इतकं सांगायलाही ती विसरली नाही. कारण तिला ठाऊक होतं शेवटी निरपेक्षतेनं वेळेला केलेली मदतच कर्तव्य ठरणार होतं, त्याची त्यांना जाणीव असो-नसो, तो त्यांचा भाग होता.

पराग साहेबांच्या बंगल्यात पोचून आत जाईपर्यंत आईसाहेब

त्यालाच हाका मारीत होत्या. बाबासाहेबांचं कण्हणं अस्पष्टपणे बाथरूममधून ऐकू येत होतं. परागच्या प्रसंग लक्षात आला. ते दार उघडू शकत नव्हते. त्यानं चटकन कडीजवळची काच तोडली. आतली कडी काढली. बाबासाहेब बाथरूमच्या उंच स्टेपवरून खाली घसरून, बेशुद्ध होऊन, वेडेवाकडे पडले होते. कण्हणंसुद्धा अस्पष्ट होतं. आई बाहेर जमिनीवर मटकन बसल्या होत्या. त्यांना त्यानं धीर दिला. पालवीला पटकन यायला फोन केला. शेजारच्या मित्राला फोन करून बोलवून घेतलं. दोघांनी मिळून दहा मिनिटांत त्यांना बाहेर आणून झोपवलं. चिन्हं काही ठीक नव्हती. आता साहेब पूर्ण बेशुद्धीत होते. दोघांनी ॲम्ब्युलन्सची धावपळ केली.

परागनं आठवणीनं लगेच मोबाईलवर साहेबांचा मुलगा वीरेनशी संपर्क साधला. तो महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला. '...तुम्ही काय तो निर्णय घ्या, करा. मी यायचा प्रयत्न करतो..' त्याचा कोरडेपणा परागला परिचित होता. परागचा मित्र अनुभवी होता. त्याच्या दृष्टीनं साहेबांची स्थिती फारच गंभीर होती. तरी मोठ्ठ्या हॉस्पिटलकडं ते रवाना झाले. तिथले रात्रपाळीचे डॉक्टर अजून जायचे होते. ते खालीच होते. त्यांनी ॲम्ब्युलन्स खालीच थांबवून पेशंट पाहिला. तिथंच बाजूच्या खोलीत घ्यायला सांगितलं. दहा मिनिटांत त्यांनी परागला बोलवून सांगितलं की, ॲडमिट करायची जरूर नाही. काही उपयोग होणार नाही. ॲटॅक मॅसिव्ह आहे. सारं आधीच संपलं आहे. क्षणभर पराग आणि मित्र दोघंही आतून हालले. एवढं होईलसं वाटलं नव्हतं. साहेबांचा तुसडा स्वभाव माहीत असला, तरी ते आता नव्हते - पण वीरेन त्यांच्याही पुढं एक पाऊल होता. त्याचं भावी चित्र त्यांना आता अधिक अस्वस्थ करीत होतं.

डॉक्टरांना थोडी मुदत मागून परागनं पालवीला बातमी कळवली. वीरेनला फोन लावला. त्याची प्रतिक्रिया कोरडी होती. गेल्याबद्दल दुःख

करण्यापेक्षा, तो त्याच्या प्रमोशनच्या काळजीत होता. तो नेमका तिकडून स्पेशल कारनं निघून त्याचा दोनतीन तास प्रवास झाला होता. तरी त्याला पोचायला दुसरा काही मार्ग नव्हता. असे किमान आठ दहा तास लागले असते. तुम्ही सारं करा. माझी वाट पाहू नका. पुन्हा मला लगेच परतावंही लागेल. असा त्याचा सूर होता. त्याच्या बोलण्यावरून बाबासाहेबांच्या तब्येतीची ही काय नवीनच अडचण मध्ये आली, असं त्याला वाटत होतं. 'अॅटॅक म्हणजे असं होणारच. त्यांनी काळजी घ्यायला हवी होती, आईचं लक्ष नव्हतं का-'असले शासकीय प्रश्न तो विचारीत होता. 'मी येईपर्यंत ठेवणं बरोबर होणार नाही. जमेल तसं उरकून घ्या', असा त्यानं जणू परागला आदेशच दिला.

परागला या प्रसंगात मदत करण्याबद्दल काही वाटत नव्हतं. स्वार्थ, संकुचितणा, बेपर्वाई आणि माणुसकी नसल्याची चीड येत होती. पण आईसाहेबांकडं बघून आणि प्रसंग बघून त्यानं ते सारं आवरलं. तो पुढच्या व्यवस्थेला लागला. साहेबांचा स्वभाव आणि त्यामुळं संबंधच असे होते की मदतीला आपण होऊन कुणी येण्याची शक्यता नव्हती. केवळ चार सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीनंच सगळं करायचं होतं. त्यानं तशा चारपाच लोकांना फोन लावले. काही औपचारिक निरोप दिले.

दुसरी गाडी मागवून तो साहेबांच्या घरी पोचला. पालवी तोवर आईसाहेबांच्याजवळ बसून होती. तोही शेजारी येऊन बसला. आईसाहेबांच्या सारं लक्षात आलं होतं. एकदोन मिनिटं त्यांना वाईट वाटलं. पण त्या म्हणाल्या, 'तो पोचणार आहे का ?' परागनं नकारार्थी मान हलवली. त्या खिन्नपणे म्हणाल्या, 'ते अपेक्षित होतं. त्याला वाटेत नागपुरातून विमान मिळू शकतं. पण एवढा खर्च तो आता कशाला करायचा म्हणेल..', म्हणून त्या खिन्नपणे हसल्या. पराग अन् त्याच्या मित्राला म्हणाल्या,

'आता तुमच्यावरच आहे सगळं ! पण पैशाच्या नि इस्टेटींच्या मागं लागले त्यांच्या वाट्याला असं एकाकीपण यायचंच. ईश्वरानंच त्यांचा न्याय केला. एकुलता एक मुलगा, पण त्यानं माणूस होण्यापेक्षा करियर करीत सुटावं, हीच त्यांची इच्छा होती. ती तोही पुरी करतोयच. माणुसकीची सोबत तुमची आहेच. यांना घरी आणलं की सांग. मी नमस्कार करून येईन..नंतर बोलेन.' वियोग, मृत्यू, चीड, आयुष्यभराचा दबाव, मनाची कुतरओढ, सुटका, पुढं मुलाची काळजी, या जमलेल्या मुलांची माणुसकी - अशा असंख्य गोष्टी त्यांच्या बोलण्यात दाटून आल्या होत्या.

'कुठंपर्यंत आलंय...' म्हणून वीरेनचा मध्येच फोन आला. आत्ताच अग्नी दिलाय, परागनं बाजूला जाऊन दबक्या आवाजात सांगितलं. त्याचं त्याला काही सुखदुःख नव्हतं.

'साध्याकडेच गेला ना ?' वीरेन.

'नाही. इलेक्ट्रिककडे आलो. आता सोय आहे ना इथं !' परागनं प्रश्नाचा रोख न कळून उत्तर दिलं.

'अरेरे, बरं असू दे. इलेक्ट्रिक थोडं कॉस्टली असेल ना ?'

'माहीत नाही... पण माणूसबळ कुठं आहे इथं ?' पराग जरा रागातच म्हणाला.

'ठीक आहे. ठीक आहे !'वीरेननं सरळ फोन बंद केला.

परागला सुन्न झालं !

जी काही पाचदहा माणसं जमली होती, ती तासाभरात पांगली. पराग त्याच्या मित्राबरोबर परतला. पालवीनं आईसाहेबांना मधेमधे चहा-जेवण नेऊन दिलं होतं. वीरेनची गाडी रात्री नऊ वाजता बंगल्यासमोर उभी राहिली. ड्रायव्हरला सामानसुमान आणायला सांगून वीरेन आत आला. प्रथम त्यानं आपलं आवरलं. इतकी आकस्मिक गंभीर घटना घडल्याचं

त्याच्या चेहऱ्यावरही नव्हतं. ड्रायव्हरला 'खाना खाओ और आउटहाउस में सो जाओ ' म्हणून ऑर्डर सोडून मग आईला भेटायला तो आत गेला.

शेवटी पालवीला तिथं बसलेली बघून तो उद्‌गारला, 'तू आहेस होय इथं..? मला वाटलंच तू सोबत असशील !'

आपण सारं घरकाम सोडून थांबलो ते चुकलं की काय, असं क्षणभर तिला वाटलं. पण पुन्हा तिला त्याचा तुटक स्वभाव आठवला. तिनं ते सोडून दिलं.

ती म्हणाली, 'हो, इथं सकाळपासून कुणी नाही सोबत.'

'का बायजाबाई कुठं गेली ?' वीरेन.

'चार दिवस झाले तिची तब्येत बरी नाही.'पालवी.

'आणि वॉचमनही दिसत नाही ?' वीरेन.

'तो गेल्या आठवड्यात गावाकडं यात्रेला गेलाय, तो अजून परत यायचाय.' पालवी.

'काय ड्यूट्या सोडून देवदेव करतात कळत नाही. पगार मात्र महिन्याचा मागत असेल !' वीरेन.

पालवी काही बोलली नाही. आईसाहेबांच्या डोळ्यांत अश्रू होते. त्यांच्या उशीखालचा गजानन महाराजांचा फोटो ती अधूनमधून काढून पाही, रडे, ठेवी. आत्ताही तिच्या डोळ्यांत पाणी आलं. वीरेन औपचारिकपणे म्हणाला, 'आई, झालं ते झालं. माझं दुसरं प्रमोशन पुढच्या आठवड्यात आहे. ते मिळालेलं पाहून गेले असते तर बरं वाटलं असतं ! म्हणजे, त्यांना..!'

त्याच्या लक्षात आलं. आपण आत्ताच हे बोललो नसतो तर बरं झालं असतं. पण तो पुढं म्हणाला,

'पराग वगैरे आहेतच इथं. आता थांबण्यातही काही अर्थ नाही. मी बहुतेक उद्या सकाळी निघून रात्रीपर्यंत पोचेन. एकच दिवस तयारीला

मिळेल. बाबा म्हणायचे ना की, क्लास वन ग्रेडची परीक्षा देच. ती दुसऱ्याच दिवशी आहे. त्यासाठीच तर थांबलोय ना इतके दिवस... लग्नाचासुद्धा !'

आईसाहेब शांत राहिल्या. ही पितापुत्रांची करियरची, प्रतिष्ठेची नि पैशाच्या लोभाची जोडी. बोलून काय पाड लागणार आहे. ज्याला या क्षणीसुद्धा एक दिवस थांबून अंत्यविधी नाही, तर निदान रक्षा तरी विसर्जन करून जावंसं वाटत नाही. प्रमोशन दिसतं आहे. त्यात पुन्हा ते लवकर अशासाठी की साहेबांनी लग्न थांबवलं होतं. ते झालं की मग बड्या घरची मुलगी, थाटात लग्न, त्याला फॅमिली क्वार्टर, पट्टेवाला ! त्या बडेजावापुढं आईची किंमत, व्यवस्था सोडाच पण त्याच विचाराचे गेलेले वडील आणि त्यांची रक्षा, या गोष्टीसुद्धा दिसत नाहीशा झाल्या त्याला. त्या ऐकत राहिल्या.

वीरेन पुढं म्हणाला, 'मी आत्ताच आल्यावर सर्व पाहिलं. बाबांनी सर्व व्यवस्था चोख केली आहे. बंगला,खाती, अगदी माझीसुद्धा. सर्व तुझ्या नावे आहेत. तुला कुठली अडचण येणार नाही. नोकरवर्गावर मात्र नीट लक्ष ठेव. वेळेला मदतीला असले पाहिजेत...!'

आईसाहेब मनात म्हणाल्या, वेळेला मदतीला देवसुद्धा येईल पण त्याच्याशी वर्षभर तसं वागावं लागतं. नुसतं दर्शन घेऊन, स्मरण करून, आज कुणी नसताना, माझ्या महाराजांनी हा मुलासारखा पराग नि पालवी उभी केली. नोकरसुद्धा राहिले नसते, कारण त्यांच्यावर खेकसून, पैसे देताना कुरकुर करून त्यांना काय आपुलकी वाटणार? पण त्यांनी मनात पुढं विचार केला इतकी वर्षं आपल्या हाती काहीच नव्हतं, आता निदान कुणासाठी काय करायचं ते थोडंतरी नीट करता येईल. इथंतरी आता आपण एकटेच आहोत. नाहीतरी साऱ्यांना बिनपैशात नि कमी पगारावर राबवून यांनी साठवल्या त्या सोन्याच्या चिपा ! त्या ना त्यांच्यासाठी रडल्या ना त्यांच्याबरोबर स्मशानात आल्या. आली ती जोडलेली माणसं...!

वीरेननं घरात फिरून एकदा सर्व पाहाणी केली. ड्रायव्हरला त्यानं, खाना खाओ, म्हणून पन्नास रुपये देऊन पाठवलं. त्याचा विषयही त्याच्या लक्षात नव्हता. परागनं ते सारं ऐकलं होतं. ड्रायव्हरच्या जेवणाला पन्नास रुपयात या वेळी काय येणार होतं ? म्हणून तो स्वतःच त्याच्याबरोबर गेला त्याला पाहिजे ते पोटभर जेवायला घातलं. तीनशे रुपये बिल झालं. ड्रायव्हरनं पन्नास रुपये पुढं केले. पण परागनं ते त्याला देऊ दिले नाहीत. बिल स्वतः दिलं. पन्नास रुपये उद्याच्या परतीच्या प्रवासात चहापाण्याला असूदेत, म्हणून सांगितलं. ड्रायव्हरच्या डोळ्यांत पाणी आलं. तो सारं ओळखून चुकला. त्याला वॉचमनच्या आउटहाउसकडं नेलं. पण सांगितलं, तुम्ही इथं झोपू नका. इथं अस्वच्छता, डास सारं आहे. वॉचमननं परत यायला उगाच वेळ लावला नाही, हे ड्रायव्हरच्यासुद्धा लक्षात आलं !

परागनं ड्रायव्हरला घरी नेलं. त्याला चांगलं अंथरूण पांघरूण दिलं. मग थोड्या गप्पा झाल्या. येताना जेवायला कुठंकुठं थांबला, सहज चौकशी केली. ड्रायव्हर खिन्नपणे हसला, 'खाना ? खाने की बात छोडो ! तेरा घंटे ड्रायव्हिंग चल रहा था. खाना नहीं सिर्फ चाय भी नहीं पूछा ! मैंने दो बार रुक कर पानी पिया, चाय पिया. साब गाडी से उतरे भी नहीं, न पूछताछ, न पैसा. साब के चाय के पैसे भी मैंने दे दिये ! ये सब कहाँ ले जानेवाले हैं ये साबलोग, खुदा जाने...!'

मी जादा तर बोललो नाही ना, अशी अजीजी त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती. पण परागनं त्याला समजावून दिलं. आम्हाला कल्पना आहे. तो म्हणजे वडिलांची पुढची आवृत्ती आहे. आम्ही सारे माणुसकी म्हणून आणि खरंतर आईसाहेबांच्याकडं बघून सारं करतो. ती माय सर्वांची आहे. तिच्या मनात फार असतं. जमेल तेवढं करते. आता थोडं जास्तकमी मनासारखं करू शकेल. बोलताना उशीर झाला. परागनं परत त्याला आपल्या

दोघांबरोबर पंगतीला बसवलं. पण जेवलेला असूनही त्यांचे स्वभाव पाहाता त्याला हा 'प्रसाद'च वाटू लागला. म्हणून तो जेवला. रात्री त्यांच्याच घरी ड्रायव्हरची खरी विश्रांती झाली.

परागनं औपचारिकपणे वीरेनला थांबायला सांगितलं. पण त्याच्या त्या लग्नासाठी अडलेल्या प्रमोशनच्या, प्रतिष्ठेच्या, पैशाच्या आशेनं पुन्हा बाराचौदा तासांच्या परतीच्या प्रवासाला तो रवाना झाला. ड्रायव्हर परागच्या घरी गेला. पाया पडून गपचूप निरोप देऊन आला. परागनं त्याला थोडे खाद्यपदार्थ वाटेसाठी शिदोरी म्हणून दिले. 'हमारी याद रखो, साब !' म्हणून दोघांचाही निरोप घेताना त्याचा गळा भरून येत होता.

सकाळीच पालवीचे आईबाबा गावाहून आले. पालवीची आई-शकू आईसाहेबांची बालमैत्रीण. एकमेकींची सुखदुःखं त्या कित्येक वर्षं ओळखत होत्या. त्यांना भेटण्यात आईसाहेबांनाही आत्मीयता आणि विसावा होता. दुसरा दिवस आवराआवरीत गेला. तिसऱ्या दिवशी सकाळीसकाळी पराग मित्राबरोबर आईसाहेबांकडं गेला. त्या गंभीर होत्या. तेवढ्यात टेबलावर फोन वाजला. पराग जवळच असल्यानं त्यानं उचलला. 'क्या यह एसडीएम वीरेनजी का घर है ?' म्हणून विचारणेला सुरुवात झाली.

पराग म्हणाला, 'जी हाँ !' हिंदीत बातचीत झाली. परागला क्षणभर कळेना. त्यानं सारं ऐकून घेतलं. साहेबांच्या रक्षाविसर्जनाचा विषय, तो ते ऐकताना, कधीच विसरला आणि शेवटी फोन संपल्यावर तो मटकन खालीच बसला. त्यानं पालवीला बोलवून घेतलं.

आईसाहेबांनी ओळखलं काहीतरी गडबड आहे. दोघं आत आली ती स्तब्ध नि सुन्न होऊनच. परागनं सुरुवात केली, 'वीरेन इथून सुखरूप परतला. जाताना ते लवकर परतले. बरोबर आलेले ते ड्रायव्हर आणि गाडी आपल्या घरी गेले. तिथून पुढं जाण्यासाठी त्यांची नेहमीची गाडी आणि

ड्रायव्हर दिला. पण वाटेत अतिरेक्यांनी फार मोठे सुरुंग पेरलेले होते. ते उडाले. गाडी-ड्रायव्हर सर्व उडून साऱ्याचा चुरा झाला.'

'तो वाचला का ?'आईसाहेब.

परागनं नकारार्थी मान हलवली. म्हणाला,' कुठलं संरक्षण नसल्यानं अतिरेक्यांनी पुन्हा माणसांसह सर्व वाहन पेटवून बेचिराख करून टाकलं. त्यामुळं ते इकडं काही पाठवू शकत नाहीत. फक्त कागदपत्रं येतील..'

आईसाहेब सुन्न होत्या. तसेच सारेही. एका महत्त्वाकांक्षी पित्याची रक्षा अजून विसर्जित व्हायची होती, त्याच्या आतच त्याहीपेक्षा महत्त्वाकांक्षी पुत्राची रक्षाही शिल्लक राहिली नव्हती. हे कुठलं आदर्शांसाठी बलिदान नव्हतं. सत्तेची, पैशाची नि प्रतिष्ठेची अभिलाषा आणि त्याचा बळी होता.

आईसाहेबांनी उशाजवळचा महाराजांचा फोटो काढून ठेवला. त्याला नमस्कार केला. क्षणभर हुंदका आला पण गेलाही. सगळ्यांकडं बघत त्या म्हणाल्या, 'तुम्ही प्रथम तुमचं आजचं काम करून या. वीरेनसाठी प्रार्थना करून या. पुढचा जन्म देशील तो दे म्हणावं. पण पैसा, प्रतिष्ठा, खोटा मोठेपणा, गरिबांबद्दल बेपर्वाई, असल्या दुर्गुणांचा देऊ नकोस म्हणावं. थोडेच दे पण दैवीगुण दे !'

पराग, त्याचे सासरे आणि इतरांनी फक्त माना हलवल्या आणि बाहेर पडले. परतल्यावर सर्व व्यवस्थित झाल्याचं सांगून घरी गेले. जाताना आईसाहेब म्हणाल्या, 'हा आठवडाभर जाऊ दे, एक दिवस बसूया, तोपर्यंत विचार करून ठेवते.'

पालवीच्या आईला त्यांनी आग्रह करून ठेवून घेतलं. पालवीची आई त्याकाळी गरीबाघरी पडली, अडीअडचणी सोसत प्रपंच पार पडला. परागचं स्थळही आईसाहेबांच्या ओळखीनंच आलं. गरीबी होती पण पालवीच्या घरी आणि सासरी समाधान होतं.त्या दोघांच्याही घरी मनात येत नसलं तरी,

त्या मानानं, आईसाहेब तशा श्रीमंतघरी पडल्या. साहेब हुद्द्यावर, कर्तबगार पण कंजूषच नव्हे तर जगाशी फटकून. अगदी पहिल्यांदा तर देवळात जाऊन चार आणे ठेवून आल्या, म्हणून खावी लागलेली बोलणी, आज तीसपस्तीस वर्षं झाली तरी सलत राहिली. देवाधर्माचं तर नाव नाही. निदान समोरच्या दारी आलेल्या जित्याजागत्या गरीबाला तरी हातून घासभर अन्न, पाणी, चार पैसे, नडीला सुटतील तर शपथ. आईसाहेबांना वाईट वाटे. त्यांना वाटे हे सारं इतकं मिळतं आहे, ते त्या देवाच्याच कृपेनं ना. झळ सोसू नका पण निदान वाहून जातंय ते पाणी तरी त्यांना पिऊ द्यात.

आयुष्यभराच्या साहेबांच्या नि वीरेनच्या अनेक दुःखदायक आठवणी त्या पालवीच्या आईशी बोलत बसत. मन हलकं होई. गेलेल्याबद्दल वाईट बोलू नये. पण साधी माणुसकीसुद्धा नसावी हा सल व्यक्त झाल्याशिवाय राहात नसे. चुकलं ते चुकलंच. त्याचा परिणाम काय झाला, माणसं तुटली, साधा कामाचा, मोलाचा घरगडी, भांडीवालीचासुद्धा चांगुलपणा घेता नाही आला. कुणाची सहानुभूती नाही. उपचार म्हणूनसुद्धा कुणी भेटायला आलं नाही. खोट्या प्रतिष्ठेच्या आशेनं सूनसुद्धा वेळेत तर आली नाहीच, अखेर दुर्दैवानं तर आता येणं शक्यही नव्हतं. आता त्या एवढ्या इस्टेटीचा नि पैशाचा त्या दोघांचा संबंध क्षणात संपला. उपयोग संपला. आईसाहेबांचं गत आयुष्याचं चिंतन चालू होतं. असल्या वातावरणात आपली सद्बुद्धी टिकवण्याऱ्या आणि आपला सांभाळ करणाऱ्या देवाबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञता दाटून येत होती. पुढं मार्ग दाखवायची त्या त्यालाच प्रार्थना करीत होत्या.

आठदहा दिवस मागे पडले. परागच्या सर्व कुटुंबाला त्यांनी एकत्र बोलावलं. त्यांच्याही लक्षात आलं की आईसाहेब आता सावरल्या आहेत, काही निश्चयाला, विचाराला आलेल्या आहेत. इकडच्या तिकडच्या गप्पा

झाल्या. तरी सर्वांचे चेहरे तसे प्रश्नार्थकच होते. शेवटी आईसाहेबांनीच सुरुवात केली,

'पराग, तुम्ही सर्वच मला जवळचे आहात. मला कसं जगायचं होतं, ते तुम्हाला ठाऊक आहे. साहेब कसे जगले, ते तुम्हाला ठाऊक आहे! वीरेनही कसा जगला, तेही तुम्हाला ठाऊक आहे ! आपल्याला सारं देणाऱ्या देवाबद्दल पूर्ण बेफिकीर असलेली या दोघांची जीवनं होती. माझा ईश्वरावरच नव्हे तर त्याच्या न्यायबुद्धीवर, दयाबुद्धीवरही विश्वास आहे. यांच्यावर दया दाखवून देवानं त्यांना खूप संधी दिली, साठपासष्ठ वर्षं म्हणजे काही कमी नव्हे, पण त्याची किंमत नाही, हे पाहून, सारं एका क्षणात हिरावून घेऊन त्यानं न्यायच केला, असं मला वाटतं !'

'तीच गोष्ट वीरेनचीही आहे. साहेब नुसतं स्वार्थी जगले नाहीत तर त्यांनी त्याला तेच वळण लावलं. तो जगता तर यांच्यापेक्षाही अश्रद्ध नि संचयखोर झाला असता. सगळ्या जगावर चिडचिड करण्यात आणि पैसा वाचवण्यात त्याचा जन्म वाया गेला असता. देवानं त्याचा न्याय अधिक लवकरच केला. कौटुंबिकदृष्ट्या माझं जे नुकसान झालं ते उघडच आहे पण देवाच्या न्यायानं समाजाचं पुढचं खूप नुकसान टळलं !'

आईसाहेबांच्याच नव्हे, तर इतरांच्याही डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. सर्वांना आश्चर्याचा धक्का हा होता की, दोन दिवसांत पती नि एकुलता एक मुलगा जाण्याचे एवढे दोन आघात सहन करून, ही माउली इतक्या शांतपणे इतरांच्या हिताचा विचार कशाच्या जोरावर करते आहे ? तोवर त्या पुढं म्हणाल्या, 'मी कठोर नाही. पण चांगल्यासाठी खंबीर आहे. मला देवाचं पाठबळ आहे. मला या घरच्या दोघांच्याही स्वार्थानं इतकी वर्षं तळमळत ठेवलं. एवढा मोठा बंगला आहे. पण माझ्या देवाला ही उशाजवळची चार इंच जागा ठेवली होती त्यांनी. आता हा सारा बंगला देवाला मोकळा झाला.

दुर्दैवानं आता वारसही नाही उरला. एकाच न्यायात आता देवच मालक आणि वारस व्हावा तसं झालं. मलाही आता या साऱ्याचं पुढं तेच व्हावं असं वाटतं. जमेल तसं करू. पण माझी एकटीची तेवढी कुवत नाही. तुम्हाला काय वाटतं ? '

सर्वजण जरा संभ्रमात पडले. परागनं विचारलं, 'आम्हाला हे पटतं पण, आता आम्ही काय करावं, असं तुम्हाला वाटतं ?'

आईसाहेब म्हणाल्या, 'पैशाचा इतका संचय. तोही असा नाडून केलेला. ही एवढी जागा अडवून ठेवली. शिवाय शेती-हे सारे तर देवाच्या गावी अपराधच आहेत ! मला आता प्रायश्चित्त घ्यायचं आहे ! योगायोगानं देवानं एका हातानं त्यांना दोघांनाही दिलं तरी, त्यांनी दोनदोन हातांनी मिळवून साठवलं ! आता त्याच योगायोगानं मला तेच चारचार हातानं वाटायची संधीही त्याच देवानं दिली आहे !'

'काय करावं याबद्दल माझ्या काही कल्पना आहेत. तुम्ही अजून चांगलंचांगलं सुचवा, मला त्याचीही गरज वाटते. मला मनुष्यबळाचीही गरज आहे. कुणीतरी हे सांभाळायला, जे हे सुचतं आहे ते अमलात आणायला इथं कायमचं हवंच आहे. पराग पालवी पुढच्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. त्यांचेही काही चांगले मित्र आहेत, ते प्रयोगशील आहेत. ते काही मदत करतील. त्यात काही गरजूही आहेत. त्यांनासुद्धा मदत होऊ शकेल.'

'पण खरी मदत मला होऊ शकेल ती शकू तुमच्याकडून !' पालवीच्या आईबाबांकडं बघत त्या म्हणाल्या. पालवीची आई त्यांची बालमैत्रीण. सरळ स्वभाव, गरीब, सतत राबणारी. तिला त्या म्हणाल्या, 'चार कुटुंबं राहातील, एवढा मोठा हा बंगला आहे. शिवाय काही उपक्रम, योजनांसाठी खोल्या, हॉल ! बाहेर तर एवढी मोकळी मोठी जागा आहे. सगळ्यात पहिली योजना सुरू करावी ती देवाचं नाव आणि अन्नदान.

त्यासाठी हॉलमध्ये नाम आणि प्रसाद ठेवू. निदान गुरुवार-रविवार तरी. इतर वार सध्या त्याच्या तयारीसाठी उपयोगी होतील. नऊ ते बारा देवाचं नाव घ्या. बाराला आरती करा. जे नामाला होते त्यांना पुढं अन्नदान ! त्यात गरीबगुरीब, श्रीमंत-भिकारी कसलाही भेद ठेवायचा नाही. सुरुवात नामानं होऊ दे आणि अन्नदानानं होऊ दे !'

'या वास्तूला स्वार्थाचं लागलेलं वळण काढून त्याला देवाचं वळण लावायचं आहे. इतके दिवस देव माझ्या कॉटवर उशीजवळच्या चार इंची फोटोवर राहिला. आता सगळं घर त्याचं होऊ दे. त्याच्या घरात राहायला आम्हाला प्रत्येकाला कॉट, खोली बास आहे !'

'शकू, मला माहीत आहे, तुमची शेतीवाडी आहे. मध्ये वाटेकऱ्याचं घर पडलं. तो तुम्हाला घरच्यासारखा आहे. तो तुमच्या गोठ्याजवळच्या दोन उघड्या खोल्यात राहातो. तुमचंही घर फार मोठं नाही, वाटलं तर ते त्याला द्या. तुम्हाला या बंगल्यातला एक ब्लॉक कायमचा. तुम्हाला भजन चांगलं येतं. अन्नदान, पूजाअर्चा आवडते, शेतीकाम येतं, देवाचं नाव आवडतं. अशा बंगल्यात तुम्ही कायमचे राहिलात तर हा बंगला पावन होईल. आमच्या प्रायश्चित्ताचा शुभारंभ त्यामुळं किती चांगला होऊ शकेल...!'

आईसाहेब बोलत होत्या. इतर सर्व पाहातच राहिले.

पुढं त्या म्हणाल्या, 'एवढ्यावर काही होणार नाही. यांची शेती आज चार कुटुंब चालतील एवढी आहे. पण कुणी नीट नियोजनानं कसली नाही. विहिरीकडं लक्ष दिलं नाही. तिकडं खूप काम आहे. माझी कल्पना थोडी वेगळी आहे. पाच गरीब मुलं निवडावी. त्यांची राहायची सोय होईल. इकडचं बारावीनंतरचं शिक्षण बाहेरून करतील. त्यात साठ टक्के मार्क मिळवलेच पाहिजेत. दिवसभर रानात काम. प्रतिष्ठेनं करता यावं म्हणून तीन वर्षं बाहेर मिळतं तसं पॅकेज देऊ. निम्मं शिक्षण, निम्मं काम,निम्मं पॅकेज!

पुढं पूर्ण पॅकेज. पूर्ण शेतीकाम ! आयटीतल्यासारखी नुसती बैठी प्रतिष्ठा नको. आपणही तीन लाख पॅकेज पाच मुलांना देऊ शकू. पुढं अशीच वाढ. त्यांच्यापेक्षा जास्त. त्याच्याचबरोबर दानाचं वळणही सुरुवातीपासूनच !'

पराग त्यांना अडवीत म्हणाला, 'आईसाहेब, शेतीमजुराला पॅकेज?'

आईसाहेब ठामपणे म्हणाल्या, 'होय, पॅकेज ! पण शेतमजुराला नाही. त्याला मजूरसुद्धा म्हणायचं नाही. कृषिअधिकाऱ्याला, कृषिटीमलीडरला!'

पराग म्हणाला, 'आईसाहेब, असं घडलं, तर खोटी प्रतिष्ठा नि पैशापेक्षा उलट सुशिक्षितांचा ओघ इकडं वळेल !'

'जरूर वळू दे. आपला प्रयोग छोटा असला तरी त्याला दैवीअधिष्ठान आहे. इथं असलं कारकुनी शिक्षण मिळणार नाही. कुदळ-कुऱ्हाड-फावडं शिकायचं अन् संगणकातलं कौशल्यही. किंमत सारखीच. पॅकेज सारखंच. दिवसभर उन्हातान्हात देहकष्टांची, प्रतिष्ठेची, पैसा देणारी कामं आणि रात्री देवाचं भजन. ग्यानबातुकारामांचा गजर होऊ दे रानात अन् बंगल्यातही !'

सगळ्यांच्या मनात एक प्रश्न नकळत होता. ते ओळखून आईसाहेब म्हणाल्या, 'हे आपल्याला परवडेल की नाही ? असं वाटतं ना ? परवडेल ! काय होणार - एखाद्या शेतीत फायदा, एखाद्यात तोटा. हा साठलेला पैसा तोटा भरून काढायला वापरू. आपण प्रामाणिकपणे शेती करतो आहोत, भजन करतो आहोत, देव निदान तोटा भरून काढण्याइतपत पैसा देईल. पालवीचे बाबा, तुम्ही लक्ष ठेवा. वेळोवेळी आढावा घेऊ. बदल करू.'

सर्वांना एकदम हायसं झालं. पालवीचे बाबा म्हणाले, 'तोटा काय होईल ? एकवेळ फायदा कमी होईल. पण आपण सर्वांची पॅकेज देऊनसुद्धा तरंगत राहू, तरंगत ! कधी पीक जादा येईल, कधी पूरक व्यवसाय हात देईल, कधी भाव वाढतील, कधी दलाली कमी होईल - काहीतरी देव करेलच. कारण मुळातच आपणही गब्बर होण्यासाठी हे सारं करीत नाही.

देवापुढं प्रायश्चित्ताचीच प्रार्थना करून करतो आहोत ! आपला देव दामाजीपंतांचा देव आहे. इथलं पेवही रिकामं राहायचं नाही. अन् इथली हुंडीही पटल्याशिवाय राहायची नाही !' पालवीचे बाबा.

'बाबा, तुम्ही बोललात, देव खरं करो ! मला हत्तीचं बळ आलं ! माझी सारी अपराधी भावना धुऊन निघाली. यांचे स्वार्थ, मिळकती, सोनीनाणी , लुबाडणुकी, इस्टेटी-यांनी मला अगदी चिखलात फसल्यागत झालं होतं. आपण देवाची मनोमन करुणा भाकायची आणि निमूटपणे काम करत राहायचं, असं आयुष्य मी आजवर काढलं. पण या दुर्दैवी मृत्यूंनी देवानंच आशेचा किरण दाखवला. नव्हे, आता देवाच्या इच्छेच्या वाटेवर त्यानंच प्रकाश पाडला आहे.'

'आईसाहेब, खरं आहे !' पराग म्हणाला, 'या पॅकेजवर मी कंपनीतली नोकरी सोडून कुदळ हाती घ्यायला तयार आहे, गाईगुरांचं करायलाही तयार आहे. हे एक नमुनेदार काम आहे, मॉडेल आहे. प्रत्यक्ष मातीशी, निसर्गाशी, जिवंत गुरंवासरं-पशुपक्ष्यांशी संबंध आहे. आजच्या या आंधळ्या स्पर्धेत पळणाऱ्या कचकड्याच्या माणसांपेक्षा हा संबंध खूप जिवंत आहे, चांगला आहे. खरंतर असले दुर्दैवी प्रसंग हे चांगलं घडण्यासाठी निमित्त ठरतील. एकदा विचार रुजले तर असल्या प्रसंगांची गरजही नाही. नुसत्या विचारानंच पुढचं काम होईल !' पालवीनं संमतीदर्शक मान डोलवली.

आईसाहेब म्हणाल्या, 'मुलांनो, थांबा थोडं. अजून नीट विचार करू. हे घर देवाला द्यायचा आपला बेत कायम आहे. इतरही सगळे बेत समोर आहेत. पण मोठ्यांचा सल्ला घेऊन, सगळ्यांनी मिळून कार्यपद्धती ठरवू. पण मला नक्की वाटतं की, हे साचलेलं पैशाच्या, लोभाच्या नि पिळवणुकीच्या चिखलानं गढूळ झालेलं तळं आपण कसोशीनं साफ केलं, तर त्यातही स्वच्छ पाण्याचे झरे लागतील, कुणाची तरी जीवनं उभी राहातील.

श्रमांना, शरीरकष्टांना बाहेरही गरजेची असलेली प्रतिष्ठा-पैसा मिळेल. मुळात मातीला आणि देवाच्या इच्छेला न्याय मिळेल. त्यांचा दुवा मिळेल. तळं तर काही चिखलानं वाया जाणार नाही !'

पालवीचे बाबा म्हणाले, 'तळं वाया काय जातंय आईसाहेब ! तुम्ही पाहा, काही वर्षांत त्यात सत्कर्मांची, स्वावलंबनाची, शरीरकष्टांच्या प्रतिष्ठेची, खऱ्या अर्थानं माणूस म्हणून जगणाऱ्या माणसांची - कमळं फुलतील, कमळं !!!'

एवढ्या गंभीर प्रसंगानंतरही सर्वांच्याच डोळ्यांत पाणी आलं. एका डोळ्यात चुकीच्या दिशेनं जगलेल्या आणि जगू पाहणाऱ्या माणसांच्या मृत्यूबद्दल खेदाचं पण दुसऱ्या डोळ्यात देवानं समोर उभ्या केलेल्या प्रकाशमय भवितव्याबद्दल धन्यतेचं !

*

बाबा बाहेर कोचावर बसले होते. शांतपणे पुस्तक वाचत होते. मधून मधून विचार करीत होते. आतून आई-मुलाचा संवाद त्यांना ऐकू येत होता.

'आई, माझं दुसऱ्या कंपनीचं जमत आलं बरं का...!' हेमंत.

'कुठलं टेक्सोल ?' रागिणी. आई.

'छट् कुठं आहेस तू ? ॲल्युअर !' हेमंत.

'ॲल्युअर ? बाप रे, मोठी टफ फाइट असणार पण. नंबर दोनची कंपनी आहे ना ती ?' रागिणी.

'करेक्ट ! पण..' हेमंत.

रागिणी उत्साहानं म्हणाली, 'पण काय, हेच ना की, तू तिथं गेल्यावर ती नंबर एक असणार आहे !'

'हेच होतं माझ्या मनात ! प्रत्येक बॉसला नि कंपनीला मी आजवर मागं टाकत आलो आहे. टेक्सोलसुद्धा मी मागं टाकू शकेन असं वाटत नव्हतं. पण माझा परफॉर्मन्स अपेक्षेपेक्षाही सर्वांपेक्षा चांगला होता. त्यामुळंच मी इकडं दुसऱ्या लेव्हलवर माझे ॲल्युअरचे प्रयत्न चालूच ठेवले होते. फक्त तिथं स्पर्धा सर्वांत टफ. आपल्या मोटरगेममधल्या गाड्या पळतात ना, वळण आलं, दे डॅश दुसऱ्याला, काढ पुढं, दोन गाड्यांत अंतर दिसलं काढ मधनच झुरकन्, गेली कडेला ने तिरकी-तिरकी-तिरकी आणि ने पुढं. सरळ रस्त्यावरचे राहिले कुठंच मागं ! मजा आली. आजचे राउंड्स् असेच झाले - ॲल्युअरमधले ! व्हीडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये एका मधल्या राउंडला तर माझ्या एका उत्तरावर त्यांनी जपानमधल्या कॉन्फरन्सिंगमधून हात केला. वेल

डन ! एकदम सॉलिड कॉन्फिडन्स आला मला. फक्त सिलेक्शन टफ आहे हे मात्र लक्षात आलं.'

आई म्हणाली, 'अरे, तेच तर आहे. पण लहानपणापासून तुला स्पर्धेची सवय आहे. मीही कॉलेजमध्ये कुठल्या वादविवाद स्पर्धेत कधी हरले नाही. मला खात्री होतीच की, तू यातही स्पर्धेत उतरून शेवटच्या क्षणीसुद्धा हरताहरता असा डाव करशील की, प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत पटकन पुढं जाशील. आजचं तुझं सिलेक्शन तसं अनपेक्षित आहे. टेक्सोलला तू फायनल राउंडपर्यंत जाऊ शकणार ही खात्री होती मला. कारण ती आज सहाव्या नंबरची कंपनी आहे. पण ॲल्युअर नंबर दोन ! वेल डन !!'

रागिणीला अशा मुलाची आई म्हणून आपण आत्ता आनंदानं ओरडावं, नाचावं की मोठ्यानं एखादं म्यूझिक लावावं, असं वाटलं. त्या, आनंदाच्या भरात त्याच्या आवडीचा पदार्थ बनवायला लागल्या. इतक्या किलिंग - जीवघेण्या स्पर्धेत मुलाचा झेंडा फडकत पुढंपुढं जातो आहे. आता तर आत्तापर्यंतचं सर्वांत जास्त पॅकेज तो घेईल. ही तर एम्एन्सी - आंतरराष्ट्रीय कंपनी. त्यामुळं परदेशी जायची संधी नक्कीच. त्यामुळं बड्या घरच्या मुली चालून येतील. आता कुठं चार-पाच लाख पॅकेज घेणाऱ्या किरकोळ कंपन्या. आपण ब्रेडच्या भाजीत चुकून विचाराच्या भरात दोनदा तर मीठ घातलं नाही ना ? असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला. पण नाही, आपलं तसं चुकणार नाही, याची त्यांना खात्री होती.

बाहेर बाबांना भूक लागली होती. पण आतला संवाद ऐकता, त्यांच्या लक्षात आलं की, आपल्याला आज थोडं थांबावं लागेल. हेमंतला आणखी यश, आणखी संधी, आईची महत्त्वाकांक्षा आणखीच उंचावणार - हे सारं त्यांच्या कधीच लक्षात आलं. नुसतं लक्षात आलं असं नाही - त्याच्यापुढं काय होऊ शकतं हेही !

हेमू तोपर्यंत आवरून आला असावा. आत पुन्हा मायलेकरांचे आवाज सुरू झाले. बाबांनी ठरवलं आपणच आत जावं. ते एकेकाळचे गोल्डमेडॅलिस्ट इंजिनिअर. वाचन चौफेर. वस्तुनिष्ठ. मुळाशी जाणारे. त्यामुळं कर्माचा कर्मयोग साधू शकलेले. त्यामुळं शांत. तेही गुणवत्ता आणि अंगच्या माणुसकीच्या दुर्मीळ गुणावर जनरल मॅनेजरच्या पदापर्यंत सहज पोचलेले. पण त्याचा ना अहंकार, ना कुणावर कुरघोडी.

बाबा आत आले. तोवर त्यांना संवाद ऐकू आलाच.

'तू एकदा बाबांच्या कानांवर घाल ना. एवढं काय त्यात. आपण काळाबरोबर राहिलं पाहिजे. तंत्रज्ञान किती पुढं गेलं आहे. केवढेकेवढे प्रश्न तू सोडवलेस. सगळ्यांशी टसल करतोस....' बाबांची चाहूल लागताच आईला ब्रेक लागला.

'काय म्हणतायत चिरंजीव ? दोघं मिळून कोणता गहन प्रश्न सोडवता आहात ? मला नाही सोडवता आला तर मी निदान ऐकून तरी घेऊ शकेन !' बाबांनी संभाषणात सहज प्रवेश केला.

'म्हणजे काय आहे, बाबा, पहिली कार मी विकावी म्हणतो, व्हॉट आय मीन म्हणजे एक्स्चेंज करावी. बदलावी म्हणतो...' हेमू नाही म्हटलं तरी जरा चाचरला.

कारण स्वतःला कितीही डॅशिंग समजत असला तरी, शांतपणे केवढाही अन् कुठलाही प्रश्न हाताळण्याची आणि सोडवण्याची बाबांची कुवत त्याला माहीत होती. का कुणास ठाऊक त्याला नेहमी वाटे की, बाबांना नजर देणं नेहमी जमत नाही. फार क्वचित. ते पाहातात त्यावेळी आपले अंतस्थ हेतू, न सांगितलेले बेत, विचार - जणू फोटो पाहावे तसे त्यांना दिसतात, असं वाटे. अर्थात ते मुद्दाम तसं काहीच करीत नसत. सहजपणे पहात. बस्स. त्यामुळं त्याला जास्तच अस्वस्थता येई.

आत्ताही या साऱ्यावर ते आईकडं बघून एवढंच म्हणाले, 'खूपच मोठमोठे प्रश्न आहेत. मला वाटतं आपण भुकेचा साधासा प्रश्न आधी सुटतो आहे का पाहूया..!'

आत आल्याआल्या बाबांच्या त्यांतलंही काही लक्षात आलं असणार. पण ते काय हेही हेमंतला कळलं नाही. तसं एवढं वय होऊन, बाहेर कामांचा अनुभव येऊनही पाखरासारख्या वृत्तीमुळं इकडंतिकडं भिरभिर करण्याचीच सवय नि आवड लागली होती. हे बाबाच एकदा बोलले होते.

ते म्हणाले, 'पाखरासारखं करतोस - कर. पण तसा भुंगाही इकडून तिकडं फिरत असतो. तो फुललेल्या फुलावर मधासाठी किती शांत बसतो तेही बघ. मधमाशीही हिंडते. एवढा एवढा मोलाचा अस्सल मध गोळा करताना कशी फिरते, कामात किती एकाग्र असते. आणते तो मध किती जपून साठवते. पोळ्याचं मेणाचं भांडं भरलं की, जगाच्या उपयोगासाठी सोडून देते. दुसरीकडं साठवायला सुरुवात...!' ते आपल्या कधीच नीट लक्षातही आलं नाही, जमलंही नाही, याची त्याला जाणीव झाली.

बाबांची आणखी काही प्रतिक्रिया यायच्या आधीच आईनं तिचा नवा पदार्थ -ब्रेडच्या भाजीचे वडे- तळून त्यांच्या दोघांच्या समोर ठेवला. ते जरा गार होऊ देऊन शांतपणे त्यांनी तो संपवला आणि वाटीभर दही मागवलं. हेमूच्या तोंडातला अजून पहिला घासच संपायचा होता. बाबांनी दुसरा वडा चार तुकडे करून, दह्याच्या बाउलमध्ये टाकून, निवांतपणे खायला सुरुवात केला. कट्ट्याशी काम करणाऱ्या आईचं इकडं लक्ष नव्हतंच.

ती तिच्या नादात म्हणाली, 'झाले ना छान ? त्याची पण भुकेची वेळ आहे...!' तिनं मागं वळून पाहिलं नाही.

हेमूच्या लक्षात येईना आपण आईचं लक्ष कसं वेधून घ्यावं. बाबा शांतपणे खात होते. तो दुसरा घासही खाऊ शकत नव्हता.

'माझ्या एका मैत्रिणीची पाहून माझ्या लक्षात ही नवीन कल्पना आली. त्यात मी आणखी खूप बदल केले. नव्या नव्या गोष्टी वाढवल्या. अगदी तिलासुद्धा कळणार नाही. आता या भिशीच्या वेळेला बोलावणारच आहे तिला. त्यावेळी करीन. तिला काय काय कॉम्बिनेशन केलं हे कळणारसुद्धा नाही..!'

'पण मी म्हणते, बदलू दे गाडी वाटलं तर. आत्तापेक्षा हायर मॉडेल आहे.. बाकी त्याच्या पगाराच्या हप्त्यात बसतं आहे. फार तर तीन-चार लाख आपल्याला द्यावे लागतील. आज आणि त्याच्या नव्या कंपनीतल्या सिलेक्शनचं कळलं ना... मग तो काय सहज ते पुन्हा उभेसुद्धा करू शकेल - परत करू शकेल.' आईची गाडी नॉनस्टॉप चालली होती. बाबांनी ओळखलं की, हे काम पुन्हा एकदा आपल्यालाच करावं लागेल !

'तू खूप प्रश्न एकत्र करू नकोस. सध्या माझ्या एक लक्षात आलं आहे की, तुझ्या मैत्रिणीला तू काय कॉम्बिनेशन केलंस हे नक्कीच कळणार नाही. त्यामुळं ती चकित होईल. अगदी बीटन. हरवणार तू तिला... फक्त एक मात्र आम्हाला कळलं, ते तिला उद्या कळेल की नाही, हे नक्की सांगता येत नाही...' बाबा.

आपण मैत्रिणीला चकित करणार, हरवणार या त्यांच्या वाक्यामुळं सुखावलेल्या रागिणीच्या डोक्यात त्याचंच चिंतन सुरू होतं. बाबा शेवटी काय म्हणत होते तेही तिच्या लक्षात आलं नाही. ती नवी गाडी, नवा पदार्थ, मैत्रीण - यांतून बाहेर येणं कठीण आहे, हे बाबांना त्यांच्या अनुभवावरून लक्षात आलं.

ते स्पष्ट म्हणाले, 'मला वाटतं, तूही आता आमच्याबरोबर तुझा नवा पदार्थ घे.'

'हो झालंच माझं. मीही येते...' कट्टा आवरून त्या त्यांचा तो नवा

पदार्थ खायला बसल्या. हेमूचा नेहमीचा डॅशिंग चेहरा का पडत चालला आहे, त्याकडं त्यांचं लक्षही नव्हतं. गाडीचं एक्सचेंज हा पुन्हा सर्वांना सांगायला, दाखवायला, खरं तर अनेकांना हेवा वाटावा असा एक चर्चेचा विषय. त्यात आता पुढं त्याचं लग्न, मग तर काय सारं... आपल्याला प्रमोशन, सगळं निवांतपणे थाटात करून घ्यायचं..' विचारातच तिनं हातात बाउल घेतला.

एकदम त्या पदार्थाचा उत्साहात घास घेतल्यावर त्यांना ठसका लागला. भराभरा त्या पाणी प्याल्या. त्यांना क्षणभर ढवळल्यासारखं झालं. बाबा शांतपणे पाहात होते. त्यांनी पाणी पुढं केलं.

त्याची नवी कंपनी, गाडी, वरची ग्रेड, पदार्थ...त्या कुठल्या विश्वात असतील ते समजणं त्यांच्या डाव्या हाताची गोष्ट होती. सांगण्याच्या घाईत असलेल्याचं इतरांबद्दलचं आकलन कमी असतं. सांगतासांगता समजून घ्यायचा प्रयत्न करणाऱ्याचं थोडं जास्त असतं आणि शांतपणे स्वतः काही न सांगता दुसऱ्याचं एकाग्रतेनं ऐकणाऱ्याचं इतरांचं, परिस्थितीचं आकलन सर्वांत जास्त असतं, हे ते जाणून होते.

आता बाबांनी दह्याची वाटी पुढं केली.

'किती खारट झालं आहे हे ! बोलायचं नाही का ?' आता त्या खरं तर स्वतःवरच चिडल्या होत्या. बाबांना बोलता येतच नव्हतं, कारण ते काही म्हणतच नव्हते, त्यांची तक्रारच नव्हती.

शेवटी त्या हेमंतला म्हणाल्या, 'हेमू, अरे तुझ्या तरी लक्षात यायला पाहिजे. चांगली जपान अन् अमेरिकेत उत्तरं देतोस, बोलतोस...'

'अग...म्हणजे काय झालं... व्हाट आय मीन मी अजून खाऊच शकलो नाही...' हेमू उत्तर देतानाही धडपडला.

बाबा शांतपणे म्हणाले,' तू आधी हे दह्यात भिजवून खाऊन बघ. तुला आणखीच एक नवा पदार्थ सुचू शकेल आणि हाही खाता येईल. एवढं

काही बिघडलं नाही.'

रागिणीची अस्वस्थता त्यांच्या शांतपणानं अधिकच वाढली. बरं काही बोलावं तर त्यांनी कुठलीच तक्रार केली नव्हती. दह्यात तुकडे करून टाकून त्यांनी उलट आणखी एक वडा खाल्ला होता.

'तरी आधीच ब्रेडची भाजी करताना मला शंका आली होतीच. मी बोलण्याच्या नादात दोनदा मीठ घातलं की, काय ? पण माझं सहसा असं होत नाही !'

बाबा शांतपणे पुढं, 'बरोबर आहे ! नादात असलं तर असं होतं आणि सावधानता असली तर तसं होणारही नाही.'

त्यांना दोघांनाही, या वाक्याचा अर्थ कळणार नाही, हे लक्षात येऊन ते झटकन हसत म्हणाले, 'तरी मी तुला मगाशी म्हटलं ना की, तू काय काय कॉम्बिनेशन केलंस ते त्यांनासुद्धा कळणार नाही, हे खरं आहे. पण एक मात्र आम्हाला कळू शकलं ते बरोबर आहे की नाही ? पण उलट आम्ही हे दही मागून आणखी नवं कॉम्बिनेशन केलं हे तुला आता कळलं की नाही...!'

रागिणी एरवी चिडली असती, एखाद्या वेळी कमीजास्त झालं तर काय झालं, कुणाची चूक होत नाही का... पण आज अजून बऱ्याच चांगल्या गोष्टींच्या मूडमध्ये बिघाड नको म्हणून ती गप्प बसली. तिनं तिचा सारा नवा पदार्थ ठेवलेले ते बाउल उचलून घेतले.

म्हणाली, 'हे जाऊ दे. त्याची काही अशी सुधारणा व्हायची नाही. मी सरळ चटकन साधा शिरा करते.'

बाबा म्हणाले, 'आम्हाला चालेलच. पण तू हे जे सरळ साधं काही करायला तयार झाली आहेस तेच फार मोलाचं, चांगलं आहे...!'

शिरा खरोखरच चटकन झाला. तिघांच्या समोर बाउल आले. हा साधा, सरळ पदार्थ खरोखरच एक नंबर झालेला होता. बाबांना आपल्या

पत्नीकडं बघून खूप गोष्टी मनात येत होत्या. ते त्या काळातले उत्तम पदवीधर, चांगल्या पगारावरचे असूनसुद्धा त्यांनी या सामान्य मुलीशी एका ध्येयानं लग्न केलं होतं. तशा किती पदवीधर, चांगल्या नोकरदार मुली त्यांनी नाकारल्या. या मुलीला वडील नाहीत. आईला फारसं शिक्षण नाही. मुलगा अजून शाळकरी, ही मॅट्रिक. खर्च चालवायलासुद्धा चार कामं केल्याशिवाय पर्याय नाही. किती कष्ट केले तरी संध्याकाळी गरीबीची गाठ अटळच होती.

मध्यस्थाला सुचवतानासुद्धा संकोच होत होता. फक्त एका गरीब पण चांगल्या मुलीचं आयुष्य उभं राहील या मुद्यावर त्यांचं बाबांशी एकमत झालं. भाजीभाकरी मिळणारी मुलगी उलट त्यांच्या तशा स्थिर, समृद्ध आयुष्यात समाधानी राहील, जेवण-खाणं-कपडालत्ता-घर, अशा गोष्टींत साधेपणानं राहील. मुळात घरी काहीच नसल्यानं या गोष्टींत तिच्या अपेक्षा फार नसतील, नव्हत्याही आणि ते सुखाचं होईल, असं त्यांना वाटलं होतं.

पण प्रतिकूलता आणि गरीबी या माणसाला अपेक्षांच्या बाबतीत जमिनीवरच ठेवतील हा त्यांचा समज ते चुकीचा ठरताना ते पाहात होते. अनवाणी फिरणाऱ्याला आपुलकीनं चप्पल द्यायला जावं तर, बूट कधी मिळणार, सायकल कधी देणार - अशा वाढत्या अपेक्षा नि महत्त्वाकांक्षा जास्तीच चढत्या होतात की काय, असं त्यांना अनुभवानं वाटू लागलं. ती भुणभूण त्यांच्यामागं लागलीच - वस्तू, खरेदी, घर, गाडी ! ते स्थिर होते म्हणूनच ते हा गरीबीचा उधळलेला घोडा थोडा तरी रोखू शकले.

ध्येय तर त्यांनाही होतं. कार्यकुशलता होती. पण महत्त्वाकांक्षा नि हाव नव्हती. स्पर्धा तर अजिबात नव्हती. म्हणून त्यांच्याशी स्पर्धा करणाऱ्यांपेक्षाही आधीच ते बढतीच्या पायऱ्या शांतपणे चढून गेले. त्याचा त्यांना कुठला अहंकारही नव्हता.

पण त्यांना पत्नीकडं पाहिलं की वाटे की, हीच का ती साधी गरीब

मुलगी ? आपल्याला होकार मिळाल्यावर, अविश्वासानं चकित आणि आनंदित झालेली ! पुढं घरी आल्यावर हे हवं, ते हवं सुरू झालं. ते म्हणत गरज पाहा. जरूर घ्या. करा. पण कुणीतरी काहीतरी केलं म्हणून काही करू नका. वरचढ होण्यासाठी, त्याच्याशी स्पर्धा करण्यासाठी, स्वतःचं महत्त्व, वेगळेपण वाढवण्यासाठी करू नका. तो उथळपणा आहे.

पण रागिणीला आतून ते पटत असलं तरी, बायकांचे ग्रुप, भिशी, मंडळं, कार्यप्रस्थ - कुठल्या ना कुठल्या प्रसंगानं, कारणानं तिची ही बालिश अन् केविलवाणी स्पर्धा सुरू होई. हेमंतच्या जन्मानंतर तर त्यांना स्पर्धेत उतरवायला अक्षरशः एखादं घोडं मिळावं तशी तिची अवस्था झाली. सुदृढ बालक काय, पाठांतर काय, पोहणं काय - कुठल्या स्पर्धेत तिनं त्याला हिरीरीनं उतरवायचं सोडलं नाही. त्याला तशी बुद्धिमत्ता बऱ्यापैकी असल्यानं यश. मग त्याची चौथीची स्कॉलरशिप म्हणजे आईचीच चौथीची स्कॉलरशिप, त्याची सातवीची स्कॉलरशिप म्हणजे आईची स्कॉलरशिप. लग्नकार्यपाहुणे-देव-सण - सर्व बंद. त्याला यश मिळालं हे खरं. पण इतकं अतिरेकी महत्त्व देणं हा आत्मनाश आहे, असं त्यांना वाटे. फक्त तो प्रवास आजवर तसाच आग्रहानं, चढाओढीनं सुरू होता.

तेच करीत आल्यानं हेमूचा स्वभावही हळूहळू आत्मकेंद्रित, अहंकारी, चढाओढीचा, इतरांना तुच्छ समजणारा झाला. हा सारा उथळपणा आहे, हे ते जाणून होते. फक्त त्यानं जी बेसावधता आली, तिचे परिणाम यांचं जे नुकसान करणार होते, त्याबद्दल फक्त ते काळजीत होते.आपल्या परीनं प्रयत्नही करीत होते.

तरीही हेमूच्या घटस्फोटाचा प्रसंग ते टाळू शकले नव्हते.त्याच्याबद्दल आता कुणी चर्चाही करीत नव्हतं. तिनं साधारण याचा रागरंग ओळखला आणि दूर राहाणं पसंत केलं. मी, माझी करियर, माझं ड्रायव्हिंग, माझं

सर्कल, पार्टी - यांतली काहीच तडजोड तो आपल्या आयुष्याच्या साथीदारासाठी करू शकत नव्हता. वास्तविक ती त्याच्याच क्षेत्रात होती. कुवतीनं पुढंही होती. त्याचं त्यानं साधं कौतुकही केलं नाही. आत्मकेंद्रित माणसाला दुसरा दिसतच नाही, तर त्याचं कर्तृत्व, कौतुक, साथ, मदत - सारं दूरच. फारच झालं तर ती पगारात, पोस्टमध्ये आपल्या पुढं जात नाही ना, यावर त्याचं लक्ष जाऊ लागलं. स्वभावांच्या दिशा एकदा चुकल्या की प्रवास किती चुकीच्या दिशेला होत राहातात, असं त्यांना राहून राहून वाटे.

तिला हवंच असेल तर तिच्याकडं योग्य लक्ष, तिची काळजी एवढंच. तिच्या ऑफिस-पोस्ट कशात लक्ष घालणं अशी तिची अपेक्षा नव्हतीच. ते सगळं तिचा शेअर करण्याचा स्वभाव होता. पण तो एक जोडीदार, हितचिंतक म्हणून. स्पर्धक म्हणून नव्हे. ती त्या करिअरमध्ये पार अडकलेलीही नव्हती. घरात गरज असेल तर, ती ते सारं सोडून आनंदानं घर सांभाळायलासुद्धा तयार होती. पण हळूहळू रागिणीचा स्वभावही तिच्या लक्षात आला. घर अजूनही तिला तिच्या ताब्यात ठेवायचं होतं. शिवाय हेमू आणि आली तर ती सून शिवांगी तीही त्यांना त्यांच्या स्वतःच्या ताब्यात घ्यायची होती. तू नोकरी कर, माझा तुला सपोर्ट आहे. घरची काळजी करू नकोस ! हे त्या जेव्हा म्हणत होत्या, तेव्हा बाबांना त्यांचा अंतस्थ हेतू लक्षात येऊन गंमत वाटे ! थोडी काळजीही !

त्यांना कळे की, आपले स्वार्थी हेतूसुद्धा मनुष्य दुसऱ्याला कळू नयेत, अशा पद्धतीनं मांडू शकतो. इतकंच काय, त्याला निःस्वार्थाचा रंग देऊन, ते आकर्षक करू शकतो. याचं त्यांना मनुष्यस्वभाव म्हणून आश्चर्य वाटे. वास्तविक मूळ इच्छा घर आपल्या ताब्यात राहावं. अबाधितपणे. दुसरं माणूस आता आत आलं - तेही काम करू शकणारं, तरीही !

कारण घरी राहिली आणि आपल्यापेक्षा चांगलं सांभाळलं तर

असूया नकळत होणार. तीच चांगलं सांभाळते असं बाकीच्यांना वाटायला लागलं तर आपलं स्थान आणखीन डळमळेल ! मग घरी राहिलंच तर चुका नि उणिवा दाखवायच्या. म्हणजे त्या गरजेपेक्षा बाहेर वेळ काढणं ती आपण होऊनच पसंत करील. मग पुन्हा वर म्हणता येतं, तिला कुठं घरात करमतं आहे. नोकरीची सवय झालेली ! आणि वर चांगुलपणा घेऊन सांगायचं, सुदैवानं मी बघते आहे घरात सगळं. उलट त्यांना आत्ताच करिअर शक्य आहे, मीच म्हटलं माझा पाठिंबा आहे. तू कंपनीत हजर हो. मला त्रास पडला तरी चालेल, मी सांभाळीन ! मनुष्याचं मन त्याला फसवून आपल्या स्वार्थ - अहंकाराच्या ताब्यात त्याला कसं बेमालूम ठेवतं ! लक्षात नाही आलं तर, असं जगायला लावून शेवटी त्याला सत्ता- प्रकृती - अशा अनेक बाजूंनी दुर्बल करून म्हातारपणी अस्वस्थतेनं संपवून टाकतं !

रागिणीनं किती अवसान आणलं तरी तीही आतून ओळखून होती की, शांततेत, कौशल्यात, जनसंपर्कात, माणसं सांभाळण्यात बाबा तिच्या खूप पुढं होते. त्यांनी कुठली अपेक्षा न करतासुद्धा त्यांना बाहेर मनापासून आदर होता. ते आपण होऊन बाहेरच्या कुणाला काही सांगायला जात नसत. विचारायला येणाऱ्याला आस्थेनं सल्ला देत. प्रश्न लोकांचा असो, हेमूचा असो, शिवांगीचा असो की, आणखी कशाचा ! आपण किती उत्साह दाखवला तरी शेवटी तो कौशल्यानं, योग्य तऱ्हेनं तो प्रश्न शेवटी बाबाच सोडवणार होते.

बाबांना प्रश्न सोडवण्यात रस नव्हते. चुकीच्या विचारांनी, बालिश महत्त्वाकांक्षा नि कल्पनांनी स्वतःच स्वतःचं आणि जवळच्यांचंही नुकसान लोक करून घेत, ते टाळण्यात त्यांना रस होता. निदान माणसाला टाळता येणाऱ्या गोष्टी समजून टाळल्या, तरी तो खूप सुखी होऊ शकतो, यावर त्यांचा विश्वास होता.

हातातला बाउल संपवून उलट बाबांनी नाश्ता आणखी मागून घेतला. त्याचा आता रागिणीला मिळालेला आनंद सात्त्विक होता. तिच्याच असात्त्विक आणि असहज गोष्टी दूर झाल्यावरचा तो आनंद खरा होता. बाबा धडपडत होते ते त्यासाठीच. आत्ता एक साधासाच पदार्थ खाऊनही लाभलेल्या स्वास्थ्यानं इतका वेळ उन्मादात नि अस्वस्थतेत असलेला हेमूही स्तब्ध, शांत झाला होता. त्याला आता त्या स्पर्धा, गाड्या, नव्या कंपन्या असले विषय काढण्याचीही आतून खरं इच्छा राहिली नव्हती.

बाबांनी ओळखलं की, आता पुन्हा एकदा आपल्यालाच पुढाकार घ्यावा लागेल, इच्छा नसली तरी. कदाचित यांची आयुष्यातली चुकीची मूल्यं, कल्पना बदलायची वेळ आली असली तर ते सर्वांच्याच हिताचं ठरेल. आपला हेतू चांगला आहे. आपण पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहू. ते म्हणाले, 'बरं, आता आपण आपले इतर मोठे प्रश्न पाहूया ?'

रागिणीला वाटलं की, हे कदाचित आत्ताच्या पदार्थाच्या पार्श्वभूमीवर एकदम गाडीला होय - नाही म्हणाले तर ? कंपनी, प्रमोशन इतर विषय एकवेळ हेमू पाहू शकेल नंतर. म्हणून त्या म्हणाल्या, 'हो, गाडीचंच ना, करू दे ना वाटलं तर एक्स्चेंज !'

'हेमंत, तुला काय वाटतं. लगेच करावं की, सवडीप्रमाणं करूया ?' बाबा.

'मला वाटतं आता मार्केट जरा डाउन आहे. चांगली मॉडेल पण आहेत. त्यामुळं लगेच केलं तरी चालेल अर्थात....' हेमूच्या स्वरात जोर नव्हता. '..तुम्ही म्हणाल तसं करूया..!'

आईला झालेली गडबड तिच्या चेहऱ्यावर दिसतच होती.

अखेर बाबांनी शांतपणे आईला म्हटलं, 'रागिणी, त्याची गाडी बदलायची गडबड मार्केटमुळं नाही...! मला वाटतं मी म्हणतो आहे ते

बरोबर आहे ना हेमू ?'

आई गोंधळली. हेमूनं मान खाली घातली. आईला आणखीच कळेना. बाबांनी पुढं म्हटलं, 'रागिणी, मी अनेकदा तुम्हाला स्पर्धा, दिखाऊपणा, भपका, खोटी प्रतिष्ठा, अहंकार...यांबद्दल बोललो आहे. तुम्हाला ते पटत नाही, असं नाही. पण प्रत्यक्षात आणताना पुन्हा मन ओढ खातं. पण आता मात्र मला सर्वांच्याच हितासाठी स्पष्ट बोलणं अणि कशामुळं काय घडतं आहे, हे सांगणं भाग आहे. हेमू ! उद्याच्या उद्या किंवा परवा गाडी बदलून प्रश्न सुटणार नाही ! बरोबर ?'

'प्रश्न ? म्हणजे मी नाही समजले !' आई.

'समजेल. जरा थांब. हेमू, तू सांग गाडी बदलून तुला पोलिसस्टेशन चुकणार नाही.' बाबा. 'तुला तसं वाटत असेल तर, आणखी स्पष्ट सांगतो..'

हेमू दिङ्मूढ झाला. चकितही. बाबांचा जनसंपर्क त्याला माहीत होता. त्यांची प्रतिभा माहीत होती. आईला पहिला धक्का बसलाच होता. तरी ती जरा जोरातच म्हणाली, 'हेमू, हे पोलिसस्टेशन काय आहे ?'

बाबा म्हणाले, 'मी सांगतो. शांत राहा. या गाडी नंबरसह याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे ! गाडी गडबडीनं बदलण्याच्या त्याच्या प्रयत्नानं तो सटकू शकणार नाही. गाडी बदलून आपण सुटू असली फिल्मी कल्पना त्यानं न करावी, हे बरं, काय हेमू !' दोघांकडंही बघत ते क्षणभर शांत राहिले.

आईच्या पायाखालची जमीन सरकली. पुन्हा खुर्चीत बसत ती म्हणाली, 'म्हणजे हेमूनं काय अपघात वगैरे केला आहे का ? काय झालंय ?'

'नाही, एकवेळ अपघाताची केस असती तरी जरूर काही करता आलं असतं. पण ही जी स्पर्धा नि खुन्नस शिकवताय ना, ती महागात पडली. जीवन हे सिनेमावर चालत नाही. त्याचं अनुकरण करायला गेलेत

चिरंजीव. गाडीला दुसऱ्या गाडीनं ओलांडणं म्हणजे अपमान वाटला. त्यात ज्या गाडीनं ओलांडलं ती गाडी मुलीची होती. त्यामुळं खुन्नस वाढली. भान नाही राहिलं. ती गाडी तिच्या वेगानं जाऊ द्यायची. पण तुम्ही हरायचं नाही शिकवलंय ! मला सांगा, असं जगात आजवर थोरामोठ्यांना जमलेलं नाही. तरी हेमूनं स्पीड वाढवून मुद्दाम गाडी त्या मुलीच्या गाडीच्या पुढं काढून मुद्दाम समोरनं हळूहळू चालवायला सुरुवात केली. यापेक्षा काही सांगायला नको. अंदाज चुकला. मागच्या गाडीनं थोडावेळ पाहिलं आणि मागची गाडी इतक्या सहज बाजूनं ओव्हरटेक करून पुढं गेली, ते महाशयांच्या लक्षातही आलं नाही. नशीब परत चिडून पुढं काढायला गेले नाहीत. आपलंच नशीब ! ती गाडी ओव्हरटेक करून पुढं जाऊन रस्त्यात मधोमध थांबली. त्या गाडीतून पोलीस अधिकारी आधी उतरले. हात वर करून हेमूची गाडी थांबवून, बाजूला घ्यायला लावली. नुसताच अतिवेग, चुकीची गाडी ओलांडणं हा प्रश्न नव्हता...'

आई उत्सुक होती. पण इकडं सुन्नही झाली होती. हेमूला कळेना की, बाबा ही सगळी घटना अशी डोळ्यांसमोर घडल्यासारखी कशी सांगत आहेत आणि ते कुठपर्यंत सांगतील. 'त्यावेळीसुद्धा अजून जोर धरून तो 'क्यूँ, क्या हुवा ?' म्हणाला. पण आतल्या पोलिस अधिकाऱ्यांनी त्याच्या हातात मेमो ठेवला.'

बाबा, 'मला वाटतं तुला पोलिस स्टेशनला हजर राहायची नोटीस लेखी आहे. तुझी पोच घेतलेली आहे. तुझं म्हणणं तू काल हजर राहून सांगू शकला असतास. पण तुला ते रेससारखं वाटतं आहे, अजूनही ! न जाता तू चुकवू शकशील असं वाटतं ?' त्यांनी हेमूकडे पाहात विचारलं.

'अगदी खात्री नाही, पण इतकं काही माझं ड्रायव्हिंग रॅश नव्हतं...असं वाटतं बाबा..' हेमूचा स्वर आता खाली आला होता.

'हेमू रॅश ड्रायव्हिंगचा विचार नंतर करू. तू कुणाची गाडी कुठल्या हेतूनं ओव्हरटेक केलीस त्याची तुला कल्पना आहे ?' बाबांनी स्पष्ट विचारलं.

'नाही. एक मुलगी चालवीत होती. मला वाटलं, माझी गाडी ती मुद्दाम ओव्हरटेक करते आहे म्हणून तिला जरा हिसका दाखवावा...'

हेमूला अडवीत बाबा म्हणाले, 'अरे, तुझ्या डोक्यात साधा विचार यायला हवा होता की, तिच्या गाडीत मागच्या सीटवरून पोलीस अधिकारी उतरतात ती चालवणारी कोण असेल ?'

'मला वाटलं, त्यांची मुलगीबिलगी असेल...!' हेमू.

'जगाची ओळख अजून नीट व्हायला हवी, राजा ! हे सॉफ्टवेअर नाही. क्लिक केलं की, ठरल्याप्रमाणं चालत राहाणारं किंवा किचकट प्रोग्रॅमिंगही नाही, लॉजिकनं सोडवीत जावं असं. ती मुलगी नव्हती - चेष्टेनं घ्यायला. महिला आयोगाच्या वतीनं आता महिलांच्या बाबतीत होणाऱ्या असल्या वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी नेमलेल्या स्पेशल स्क्वाडच्या त्या इन्चार्ज ऑफिसर आहेत. त्या आयपीएस केडरच्या आहेत.' बाबा सचिंत मुद्रेनं म्हणाले.

'बाप रे !' हेमू आता मात्र गर्भगळित झाला.

रागिणी आता पार थिजून गेली होती. दोघांनाही आता एकच आधार होता, बाबा ! थोडा वेळ सर्वत्र शांतता होती.

'तुम्हाला वाटेल मी पुन्हा पुन्हा तेच सांगतो आहे. पण ते सत्य आहे.सद्‌गुण, सरळपणा, समजूत, क्षमा, शांती - यांत आणि त्यामुळं होणाऱ्या स्वास्थ्यातही कधीच फरक पडणार नाही. पण तुम्ही आता तरी माझा सल्ला ऐकणार आहात का ?' बाबांनी स्पष्ट विचारलं.

'होय, आम्ही तयार आहोत. आमचं तसं खूप चुकलं आहे. तुम्ही मार्ग सांगा. शिक्षा सांगा. काहीही सांगा. आम्ही करू.' हेमू जणू त्याच्या आणि त्याच्या आईच्या वतीनं बोलला. आईनं सुन्नपणे होकार दिला.

'हेमू, तुला वाटेल हे सर्व मला कसं माहिती ?'

'नाही बाबा, मी जाणून आहे.. तुम्हाला खूप लोकं मानतात. मोठमोठ्ठे. तुमच्यासाठी कुणीही काहीही करील...' हेमू अजीजीनं म्हणाला.

'हे पहा, इथले एस्.पी. माझे जुने मित्र आहेत. तू रिपोर्ट न केल्यानं त्या आय्.पी. एस्. महिला अधिकाऱ्यानं रिपोर्टिंग केलेलं त्यांच्या पाहाण्यात आलं. त्यांनी ओळखलं काय झालं असेल. तरीही त्यांनी त्या अधिकाऱ्यांना एकत्र बोलवून घटनेची माहिती घेतली. तुला दिलेल्या मेमोपासून साऱ्या प्रसंगाच्या सीसीटीव्ही रेकॉर्डिंगपर्यंत...! त्यांना पुढची प्रक्रिया जरा थांबवायचे आदेश दिले. अजूनही हे सारं ऑफ् द रेकॉर्ड ठेवायला त्यांनी सांगितलं आहे. मला फोन करून कल्पना दिली. आम्ही बाहेर एकत्र आलो. पर्यायांची चर्चा केली. कायद्याच्या चौकटीत त्यांनाही वावरणं भाग आहे. कैद झाली तर सारंच अवघड आहे ..!' बाबा थांबले.

दोघंही आगतिकपणे त्यांच्याकडं पाहात होती. ते म्हणाले, 'हे पहा, हेमू आपलं चुकलं आहे, हे आधी तू लक्षात घे ! तुझ्या गांभीर्य लक्षात येत नाही म्हणून मला सांगावं लागतं. आपलं काय झालं, आपण आहोत कुठं आणि ॲल्युअरची स्वप्नं बघतो आहेस ! तुला तुझ्या सहकाऱ्यांना मागं टाकायचं आहे. परदेशात जायचं आहे. तुला काय वाटतं, या पार्श्वभूमीवर तुला पासपोर्ट काय घरी आणून देतील. निदान असली हवेतली स्वप्नं पाहू नकोस...'

'नाही बाबा, आय ॲम् सॉरी...!' हेमू रडवेला झाला.

'हेमू, तू मोठा पण तुझ्या कुवतीप्रमाणं हो. कुणाला पायाखाली घालून, स्पर्धा म्हणून नको ! स्पर्धेला स्पर्धेनंच उत्तर मिळतं ! नेहमीच कुणी जिंकत नाही. मग पराभव सगळा आनंद घालवून टाकतो. कुणापेक्षा मोठं होण्याची, कुणाला खिजवण्याची कल्पनाच चुकीची आहे. तुला जास्त येत

असेल तर त्याचा उपयोग मोनोपॉलीसाठी करणं गुन्हा आहे, ज्याला ते येत नाही - त्याला ते देणं हा सद्गुण आहे. तुलाच दुवा मिळेल. लक्षात ठेव त्यानं तुझं नुकसान होणार नाही. तू ऐकते आहेस ना रागिणी !'

रागिणीनं मान हलवली.

'तू इतक्या गरीबीतनं आलीस. तसं सारं चांगलं आणि अपेक्षेपेक्षा जास्त मिळालं, त्यानं आनंदी राहायचं सोडून तूही किती महत्त्वाकांक्षी बनत जाते आहेस. खरंच मनापासून सांगतो. ते बदल ! बाकीचे प्रश्नसुद्धा सुटतील...'बाबा.

'हेमू, एक नक्की मी तुझ्यावतीनं वरिष्ठांकडं माफी मागितली आहेच पण आउट ऑफ रेकॉर्ड त्यांना योग्य वाटेल ती शिक्षा किंवा तोंडीलेखी माफी असा मध्यम पर्याय आम्ही काढला आहे. त्या लेडी ऑफिसरशी ते बोलू शकतील. पण मुळात तुझी ते करायची तयारी आहे का ? आणि ते तर करच पण तुला तुझी ही जीवनपद्धती सुधारायची आहे का, हे मला महत्त्वाचं आहे. तुझंच नव्हे आम्हा सर्वांचंच त्यात हित आहे...'बाबा त्याच्या प्रतिक्रियेसाठी थांबले.

हेमूच्या लक्षात आता गांभीर्य तरी आलं होतं. त्यानं आईकडं पाहिलं. आईनं त्याला हार न मानायला शिकवलं होतं. चुकीचा मार्ग असला तरी, आपलं म्हणणं, स्वार्थ, अहंकार - यांना पाणी घालायला शिकवलं. त्यामुळं तो थोडा संभ्रमात होता, सारं पटलं तरी.

रागिणीला क्षणभर आपले माहेरचे गरीबीचे दिवस अन् बाबांच्या औदार्यापासूनचा सारा प्रवास डोळ्यांसमोर तरळत होता. आपण खरं तर सरळ असलेलं जीवन उगीचच काट्याकुट्यांनी भरून टाकलं. बाबांच्या उपकाराची फेड तर राहूद्याच, त्यांना त्रासच निर्माण केले. त्यात पुन्हा हेमूच्या आयुष्याला असलंच स्पर्धेचं, अहंकाराचं वळण लावून प्रश्न आणखी वाढवले.

हे त्यांना दिसत होतं. साऱ्या चुका, परिणाम समोर होते. फक्त एकदाच चुकीचे मार्ग सोडायचं धाडस करायचं होतं.

बाबांना अंदाज होता. त्यांची सरळ, निःस्वार्थी, प्रेमळ, उदात्त जीवनाची ती हाक होती. ते पुढं म्हणाले, 'तुम्ही दोघंही अजून विचार करा. शिवांगीचा प्रश्न असाच तुम्ही लोंबकळत ठेवला आहे. नात्यानं ती सून म्हणून आली होती तरी ती समजुतीनं, विचारानं मला मुलीसारखी होती. तिचा तरी प्रश्न कशातून निर्माण झाला आणि तिनं तरी जाण्याचा निर्णय का पत्करला? आजही त्या मुलीला तुमच्या या नकारात्मक, उथळपणाच्या अडचणींशिवाय कुठली अडचण आहे ? तिनं तुम्हाला कोणता त्रास दिला ? तिनं शांतपणे बाजूला व्हायचं ठरवलं ! पण घटस्फोटाचा शब्द तिनं अजून कधी काढला नाही...तुम्हाला वाटतं आहे ती चुकली ?' बाबा प्रतिक्रियेसाठी थबकले.

रागिणी म्हणाली, 'बाबा, नाही. ती खूप सरळ मुलगी आहे. ती खरं तर खूप बुद्धिमानही आहे. उलट तिच्या ठिकाणी बुद्धीचा, तिच्या करियरचा कुठला तोरा कधी दिसला नाही...मीच अधिकार गाजवला, नावं ठेवली, वेळी हेमूलासुद्धा भरवून दिलं. ती शांतपणे गेली त्याची किंमत मला आज कळते आहे. ती असती तर आज मी तिला नक्की वेगळी वागणूक दिली असती. !'

'बाबा, मला तुमचं म्हणणं पटलेलं आहे. मी आजवर या गोष्टींची हेटाळणी केली, त्याकडं दुर्लक्ष केलं. मी भ्रमात जगत होतो. आईनं जी बदलण्याची तयारी दाखवली त्यामुळं मला धीर आला आहे. पण आत्ताची ही केस आणि ते सारं कसं निस्तरलं जाईल ? तुम्ही म्हणाल ते करायची माझी तयारी आहे. इतकंच नाही तर, हे सारे चुकीचे विचार, संस्कार पुसण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. शिवांगीवरही अन्यायच झालेला आहे. इतर मुली किती विचित्र वागू शकतात, किती अडचणीत आणू शकतात ते मी बाहेर

अनुभवतो आहे. तिला एवढा मानसिक त्रास होऊनही तिनं मला एका साध्या मेसेजनंसुद्धा तक्रार-नाराजीचा शब्द वापरला नाही. तिला माझ्याकडून घटस्फोटासाठी रीतसर सहकार्य हवं असेल तर मी ते देईन. मी माझ्या स्वभावानं तिला न्याय देऊ शकलो नाही. तिला तिच्या मार्गानं अवश्य जाऊ दे. तिचं आयुष्य असं अडकवून ठेवण्याचा मला काहीच हक्क नाही. माझं तिला पटेल न पटेल. माझ्यावतीनं तिला तुम्ही सांगितलं तरी चालेल, मी ते पाळीन...!' हेमूनं कबूल केलं.

बाबा या साऱ्या सात्त्विक स्वगतांनी स्तब्ध झाले.

त्यांनी परत एकदा खात्री करण्यासाठी दोघांनाही विचारलं, 'तुम्ही सर्व गोष्टींवर नीट विचार केला ना ? एखाद्या संकटामुळं त्यातून सुटण्यासाठी तुम्ही म्हणत असाल तर ती पळवाट ठरेल ! बदल तात्पुरता, स्वार्थी ठरेल.असे बदल सोपे नसतात, याची मला कल्पना आहे, पण ते अशक्य नसतात हेही खरं !'

रागिणी म्हणाली, 'बाबा, मी तरी माझ्या बदलांशी ठाम आहे. मला ते सारं पटलेलं आहे. मी अगदी आजपासून तयार आहे.. हेमूनं सांगितलंच, तशीच माझी वाईट प्रतिमा शिवांगीच्या मनात असणार. ते स्वाभाविकच आहे. पण त्याबद्दल मला आता वाईट वाटतं. तिच्यापर्यंत ते पोचवता आलं तर पोचवा. नसेल तरी मला हे मनोमन वाटतं आहे, हे मात्र नक्की. कागदपत्रात, संमतीत तो म्हणतो तशी मदत हेमूनं जरूर करावी !'

'माझंही सारं मनापासून आणि नक्की आहे, बाबा ! माझी ती करियर, पैसा नि परदेशवारी आणि सारे हव्यास मी सोडले समजा !' हेमूही ठाम होता.

बाबा म्हणाले, 'मी तुम्हा दोघांनाही धन्यवाद देतो. देर आए, दुरुस्त आए. तुम्ही थोडं उशिरा हे सारं लक्षात घेतलंत, करता आहात. पण

तसाही फार उशीर नाही झालेला. अजूनही सहज, सरळ, प्रेमळ, उदार, नम्र जीवन जगायला भरपूर वर्षं आहेत. मला तरी काय तुमच्या स्वास्थ्याची काळजी वाटते. आजही तू तुझ्या कुवतीप्रमाणं कंपनीचं काम करीत राहा, त्यात प्रगती कर. त्या अर्थानं स्पर्धेबद्दल माझी तक्रार नसते. मला वाटतं आपल्याला मिळालेल्या बुद्धिमत्तेचा, भावनांचा, क्षमतांचा कालच्यापेक्षा आज, या वर्षापेक्षा पुढच्या वर्षी जास्तीत जास्त चढता विकास करणं - हीसुद्धा स्पर्धाच आहे. पण ती निकोप आहे. त्यात इतरांचा काही संबंधच नाही. ती इतर कुणाशी स्पर्धा नाही. त्यामुळं दुसऱ्यांच्या मागे असो वा पुढं - खंत, राग, असूया, मत्सर यांना स्थानच नाही.'

'उलट, अशा पद्धतीनं कुणाच्याही क्षमतेचा पूर्ण विकास त्याला शक्य होईल ! त्यामुळं तू तुझ्या कंपनीत प्रयत्न करीत राहा. तुला संधी मिळतच राहील. खरोखरच कंपनीत अडचण असेल, कंपनीलाच तोटा असेल, ती ठेवू इच्छीत नसेल तर दुसरीचा विचार करायचा. तुला जोपर्यंत तुझ्या गरजेचं कंपनी देते आहे तोपर्यंत आपण तिला सोडण्याचा विचार करायचं कारणच नाही. आज लॉयल्टीचा विचार मागासलेला वाटतो, पण कशावर ? तर प्रगतीच्या नावावर संधी-पैसा यांचा अधिकाधिक हव्यास या कसोट्यांवर ! हे कधीतरी काळ चूक ठरवणारच. तोटा झाला तरी सोसण्यासारखा असेल तर तिथंच थांबावं. ज्या कंपनीनं आपल्याला अडचणीत हात दिला तिला अडचणीत हात देणं, हे काय आपलं कर्तव्य नाही ? दिवस पालटत असतात. निदान थोडी सबुरी दाखवावी. दुसऱ्यानं जास्त पैसे दिले त्याच्या मागं जायला आपण काय लिलावातली वस्तू आहोत ? निदान पशूंएवढी तरी इमानदारी आपण दाखवू शकू ना ?' बाबा.

हेमू म्हणाला, 'बाबा आमचे एच. आर. हेच म्हणत होते. तुम्हाला इथंही संधी आहे. आम्ही जरूर देऊ. पण मी ऐकण्याच्या मनःस्थितीत

नव्हतो. मी माझा बदललेला बेत त्यांच्या कानांवर घालीन. इतर प्रलोभनांचा वेळ वाचवेन, तोही कंपनीला देईन !'

'ठीक आहे. उद्या सकाळी मी आता जे जे शक्य आहे ते करतो. तुला काय करायचं ते सांगतो. उद्याचा दिवस वाटलं तर रजा टाक. बघूया!' त्यांचं बघूया म्हणजे आतून खात्री असते. हेमूला अनुभवानं माहीत होतं. फक्त आज त्याला जाणवलं की, असं म्हणून ते कर्तृत्व, अहंकार टाळतात. ते आपल्याला जमलं पाहिजे आता !

सकाळी नऊ वाजताच बाबांनी हेमूला हाक मारली. ते सकाळी फिरायला जात तेव्हाच टेनिस कोर्टवर एस.पीं.ची अनौपचारिक भेट घेऊन आले होते. तोंडी, लेखी माफी, प्रत्यक्ष हजेरी. एवढं ठरलं होतं. त्या महिला अधिकाऱ्यांशी मी बोलतो, असंही ते म्हणाले. हेमूला दुपारी बारापर्यंत पाठवा, असा निरोप होता.

हार मानायची, सत्य सांगायचं, क्षमा मागायची - या साऱ्या गोष्टी सात्त्विक होत्या. साक्षीपुरावे, पळवाटा काढणाऱ्या जगाच्या दृष्टीनं वेगळ्या होत्या. तशा थोड्या खुळेपणाच्याही. पण आता हेमूचा निर्धार कायम होता. आपण मनावरचा सारा ताण घालवणारा, सुधारणेची संधी देणारा एक मार्ग चालतो आहोत, हा निर्धास्तपणा त्याच्याजवळ होता. बाबांचे भक्कम हात पाठीवर होते.

ठरल्याप्रमाणं तो गेला. तिथलं वातावरण बघून त्याला प्रथम गडबडायला झालं. गुन्हेगारी जगत केवढं आहे, किती हीन आहे, याची त्याला जाणीव झाली. नुसत्या तोंडच्या गप्पा वेगळ्या आणि असल्या जगाशी संबंध येणं वेगळं. आपण बाबांचा समजूतदारपणाचा, सद्‌गुणांचा सल्ला ऐकला नसता तर आपण कुठल्या भयाण वातावरणात येऊन पडणार होतो - याचं त्याला जणू प्रत्यक्ष दर्शन झालं. त्यानं ठरवलेल्या मार्गानं

जायचा, बदल घडवायचा त्याचा निर्धार अधिकच ठाम झाला. चूक म्हणजे त्याला अंगावर चढलेल्या एखाद्या किड्यासारखी फेकून द्यावीशी वाटत होती. शिक्षा, क्षमा - कशालाही तो तयार होता.

त्याला तीन-चार तास थांबावं लागलं. एस्.पीं.ची भेट म्हणजे फार कठीण गोष्ट होती. इतकी वर्दळ, इतकी कामं, एवढी माणसं. पण त्यांनी बाहेर तो आला आहे का, याची चौकशी करायला तेवढ्या गडबडीतही एक माणूस पाठवला आणि थांबायचा निरोप दिला. चार तासांनंतर त्यांनी आत बोलावल्याचा निरोप आला. आत जाताच त्यानं ऑफिसचा डेकोरम सोडून वडिलांचे मित्र या नात्यानं वाकून नमस्कार केला.

'मी माफी मागायला आलो आहे. बाकी तुम्ही सांगाल तसं..!' हेमू अदबीनं म्हणाला. ते अधिकारपदावर असले तरी, बाबांच्या मैत्रीच्या नात्यानं क्षणभर अवघडले होते. ते हेमूच्या वाक्यानं हलके झाले.

'ओके. मी तुला माणूस बरोबर देतो. तू मॅडमना जाऊन भेट..! मी बोललो आहे. आता निर्णय त्यांचा..!'

'यस सर..' हेमू.

मॅडम वर्दीत होत्या. त्यांनी मोजक्याच शब्दांत हजेरी घेतली. प्रश्न विचारले. पूर्वीपासून अशी सवय आहे का, दुसरी व्यक्ती असती तर यावेळी काय झालं असतं...सारा अंदाज घेतला. 'तुमच्या घरच्या वातावरणावर, तुमच्या सरळ कबुलीवर मी हा विषय इथंच थांबवते. पण तुम्हाला काय झालं ते लेखी द्यावं लागेल. माफीही..!'

त्यानं समोर बसून ते सारं लिहून दिलं.

त्यांनी कागदावर नजर टाकली. ती सारी घटना आणि माफी - हमी विनाअट, सरळ होती. त्या स्वतः उठल्या आपल्या मागून यायला सांगितलं. स्वतः त्या एस्.पीं.कडं आल्या. त्यांची परवानगी घेऊन आत गेल्या. नंतर

त्याला बोलावणं पाठवलं.

आता त्याचा कागद साहेबांच्या हातात होता. मॅडमनी त्यांच्यासमोर दोनच प्रश्न विचारले.

'तुला तुझ्या सवयी खरोखरच बदलायच्या आहेत ना? यात लिहिलेलं तू मनापासून लिहीलं आहेस का ? ते तू प्रामाणिकपणे पाळणार का ?'

दोन्हींचीही त्याची उत्तर नम्र पण होकारात्मक होती. खात्री झाल्यावर त्यांनी एस्.पीं.कडं पाहिलं.

ते म्हणाले, 'ओके. डिसिजन विल बी युवर्स.निर्णय तुम्हीच द्या..!'

मॅडमनी दुसऱ्या क्षणी ते माफीपत्र फाडून टाकलं.

त्या म्हणाल्या, 'सर, मला आता याची जरूर वाटत नाही. मलाही चुकलेले भाऊ आहेत. सुधारू शकणारेही..!'

हेमूला सन्मार्गाचा शेवट किती चांगल्या ठिकाणी घेऊन जातो याचा हा आयुष्यातला पहिला अनुभव होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. ट्रे घेऊन चहाचे कप ठेवून हवालदार आत येऊन गेला.

एस्.पी. आपण होऊन म्हणाले, 'आता शांत राहा. ठरलेला चांगला मार्ग सोडू नका. ऑफिसमध्ये आपली अशी गाठ कधीही पडू नये. मॅडम थँक्स. मलासुद्धा शिक्षेपेक्षा सुधारणा जास्त गरजेची आहे..!'

शिक्षेच्या तयारीनं आलेला हेमू चहा आणि नवी उमेद घेऊन बाहेर पडला. दोघांचेही आभार मानायला त्याच्याकडं शब्द नव्हते. त्याला घरी येताना वाटेतल्या गणपतीच्या देवळाजवळ थांबण्याची बुद्धी झाली.

'बुद्धी' शब्द डोक्यात आला. बाबा आपल्याला लहानपणी इथं घेऊन येत असत. 'चांगली बुद्धी माग' असं सांगत. त्या गणपतीसमोर बसून एका अंधाऱ्या कोपऱ्यात त्याला मनमोकळं रडावंसं वाटलं. ती चारची वेळ असल्यानं वर्दळ नव्हती. हीच ती बुद्धी ! वाईट काय करू शकते, चांगली

काय करू शकते, हे इतक्या प्रकर्षानं त्याला पहिल्यांदाच जाणवलं.

कुणीतरी घंटा वाजवली. नमस्कार घातला. हेमू भानावर आला. साष्टांग नमस्कार घालून, प्रार्थना करून घरी निघाला. आज घरी पोचायच्या आधी त्याचे बाबा कंपनीतून आलेले दिसले.

'ये बेटा, आलास सुखरूप... काही त्रास ?' बाबा समोर कोचावर जाऊन बसले होते आणि तेवढ्यात बाहेरून आई आली. शेजारच्या खुर्चीत बसली.

'माझा विश्वास बसत नाही बाबा ! फार वेगळ्या जगात मी आज जाऊन आलो. त्यात तुमच्या बळावर मला अनुभवायला आलेलं जग फार फार चांगलं होतं. क्षमाशील होतं. समजूतदार होतं. मीच फार खुजा वाटलो. पण आता नाही राहाणार.' बाबांना नमस्कार करीत त्यानं सारी हकीकत सांगितली. सारे स्तब्ध होते. एवढ्यात दरवाजात शिवांगी उभी होती. ती पायऱ्या चढून कधी वर आली कळलंच नव्हतं.

'ये शिवांगी बेटा.' बाबांनी तिला आत बोलावलं.

आत्ता थक्क व्हायची पाळी हेमूची अन् आईची होती. दोघंही क्षणभर काही बोलू शकली नाही.

कुठलाही वेळ न दवडता हेमू म्हणाला, 'मी बाबांच्या सांगण्याप्रमाणं वागून आज एका संकटातून वाचलो आहे, एका माफीवर. बाबांनी बोलावल्याशिवाय तू आलेली नाहीस,नक्कीच. पण मी तुझी माफी मागतो. तुला लागणाऱ्या सर्व कागदपत्रांवर मी सह्या करणार आहे. तुझं आयुष्य सुखानं सुरू कर...!'

रागिणीही उठून म्हणाली, 'शिवांगी, माझंही चुकलं. चुकलं ते खूप चुकीच्या कल्पनांमुळं. तुला सारं वर्ष मनस्ताप झाला. क्षमा कर. हेमू म्हणतो ते त्याला अवश्य करू दे. आमच्या मागच्या चुका आम्ही सुधारू शकणार

नाही. पण निदान इथून पुढचं तुझं आयुष्य तुला आवडेल तिथं तुला सुखानं घालवता येऊ दे. त्यासाठी घटस्फोटाच्या काय, कुठल्याही कागदपत्रावर तर सह्या करायला आम्ही तयार आहोतच. पण आमच्याकडून काही वस्तूपास्तू देणं असेल तर तेही आम्ही आनंदानं देऊ. तुला नव्या संसारात उपयोगी पडेल...मी हे खरंच सांगते आहे..! पण तू आत्ता कशी काय एकटी आलीस?'

ती काही बोलायच्या आत बाबा शांतपणे म्हणाले, 'ती मला जाताना सांगून गेली होती. मी सारी परिस्थिती ओळखू शकते. मी तुमच्यासाठी या घरात अजूनही राहिले असते पण या दोघांची मला काळजीच वाटते. ते असे स्पर्धेत अन् तुलनेत, पैशामागं, प्रतिष्ठेमागं कुठं जातील हे सांगणं मला अवघड आहे. एक नक्की त्याचा शेवट अस्वास्थ्यात होणार. कदाचित त्याहीपेक्षा वाईट. मला असा प्रवास यांच्याबरोबर करणं अवघड आहे. नाही जमत. मी समंजसपणे बाजूला राहीन. माझा माणसातल्या बदलावर विश्वास आहे. त्यांच्यात बदल झाला, तर तुम्ही हाक मारा. त्या क्षणी मी निघून येईन. माझी काळजी तुम्ही करू नका. मी चुकीच्या मार्गाला जाणार नाही. तुमच्या संपर्कात राहीन..म्हणून बाळांनो आज मी तिला हाक मारली. तुम्ही तिला आदरानं, क्षमा मागून मोकळं करायला तयार आहात या शब्दावर, तेवढ्यावर ती आली आहे..!'

'आम्ही काल कबूल केलं त्याप्रमाणं तिला तिच्या पुढच्या साथीदारासाठी मी लगेच मोकळं करतो. तिला तिचं नवं, चांगलं आयुष्य जगू दे ! जाऊ दे तिला आनंदानं...!' हेमूला बोलता येईनासं झालं.

बाबा म्हणाले, 'हे पहा, शिवांगी यांची तयारी आहे. त्यांच्या चुका त्यांना मान्य आहेत. त्या ते सुधारत आहेत. तुला मोकळं करत आहेत. तू अवश्य जा. मात्र चार घास खाऊन जा. चहापाणी घेऊन जा. मला बरं नाही वाटणार नाहीतर. पुढच्या व्यवस्थेत माझी मदत लागली तर केव्हाही हाक

मार. नक्की करीन...!'

शिवांगीच्या डोळ्यांत पाणी होतं. ती गंभीरही होती. पण ती उद्‌गारली,

'बाबा, आई, हेमू..तुम्ही मला जायला मोकळं केलं आहे. बाबा म्हणतात तसं मी चहापाणीही घेते. पण...'

'पण..तुला पोचवायचं आहे का ?' हेमू पटकन बोलला.

'कुठं पोचवणार ? मी जाण्यासाठी आले नाही. हे घर कुणाचं आहे? मला माणसांच्यातला बदल हवा होता. घरात नव्हे. बाबांची एक हाक मला घरात आणू शकते. मला खात्री होती. बाबा तुमच्यातल्या सद्‌गुणांना साद घालीत राहतील. एक ना एक दिवस ती तुम्हाला ऐकू येईल. तो माझ्याच नव्हे आपल्या सर्वांच्याच आयुष्यातला अपूर्व आनंदाचा दिवस असेल...! आता मी आनंदात इथं राहीन. राहू ना !'

हेमू आणि आईचा अजूनही या साऱ्यावर विश्वास बसत नव्हता. पण सारं समोर प्रत्यक्ष होतं.

बाबांनी हेमूला विचारलं, 'हे बघ हेमू, तुझा निर्धार कायम आहे ना? तू ज्या कंपनीत जाणार होतास तिथं ती याच वर्षी गेली. प्रमोशनवर. पगार जास्त आहे. काही कॉम्पिटिशन, कमीपणा वगैरे ?'

हेमू म्हणाला, 'बाबा लाजवू नका. कॉम्पिटिशन, महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, सारा आता भूतकाळ झाला आहे माझा. तुम्हीच इतक्या शांतपणे आमच्यातल्या बदलाची कशी वाट पाहिली असेल, हे समजणंसुद्धा मला कठीण आहे. ती घरात राहायला आली तर ते आमचं भाग्य आहे...!'

'आई, मग जाऊ मी घरात ?' शिवांगीनं रागिणीला विचारलं.

'आनंदानं..! अख्खं घर तुझं आहे..!' आई म्हणाली.

बाबांनी हसत विचारलं, 'आणि किचनकट्टा ?'

'तोही...तोही..!'

आई हसत म्हणाली, 'फक्त..'

'आता काय फक्त ?' बाबा थबकले.

'मदत लागली की, हाक मारायची मला. मी हजर..!'

आईनं सुखद धक्का दिला.

तिघांनाही नमस्कार करून शिवांगी हातपाय धुऊन घरात गेली. पाच मिनिटांत तिची आतून हाक ऐकू आली.

बाबांच्या देवघरातल्या देवांसमोर तिनं दिवा लावला होता. समोर नैवेद्याच्या वाटीत साखर. ती हात जोडून उभी होती. तिच्या मागं तिघंही.

तिनं नैवेद्याची वाटी बाबांकडं दिली आणि म्हणाली, 'बाबा तुम्हीच आम्हाला प्रसाद द्या.' शिवांगी.

'का बरं ?' बाबा

'तुम्ही सर्वांच्या सद्‌बुद्धीला साद घातली. त्याचा हा प्रतिसाद आहे, प्रसाद आहे. इतक्या निष्ठेनं तुम्ही वर्षानुवर्षं ही साद सर्वांच्यातल्या चांगुलपणाला, सरळपणाला, साधेपणाला, देवत्वाला घालीत आलात म्हणून हा दिवस आज आपणा सर्वांनाच पहायला मिळतो आहे, असं मला वाटतं. सर्वांच्यात जाग्या झालेल्या देवत्वाचा हा प्रतिसाद आहे. त्याचा प्रसाद द्यायचा मान आणि अधिकार तुमचाच आहे, बाबा ! बरोबर ना ?' शिवांगी आई आणि हेमूकडं बघत उद्‌गारली.

दोघांना 'अगदी बरोबर..' यापलीकडं उच्चारायला शब्दच सापडेनात.

प्रसाद घेताना सर्वांच्या चेहऱ्यांवर देवासमोर लावलेल्या दिव्याचा प्रकाश पसरला होता. आत अंतरंगं प्रकाशित झाली होती... कायमची... आनंद देण्यासाठी !

*

तसा दिवस नेहमीसारखाच उजाडला. पण कुणालच्या दृष्टीनं तो दिवस वेगळा होता. त्यानं एक वर्षापूर्वी बुक केलेला फ्लॅट आज ताब्यात मिळायचा होता. दीड दोन वर्षं त्या विचारात गेली होती. वर्षभर मधूनमधून खेपा घालण्यात. त्यात शहरातले बांधकाम व्यावसायिक. सरळ, सुखरूप व्यवहार तडीला गेला की, सुटलो. तो आजचा दिवस. लवकर उठून सारं आवरलं. आजची देवपूजा खूपच 'मनापासून' झाली. सारं निर्विघ्नपणे पार पडावं म्हणून प्रार्थना झाली.

कुणालनं बिल्डरला फोन केला. ठरल्याप्रमाणं अकरा वाजता या, असं ते म्हणाले. कुणालनं निःश्वास टाकला. म्हणजे निदान आज तरी रजिस्ट्रारसमोर व्यवहार होणार. फ्लॅट ताब्यात मिळेल. दिवसभर सर्व सोपस्कार सुरू होते. आजवर या आठवड्यात करू, पुढच्या आठवड्यात करू म्हणत पुढं जात चाललेला व्यवहार हळूहळू त्रासदायक होत होता. त्याची पत्नी कल्पना आणि तो असंख्य वेळा साईटवर जाऊन येत. मध्येच कामात प्रगती दिसे. पुढं महिनाभरात आता काम खूपच पुढं गेलं असेल म्हणून जावं तर, सबंध महिना जाऊनसुद्धा काम एक महिन्यापूर्वी होतं तिथंच दिसे. काही कळेनासं होई. असं करीत कामही कसंबसं संपलेलं दिसलं. पण हे कागदपत्र आणि व्यवहार काही आकाराला येईनात.

वेळच्या वेळी पैसे भरून, खेपा घालणं आणि रात्री एकत्र आल्यावर पुन्हा याच विषयावर चर्चा. एकदा तर एक दिवस काही कामांसाठी कल्पनाचे वडील - अण्णा त्यांच्याकडं आले होते, ते मुक्कामाला राहिले. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. पुन्हा आपली या उभयतांची गाडी तो

फ्लॅट, दिरंगाई, पैसे, पझेशन - या विषयांवर येई. ते एकदोनदा त्यांनी ऐकलं. रात्री उशिरासुद्धा दोघं याच विषयांवर बोलत होते. बिल्डरनी कोणत्या गोष्टी कबूल केल्या होत्या, त्याता आता बदल कसे होत आहेत. एखादी गोष्ट बजेटमध्ये बसणार नसल्यानं आता देणं कसं शक्य नाही, अचानक भाव वाढल्यानं - एक तर ठरलेल्या किंमतीत काही वाढ कशी होणार, नसेल तर काहीकाही गोष्टींत कशी तडजोड करावी लागेल, काही रद्दच कराव्या लागतील - एक ना दोन.

सकाळी चहाच्या वेळी शेवटी अण्णा न राहवून म्हणाले, 'कुणाल, फ्लॅटच्या व्यवहारात फार त्रास आहे का ?'

'तसं नाही, अण्णा. हे लोक सांगितल्याप्रमाणं, ठरल्याप्रमाणं वागत नाहीत. दिलेल्या वेळेला हजर राहात नाहीत. ठरल्या वेळेला कामं करीत नाहीत. त्यामुळं मग थोडाफार त्रास होतो.' कुणाल उत्तरला.

'अरे, असू दे. यात आपण अपेक्षा करतो आहोत तसे वागणारे लोक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कमी आहेत. आपण किती माहिती काढून सगळं केलं असलं तरी, आपली यांतल्या कुणाशी गाठ पडली आहे, ते अनुभवानंच ठरतं. त्या व्यक्ती अशा मोजक्या प्रामाणिक लोकांतल्या असूनही अनेकदा कायदेकानू बदलणं, त्यांच्या त्यांच्यात मतभेद होणं, कुठं व्यवहारात, बाजारात इतर व्यवहारात खोट येणं - अशा अनेक कारणांनीसुद्धा असे लोक शब्द पाळू शकत नाहीत, असंही घडतं.' अण्णा समजुतीनं म्हणाले.

'ते बरोबर आहे. तसंही घडत असेल. पण त्याची काळजी त्यांनीच घ्यायला नको का ? भाव वाढले हे मात्र आम्हाला सांगून त्याची भरपाई आम्हाला करायला लावतात मग निदान त्यांनी दिलेल्या वेळा, कामाचा दर्जा, कबूल केलेल्या गोष्टी तरी त्यांनी करायला नकोत का ?' कुणालची बाजू सरळ होती.

'ते खरं आहे. पण अजूनही अनेक गोष्टी यात असू शकतील. त्या आपल्याला माहीत नसतील. काही अडचणी ते सांगू शकत नसतील. ते करताहेत. पूर्ण करून देतील. असं मला वाटतं. थोडा वेळ लागेल. सबुरीनं काम अधिक लवकर होईल..!'अण्णा.

आपलं म्हणणं त्याला फारसं पटणार नाही, हे अण्णांनी ओळखलं होतं. म्हणून तिकडून कल्पना येताना दिसल्यावर ते म्हणाले, 'अग काल रात्री मी तुमची वाट पाहात होतो. काल आठ वाजता...!' त्यांना वाटलं तिच्या लक्षात येईल.

तिचा चेहरा प्रश्नार्थक होता. 'रात्री आठला...अहो, आपण कुठं होतो हो...?' तिनं उलट कुणाललाच विचारलं.

'कल्पना, आपण साईटवरून थेट बिल्डरच्या ऑफिसकडं नाही का गेलो परस्पर. ते भेटले नाहीत. आपण आठ ते नऊ - सव्वानऊपर्यंत तिथंच होतो. शेवटी फार उशीर नको, अण्णा एकटे थांबतील घरी म्हणून साडेनऊ-पावणेदहाला परत आलो...'

'पण का हो अण्णा, कुणी आलं होतं का मध्ये...?' कुणालनं अण्णांना विचारलं.

'नाही. नाही. कुणी आलं नव्हतं. मीच आपला बसलो होतो...सहजच..' अण्णांनी पुढचा काही विषय टाळला आहे, हे दोघांच्याही लक्षात आलं.

'नाही अण्णा, सांगा ना, आठ वाजताच तुम्ही का वाट पहात होतात...काही झालं का...?' कल्पना.

'तसं नाही, मागं मी आलो होतो ना वर्षभरापूर्वी. तेव्हा रात्री आठला तुम्ही रामरक्षा, स्तोत्र असं काही म्हणायचा. देवासमोर दिवा लावायचा. मी दोन-तीन दिवस होतो. तेव्हा तुमची तशी उपासना त्याआधी दोनेक वर्षं तरी

सुरू होती. विशेष म्हणजे तुम्ही त्यावेळी काही निवडक वाचनही करायचा. कुठल्या तरी संतांच्या शिकवणुकीचं. मला त्याची आठवण झाली. म्हणून मी आठ वाजता वाट पाहिली. मग मला वाटलं, तुम्ही दोघंही नोकरीला आहात. अलीकडं तुमच्या सेक्टरमध्ये काम खूप वाढलं आहे. वेळ होतो म्हणूनही मी ऐकलं आहे. मला वाटलं तुमची वेळही कदाचित बदलली असेल...' अण्णा.

कल्पनानं कुणालकडं पाहिलं. उत्तर ठाऊक होतं पण कुणी द्यायचं असा क्षणभर संभ्रम झाला.

कुणाल बोलला, 'बरोबर आहे अण्णा ! आम्ही अलीकडं अलीकडंपर्यंत नियमित बसत होतो. छान असायचं. पण या फ्लॅटचा व्यवहार सुरू झाला आणि गेलं वर्ष दीड वर्ष डोक्याला ते व्यवधानच लागलं. त्याचं काही खरं रोजचं कुठलं काम नसतं. पण त्या निमित्तानं त्यातल्या वेगवेगळ्या माणसांचा संपर्क वाढला. माहिती घेणं, शंका, अडचणी, इतर शेजारी ग्राहक, त्यांच्याकडून कळणारी माहिती - जवळजवळ रोज संध्याकाळचा वेळ जातोय. पहिल्यांदा बसण्यात अनियमितता आली. एक दिवस मिळायचा, दोन दिवस नाही. परत एखादा दिवस परत चार दिवस खंड. तसंही बरं वाटेना. असं करत ते थांबलं. खरं तर ऑफिसला इतका वेळ काही रोज होत नाही. त्यामुळं नाही बंद पडलं...म्हणून ते आमच्या आत्ता तुम्ही विचारल्यावर लक्षातच आलं नाही...!' कुमारला थोडं अपराधीही वाटलं.

अण्णांचा नित्यनेम त्याला माहीत होता. त्यात तडजोडी नसत. उलट या साऱ्या गोष्टी, त्यांचा उपयोग, महत्त्व सारं त्याला लग्नानंतर त्यांच्याकडूनच कळलं होतं. त्या दोघांनी स्वतःही त्याचा अनुभव घेतला होता. पण कामाच्या रेट्यात त्याकडं कधी दुर्लक्ष झालं ते कळलंही नाही. हा फ्लॅटचा विषय सुरू झाला तेव्हा कुणालला अण्णा थेट बोलले नसले तरी

कल्पनाकडून त्यांचा संवाद, मत त्याला कळलं होतं. एकदा ती माहेरी गेली तेव्हा अण्णा म्हणाले होते, 'आत्ताचं घर तुमचं स्वतःचंच आहे ना ?'

'हो. यांनी ते लग्नापूर्वी नुकतंच घेतलेलं होतं !' कल्पना.

'ते तुम्हाला पुरतं ना ? काही गैरसोयी आहेत का ?' अण्णांनी विचारलं.

'नाही. काहीच नाहीत. त्यांच्या कंपनीला जवळ म्हणूनच घेतलं. पहिल्यांदा मी होते ती कंपनी थोडी लांब होती. पण मला या घराच्या एरिया जवळची संधी मिळाल्यावर आमचं कंपनी बदलायचं ठरलं. संधीही मिळाली. पगारही प्रोटेक्ट झाला. त्यामुळं ती गैरसोय काही दिवस झाली तीही तेव्हाच दूर झाली.' कल्पना.

'मग आता हा दुसरा फ्लॅट कशासाठी घेत आहात ?' अण्णांनी पुढं विचारलं, 'म्हणजे असं की, तुम्ही तिकडं राहायला जाणार आहात का ?'

'छेः छेः तो लांबच आहे तसा, फक्त नव्या वाढत्या वस्तीत आहे. तिकडं बऱ्याच कंपन्या निघताहेत. त्यामुळं तिकडं जागांना डिमांड वाढते आहे. आज एवढी नाही पण पुढं ती खूप वाढेल, हे दिसतं आहे. त्यामुळं मिळाला की, तो आम्ही भाड्यानंच देणार आहोत !' तिला ते सारं सरळच वाटत होतं.

'पण मग हे कशासाठी करायचं...राहाणारे राहतील की दुसरीकडं..! तुम्ही स्वतः गुंतवणूक म्हणून करणार आहात का ? का कर्ज घेणार आहात?' अण्णांनी विचारलं.

'तसं थोडं थोडं दोन्हीही. उलट कर्ज जास्त घेणार आहोत !' कल्पना.

'कशाला मग उगाच नसताना कर्ज ओढवून घेत आहात ?'अण्णा.

कल्पनाला वाटलं अण्णांना अलीकडचा ट्रेंड आणि कायदे माहिती

नसावेत. पण तसं म्हणावं किंवा त्यांना कसं समजावावं हे तिच्या क्षणभर लक्षात येईना.

ती काही म्हणायच्या आतच ते म्हणाले, 'ऐक, माझ्या लक्षात आलं. सध्याचं घर हे कुमारच्या नावावर असेल. त्यावरही कर्ज आहे. पण त्यामुळं त्याला टॅक्ससाठी तसा फायदा मिळतो आहे. इकडं घर स्वतःचं होतं आहे. फायदा व्याजाचाही आहे, हप्त्याचाही आहे.'

कल्पना ऐकत राहिली.

'आता तुझाही पगार त्याच्या बरोबरीनं आहे. तसे खर्च तर जवळजवळ काहीच नाहीत. पण तू आत्ताचा दुसरा फ्लॅट गुंतवणूक म्हणून घेणार.कर्ज व्याजाचाही फायदा तुला पगाराच्या वजावाटीत मिळेल. खरं त्यातच हप्ता निघून जाईल. शिवाय भाड्यानं दिला की, ते तुमचं अधिक उत्पन्न होईल. जणु आणखी एक तिसरा पगारच म्हणेनास...!' अण्णा म्हणाले.

अण्णांना यांतला सारा विषय माहिती आहे. लक्षात आला आहे. हे तिला कळून चुकलं. फक्त तिला हे कळत नव्हतं की, यात आपलं काहीतरी चुकतं आहे अशी यांची भावना का झाली आहे ?

तिनं विचारलं, 'खरं आहे, अण्णा. पण त्यात काही चुकतं आहे का? हा आजचा ट्रेंड आहे. बाकीचे सारेही तेच करीत आहेत. आमच्या सीएनीसुद्धा आम्हाला हाच सल्ला दिला. तुम्ही उगीचच टॅक्स कशाला भरता. आहे कायद्यात तरतूद. तर फायदा घ्या. ते तसं नियमात बसतंही आहे..!'

अण्णा म्हणाले, 'तुला मी लहानपणापासून शिकवलेलं आहे ना की, सारे जातात म्हणून कुठल्या साइडला जायचं नाही. सारे टी.व्ही., सिनेमा बघतात म्हणून बघायचा नाही. जग प्रवाहपतित असतं. ते नेहमी उताराकडंच

वाहातं. त्यामुळं अधोगती होते. सध्या तर या साऱ्या पाश्चात्य अतिक्रमणांमुळं जास्तच. तुम्हाला एखादी गोष्ट योग्य वाटते, गरजेची आहे तर कुठलाही निर्णय घ्या. जगासारखं करत गेलो तर उद्या हळूहळू जग खोटं बोलतं, उधळमाधळ करतं, कर्ज प्रतिष्ठा समजतं, बुडवणं त्याहून कर्तबगारीचं समजतं, फसवणूक जगरहाटी मानतं - असा प्रवास उद्या करीत जावं लागेल. हळूहळू त्यात गैरही वाटणार नाही. निर्ढावलेला गुन्हेगार गुन्हासुद्धा एखाद्या सत्कार्यासारखा समजायला लागतो. आपण ब्रेक लावला तरच थांबणारी जग ही गाडी आहे. तीही आपल्यापुरतीच. बाकीचे तसंच करीत राहातील !'

कल्पनाला लहानपणापासून कॉलेजपर्यंतचे अनेक संवाद आठवले. फक्त तिला हे कळेना की, आत्ता मी जर स्वतंत्र मिळवती आहे तर, मला स्वतंत्र फायदे घेण्यात काय गैर आहे ! म्हणून तिनं तसं स्पष्टच विचारलं.

अण्णा म्हणाले, 'बाळ, आजचा काळ स्त्रीशिक्षण, नोकऱ्या, संधी असा आहे. म्हणून तू स्वतंत्रपणे तिथंपर्यंत पोचलीस. एक करियर म्हणून, शिक्षणाचा उपयोग म्हणून मला ते मान्य आहे. काम करतेस त्यामुळं दिला जाणारा पगार हा सर्वांबरोबरच जसा असतो तसाच तुलाही तो मिळतो. खरं तर तो जास्तच आहे, हे तुला मान्य आहे.'

'हो...! मी एकटी काही मुद्दाम कमी पगार मागू शकत नाही. तो वेडेपणा ठरेल. कुणालाच पटणार नाही..' कल्पना.

'हां.. एवढं मला मान्य आहे. पण मिळवल्यावर पुढं त्याचं काय करावं - हे जगाकडं बघून ठरवण्याचं तुझ्यावर बंधन आहे काय ?' अण्णांनी विचारलं.

'म्हणजे माझ्या नाही लक्षात आलं.' कल्पना.

'आत्ता थोडं सांगतो. पुढं तुझ्याच आणखी लक्षात येईल. पहिलं म्हणजे तुमच्या घराचा विचार कर. तुमच्या घरात कुणाल मिळवता आहे.

त्याच्या पगारावर तुमचं भागून उरेल इतका पगार त्याला आहे. त्यात घराची गरज योग्य, त्यासाठी मिळणारे फायदेही ठीक आहेत. आता तुझ्या नोकरीची, अधिक पैशाची, तुम्हाला खरीच गरज आहे का ?' अण्णांनी थेटच विचारलं.

'आज गरज नाही. तुम्ही म्हणता तशी ! पण महागाई इतकी वाढते, उद्या गरज पडली तर सांगता येत नाही. शिवाय माझं शिक्षण. त्याचाही काही उपयोग नाही. काही मिळवायचं असलं तर आत्ताच मिळवायला हवं ना ?' कल्पना.

'बरोबर. शिक्षणाचं चीज अन् पैशाची गरज, थोडं पटलं मला. पण मग मला सांग, तू नोकरी करून रीतसर पगार घेऊन, टॅक्स भरून मोकळी का होऊ शकत नाहीस ? ठीक आहे. संधी आहे. मिळव. भविष्यासाठी साठव. आत्ताचंच तुझं घर चार खोल्यांचं आहे. अगदी मूलबाळ गृहीत धरलंस तरी पुढं दहा-वीस वर्षं तरी तुम्हाला दुसऱ्या घराची गरज लागणार आहे का ? तुम्ही ते घेऊन वापरू तर नक्कीच शकणार नाही...'अण्णा.

'ते खरं आहे. पण अशा मिळणाऱ्या सवलती न घेण्यालाही लोक नावं ठेवतात !' कल्पना.

'अग, तुम्ही दोघंही नोकरी करता त्यालाही लोक नावं ठेवतील. म्हणतील त्याला एवढा पगार असताना, घर-गाडी सारं असताना ती कशाला स्वास्थ्य घालवून पळत राहाते !' अण्णा.

'हो. तसंही म्हणतातच !' कल्पना म्हणाली. 'पण अण्णा, हे दुसरं घर घेण्याला तुमचा का विरोध आहे ते मला कळलं नाही..'

'तसा तर माझा दुसरी नोकरी जरूर नसताना करण्यालाही विरोध आहे. आज तू ज्या जागेवर काम करते आहेस ती एखाद्या तरुण, होतकरूला मिळाली असती तर, त्याचं घर उभं झालं असतं. कुणालला आधीच भरपूर पगार असताना तू ती जागा अडवणार, आणखी पैसा घरात आणणार, मग

आता त्याचं काहीतरी करायचं म्हणून अशा वेगवेगळ्या गुंतवणुकी करणार, त्याची काळजी करीत बसणार. तिकडं ज्याला ती जागा मिळू शकली असती तो बेकार राहणार. कुठं तरी कमी पगारावर तडजोडीत नोकरीही करणार आणि प्रपंचही. अशांचे काय आशीर्वाद आपल्याला मिळतील का ?'

'कल्पना कर, तुम्ही दोघंतिघं, काय जे घरातले मेंबर आहात ते भुकेसाठी अन्न घेतात, तहानेसाठी पाणी पितात. समजा दिवसभरात तुम्हाला दहा तांब्ये पाणी लागतं. तेवढं मावेल असं भांडं आणलं. अगदी कुणी आला-गेला, साठवण गृहीत धरलं आणि पंधरा-वीस तांब्ये पाणी भरल्यावर तुम्ही नळाला आहे म्हणून अजून पाणी आणलं तर पुन्हा पंधरा तांब्ये काही त्यात भरणं शक्य नाही, इतकंच नव्हे एक तांब्या जरी जादा ओतलात तरी तेवढं पाणी वाहून जाईल की नाही ?' अण्णांनी विचारलं.

'पटतं मला ते...' कल्पना म्हणाली.

'अग, यात एवढंच नुकसान नाही. तुम्ही जे असं जादा ओताल त्याला दुसऱ्याला वंचित केल्याचा दोष लागतो. इतकंच नाही, जे असं पाणी वाहून जातं ते नुसतं जात नाही, तुमच्या आजूबाजूच्या वस्तू, कागदपत्रं, कपडे - काय असेल ते भिजवतं. नव्हे, वेळी कुजवतं. ते पुसून काढायचा उपद्व्यापही तुम्हालाच करायला लागतो. इतर वंचितांची वासना, असूया - अनेक गोष्टी सूक्ष्म असतात. त्या परिणाम करतात ते वेगळेच !' अण्णांनी स्पष्ट केलं.

'म्हणजे मी नोकरी सोडावी, असं तुम्हाला म्हणायचं आहे का ?' कल्पना.

'तसंही नाही अगदी ! फक्त हे सारं समजून घेऊन, जरूर तेवढीच करावी. त्यातही त्यामुळं निर्माण होणारे असले अनावश्यक मोह टाळून. पगाराचाही फायदा, घर हप्त्याचाही, व्याजाचाही, करसवलतीचाही वर

भाड्याचाही. तुला वाटतं या साऱ्याचा परिणाम काहीच नसतो ?' अण्णांनी विचारलं.

कल्पना विचारात पडली.

'आणखी एक लक्षात आणून देतो. स्वतःचं घर ही प्रत्येकाची जरूरीची गोष्ट आहे, हे मान्यच. त्याचा व्याप पुरेसा असतो. पण तो ज्याच्या त्याच्या आटोक्यातला असतो.रोजच्या रोज साऱ्या गोष्टी होतही राहातात.पण असं दुसरं घर घेऊन, घर बंदही ठेवता येत नाही, धड फुकट देता येत नाही.'

'त्यातही तुला सांगतो, काही सल्लागार भेटतात. जमिनीत पैसे गुंतवा. दामतिप्पट घ्याल. कुठं तरी माळावर, डोंगरावर जागा दाखवतात. असे पैसे जास्त मिळत असले म्हणजे काय करावं सुचत नाही. हा मार्ग बरा वाटतो. रिकामे शेती-बिनशेती प्लॉट घेतात. घेईपर्यंत काही वाटत नाही. ती जागा पडूनही असते.'

'पण एक लक्षात घे. अशी लाखो रुपयांची जागा घेऊन कुणी विसरून जाऊन शांत झोपू शकेल, असं तुला वाटतं का ? घेतली नसती तर डोक्यात काही विचारही आला नसता. पण एकदा आपली आहे म्हटल्यावर निदान विचार डोक्यात राहातो. आठवडाभर गेला की वाटतं निदान चक्कर तरी टाकून येऊ. जावं तर कुठली तरी जनावरं तिथं चरताना दिसतात. ना मालक, ना ओळख. उगीचच आपलं काहीतरी नुकसान झाल्यासारखं वाटत राहातं.'

'मग विचार येतो, निदान कंपाउंड घालू, कुलूप लावू. साधं घालावं तर घालणारेच सांगतात, तारा वर करून, तोडून कुणीही जाऊ-येऊ शकतं. त्यापेक्षा एकदा खर्च होईल पण तुम्ही पक्कं पुरुषभर उंचीचं भितीचंच कंपाउंड घाला. काय एकदा दोन-चार लाख खर्च येईल. पण कायमचा प्रश्न मिटेल! सांगणाऱ्याचा धंदा होतो. पण आपल्याला पर्याय उरत नाही. अशा हळूहळू

पैशालाच नव्हे मनालासुद्धा वाटा फुटतात.'

'एक दिवस कुणीतरी त्या भागात जाऊन आलेलं सांगतं. वा, तुम्ही कंपाउंड छानच घातलं. काय फार्म हाउस करायचा विचार आहे का ? कारण आता शेडपण टाकलेली दिसली !'

'शेड म्हटल्यावर मनात नाना शंका येतात. एकदा वाटतं कंपाउंडवाल्यांनी सामानासाठी टाकली असेल. रात्रीची झोप उडते. सकाळी सकाळी जाऊन यावंसं वाटतं. पण घड्याळाचे काटे नि कंपनीचा बडगा जाऊ देत नाही. कंपाउंडवाल्यांना फोन करून विचारावं तर ते म्हणतात, आमचं काही शेड वगैरे नाही. आपलं कंपाउंड झालं तेव्हाच तुम्ही कुलूप लावून गेला नाही का ?'

'बाप रे ! असं वाटतं, आत्ता बिनपगारी रजा झाली तरी चालेल. पण बघून आलंच पाहिजे. रजा टाकावीच लागते. जावं तर खरंच मोडक्या पत्र्याची आणि काठ्यांची शेड. एक कुटुंब. गेटला कडी. उघडून आत जाऊन हाक द्यावी, तर खेडवळ माणूस बाहेर येतो. आपल्याला काय पाहिजे म्हणून विचारतो. तुम्ही इथं कसे राहिलात म्हटलं तर, तो सांगतो, मोठ्या मालकानं इथं राहायला सांगितलं आहे. हम वॉचमन है. आपका यहाँ कुछ काम है क्या ? आपण मालक आहोत, म्हणायचंसुद्धा आपलं विसरतं.'

अनाठायी आणि चुकीच्या दिशेनं झालेले प्रवास कुठं नेतात हे मी तुला सांगितलं...मी अशा घटना प्रत्यक्ष बघितल्या आहेत, कल्पना !'

'अण्णा..' कल्पनाचा चेहरा आता रडवेला होतो. ती एका परीनं आतून सुन्न होऊन ऐकत असते.

म्हणते, 'अण्णा, आम्ही तुम्हाला बोललो नाही पण या आधी यांचे पैसे कुठं गुंतवावे म्हणून आम्ही असाच एक प्लॉट घेतला आहे. आम्हाला त्यातलं काही कळत नसताना. खरं तर पैसे बँकेत ठेवू असं आदल्या

दिवशीपर्यंत ठरलं होतं. पण पुन्हा व्याजावर कर भरायला लागेल. इन्कम वाढेल म्हणून थांबलो आणि हे प्लॉटचं डोक्यात घालणारे मित्र यांना भेटले. अण्णा, ती जागा अशीच अडकली आहे, हो ! त्यातले जाणकार लोक म्हणतात, ज्यानं विकली त्याची ती नव्हतीच...!' म्हणून कल्पना रडू लागली.

'कल्पना, मला सांग मग जरूरीपेक्षा जास्तीचा पैसा काय, इस्टेटी काय - यांनी काय होऊ शकतं, हे तू अनुभवते आहेस ना ? आधीचं जादाच होतं. त्याच्यावर बँकेपेक्षा जादा मिळवायला गेलात मग आता व्याजही नाही, मुद्दलही नाही ! मनस्ताप नि खर्च पदरात पडतं. त्याला काय करणार? हा चुकीचा प्रवास आहे !' अण्णा गंभीर झाले.

कल्पनाकडून अण्णांशी झालेल्या या मोलाच्या चर्चेचा सारा मजकूर कुणालला कळला होता. मनात थोडाफार संघर्ष झाला. करून ठेवलं होतं ते निस्तरावं लागणार होतं. म्हणून आज तो व्यवहार पूर्ण होण्याची वाट पहात होता. संध्याकाळी ठरल्याप्रमाणं सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्या. त्यानं निःश्वास टाकला.त्याच वेळी बिल्डरना विश्वासात घेऊन फ्लॅट विक्रीचा विचार सांगून आला. आता दीडदोन वर्षं गेल्यानं भाग डेव्हलप झाला होता. मागणी होती. थोडाफार मेहनताना घेऊन ते काम महिन्यात करण्याचं त्यांनी आश्वासन दिलं. महिनाभरात भरलेल्या पैशापेक्षा जास्त किंमतीला फ्लॅट विकला गेला - कर्ज फिटून गेलं.

अण्णांना कुणालनं मुद्दाम बोलवून घेतलं. आपण त्यांच्या सांगण्याचा आधीच विचार करायला हवा होता हे दोघांनीही कबूल केलं.

अण्णा म्हणले, 'कुणाल, मी कल्पनाला सांगितलेलंच आहे. मुलींनी अवश्य अगदी उच्च शिक्षण घ्यावं. उत्तम वाचन करावं. कला शिकाव्या. त्याशिवाय त्या उत्तम माता कशा होतील ? नोकरीसुद्धा त्यांनी अवश्य करावी. पण अनुकूलता असताना, गरजा भागत नसताना ! कल्पनाच्या आईनं

शिक्षण नाही का घेतलं लग्नानंतर. हिच्या जन्मापर्यंत माझ्यावर भावंडांची शिक्षणं, लग्न यानं कर्ज होती. ती फिटेपर्यंत नोकरी केली. कल्पनाच्या जन्मापासून पहिली नोकरी सोडली. त्यामुळं आईच्या छायेत, संस्कारात तीही वाढली. आम्हालाही स्वास्थ्य झालं. पुढंही कल्पना मोठी झाल्यावर रिकाम्या वेळाचा उपयोग म्हणून तिनं दहा वर्षं नोकरी केली पण प्रपंचात नाही आणला तो पैसा. तो गरजू, अपंग, गरीब मुलांची शिक्षणं, अन्नदान, सेवा - या कामांसाठी देऊन टाकला. त्यामुळं आमच्या नावेत कधी पाणी नाही शिरलं. कधीच झोप नाही उडाली की एवढी काडीही चोरीला नाही गेली ! नाहीतर तुम्ही पाहातच आहात बाहेर किती भरकटलेला प्रवास चालू आहे...!'

'एका बाजूनं पुरेसं मिळत असताना, कायद्याच्या पळवाटा, तरतुदींचे लाभ उठवून, पैशाचे, इस्टेटींचे ढीग करीत सुटतात. मग चोऱ्या,फसवणुकी, वकील, फी, खेटे, मनस्ताप, असाध्य आजारपणं, त्यावर अवाढव्य खर्च, निर्वंश, मतिमंद मुलं.....कुठंकुठं याचे परिणाम पोचतील हे सांगणंही कठीण आहे. जग काय करील ते करील. आपण तरी आपला भरकटलेला प्रवास आपल्यापुरता थांबवू शकतो. इतरांना उलट मदत करू शकतो. चित्तावर असले विनाकारण भार नसले म्हणजे आपला नोकरीधंदा उत्तम होतोच पण खऱ्या जन्मदात्या देवाला द्यायच्या वेळीही शांतपणे वेळ देता येतो...! खरं ना ?'

सर्वांनी एकदमच एकमेकांकडंही पाहिलं आणि वरही - रात्रीचे आठ वाजले होते. भरकटलेला प्रवास थांबल्यानं उपासनेची वेळ अचूक साधता आली होती !

*

आनंदीबाई पुन्हा एकदा गॅलरीतून जाऊन परत आल्या. खाली कुठंही त्यांच्या मुलाच्या कुमारच्या बाईकचा आवाज आला नाही. गॅलरीत त्यांची पाचवी तरी खेप असेल. कुमार चोवीस वर्षांचा. आय्आय्टीच्या प्रवेशपरीक्षेसाठी गॅप घेऊन एक वर्ष घरी बसलेला. सध्या फक्त दार लावून आपल्या खोलीत स्वतःला कोंडून घेऊन बसणं. नेटवर वेगवेगळ्या सोशलसाईट्स्वर तासन्तास बसणं. मध्येच अत्यंत वेगात बाईकवरून कुठंतरी जाऊन येणं. 'अरे कुठं जातोयस ?' आई.

'बाहेर..' कुमार.

'ते खरं रे, पण कुठं जाणार, केव्हा येशील ?' आई.

'ते तुला सांगून काय उपयोग ? आणि तूच म्हणत होतीस ना की, बाहेर जाणाऱ्याला असं कधी विचारू नये ?' कुमारचा स्वर जरा तिरसट.

'बरं बाबा, फक्त नऊपर्यंत जेवायला तरी ये. वाट बघायला लावू नको.' आनंदीबाई.

'तू वाटच बघू नको ना, मी आल्यावर जेवीन..!' कुमार.

पुढं काही म्हणेपर्यंत कुमारची गाडी गेटचं एक दार अलगद ढकलून सुसाट निघून गेलेली.

आनंदीबाईंना अनेक वर्षं न सुटलेला प्रश्न परतपरत भेडसावीत राहिला. याच्याशी वागावं कसं ? आपलं नक्की काय चुकतं आहे ? कारण त्याला असं विचारलेलं आवडत नाही, हे एकदोन वेळा त्यांनी ऐकलं. तेव्हा त्याच्या पुढच्या एकदोन वेळा त्यांनी अगदी ओठांवर येऊनही विचारायचं आवरलं. त्यांना वाटलं, आता तरी आपल्यापासून त्याला त्रास होणार नाही. न विचारून

तो आनंदात राहात असेल तर कुठं बिघडलं ? तसं करू.

दहा वर्षांच्या संसारात असंख्य तडजोडी त्यांनी केल्या. त्यांचं लग्न झालं. यजमानांची साथ दहा वर्षं होती. पण त्यावेळीही त्यांच्या तिरसट स्वभावामुळं त्यांना तडजोडी कराव्याच लागल्या. कुमार एकुलता एक. अंगड्याटोपड्यापासून थंडीवाऱ्यापासून त्याला सारखं जपायचं. आधी उशिराचं मूल.नवसाचं. त्यात कमी दिवसाचं. म्हणून डॉक्टरी सल्ला सतत सावधगिरीचाच. हे द्या. ते द्या. हे टाळा, ते टाळा. थंडीला जपा. पावसात जपा. मुलाच्या काळजीबरोबर यजमानांचा धाक. त्याला काही होता कामा नये.

आता असं सारं थोडंच हातात असतं. कुठं सर्दीवाऱ्याची शिंक कुमारला आली, ती त्यांच्या कानांवर गेली की, आरडाओरडा सुरू. 'तुम्ही काळजी घेत नाही. कान उघडे टाकता. अंगात काही न घालता फिरवता. मग अशी इन्फेक्शन होतात. आता लवकर बरं होत नाही तर, चांगल्यात चांगल्या डॉक्टरकडे न्या !'

त्यांना 'न्या' म्हणणं किती सोपं आहे. ते ऑफिसमध्ये हुद्यावर असले तरी इथं काही हाताशी नोकरचाकर आहेत का ? त्याला घेऊन दुचाकीवरून एकटीला जाणं कसं शक्य आहे ? त्यात बाहेर पाऊस. त्यात आनंदीबाईंची नोकरी. त्यांच्यावरही वेळेची, कामांची बंधनं. नोकरीत असं कोण कोणाला सारखी सूट देणार आहे. एखाददुसऱ्या वेळी लवकर जा - उशीरा या म्हणतील. पण नेहमीचं झाल्यावर सारख्या सवलती कोण देणार ? बरोबरचे पुरुष कर्मचारी शेवटी ओरडणारच, 'त्या काय कमी पगार घेतात का आमच्यापेक्षा. पगार सारखा, तर द्या सारख्या जबाबदाऱ्या, लावा नियम आमच्यासारखेच. एखादा अपवाद ठीक आहे. पण हे दर आठवड्यात काय आहे ?'

आनंदीबाईंना ऐकू जाई. वाईट वाटे. डोळ्यांसमोर पाळणाघरात

ठेवलेला लहानगा कुमार दिसे, दुसऱ्या क्षणी डोळे वटारणारे यजमान, तिसऱ्या क्षणी सुपर स्पेशालिस्टकडच्या त्या रांगा नि खेटे. जन्मल्यापासून तीन वर्षं त्यांनी काय सोसलं ते त्यांनाच माहिती. स्वतःच्या प्रकृतीकडं लक्ष देणं सोडाच, दोन वेळचं जेवण वेळेत मिळू शकलं तरी खूप. कुमारच्या तंत्रानं त्याचं सगळं आवरणं म्हणजे अक्षरशः सर्कशीत काम केल्यासारखं असे.

त्यांना काही सांगायला जावं तर ते घरीसुद्धा कामात. नाही तर फोन. 'तो एकुलता एक आहे. त्याच्या कलानं घे. एकच मूल. तरी नीट तुमचं तुम्हाला सांभाळता येत नाही ?'

हे एवढ्यावर संपत नसे. तर नेहमीचं भरतवाक्य 'आमच्या आईनं आम्हा सहासहा भावंडांना कसं सांभाळलं असेल ? आँ ?'

जणू आपल्याला सहा मुलं नाहीत ही आपली चूक असल्याचा चेहरा करून, पुन्हा एकदा नेटानं कुमारचं करायला लागत. त्यांना अनेकदा वाटे, यांना ताडताड बोलावं. 'तुमच्या आईला सहा मुलं होती हा माझा दोष नाही. त्या फक्त घरच सांभाळत होत्या. ते सांभाळून नोकरीची तंत्रं सांभाळत नव्हत्या. घरातले सणवार, कुलाचार, कुलधर्म त्यांच्याकडं नव्हतं. त्यांच्या धाकट्या दीरजावेला मूलबाळ नव्हतं. ती दोघंही मोठ्या मनाची होती. ती यांना मदत करीत होती. मला या साऱ्यात तुम्ही हे सणवार लादले आहेत. घरात जेवायला सगळ्या गोतावळ्याला बोलावता. सगळ्यांचं नीट व्हायला पाहिजे. बाराला जेवायला सगळे बरोबर गोळा होऊन येतात. दहापंधराजण. एक-दोघींना तरी कधी सकाळी मदतीला आलेलं पाहिलं आहे का ? त्यांना एक शब्दानं बोलायला जीभ रेटते का ? सणवार काय माझ्या एकटीचा आहे का ? इस्टेटीतली पळीसुद्धा आठवणीनं मागून घेऊन जाणारी ही भावंडं ! आजारी अन् अंथरुणावरचे आईवडील सांभाळायच्या वेळेला तेवढे गायब कसे होत होते ? पळीवाल्या आईवडिलांची आठवण कुठं गेली ? ते तुम्ही

का विचारलं नाहीत ? मी जरा आठ दिवस आजारी होते तर कुमारसाठी राहू दे, त्यांच्याच आईवडिलांसाठीतरी या म्हटल्यावर कुणाला बरं नाही, शेजारी मयत, कुणाच्या घरी मुलांच्या परीक्षा... त्यावेळी तुम्ही कुणाला खडसावलं नाही की मला मदत केली नाही ! उलट मदतीला कुणीतरी बाईमाणूस बघ. काय द्यायचं -घ्यायचं ते ठरव. नीट विश्वासू बघ. ही तंबी मलाच देऊन तुम्ही महत्त्वाची मिटिंग आहे म्हणून, बाहेरच जेवतो म्हणून, पळून गेला पळून ...!'

आनंदीबाईंचं डोकं ते दिवस आठवले तरी परत ते विचार येऊन भणभणून गेलं. हे त्यांना तेव्हाही बोलता आलं नाही आणि पुढच्या आठदहा वर्षांत कधीही. त्यात त्यांना फोनचा प्रसंग आठवला. तो आठवला तरी त्यांना धडधडायला लागे. सकाळी उठलं की, फोनची रिंग सुरू होई. पळतपळत हॉलमध्ये जाऊन तो घ्यायचा त्याचवेळी इकडं भांडीवाली, स्वयंपाक, कुमारची काहीतरी दूधपाण्याची कुरकूर - कधी आजारपण, कधी स्वतःच्या तब्येतीची तक्रार. बरं फोन उचलायला उशीर व्हावा, कधी फोडणी करपेल म्हणून मिनिटभरानं जावं, तर बेडरुममधून यांचा आरडाओरडा, 'किती वेळ झाला फोन वाजतोय. बघा की पटकन ?'

त्यांना वाटे माझा फोन आठवड्यातून एकसुद्धा येत नाही. येणार ते यांचेच. कुणी रिकामटेकडे मित्र, ऑफिसची कामं, युनियनची कामं, कुणाला कसली माहिती हवी, कुठला पत्ता-फोन हवा - याचेच फोन. माझ्या हातात आधीच चार-चार कामं. त्यात मी तो घ्यायचा, पुन्हा यांना बोलवून द्यायचा. पुन्हा परत स्वयंपाकघरात जायचं. पुढचं काम. एकदा त्यांनी म्हटलं, 'आपण पॅरलल फोन घेऊया का ? लॅण्डलाईनला मिळतात, तसे फोन. एक तुमच्याजवळ ठेवा.'

'नको. काय पैसे वर आले नाहीत आपल्याला. त्याची पुन्हा घरभर रिंग वाजणार माझी झोपमोड होणार.' यजमान.

'आपण रिंग हळू ठेवू. वाटलं तर माझ्या पगारातले साठवून त्यातून आणते.'

'एवढे पैसे तुझ्याकडे जास्त झाले असले तर आपल्या बाळूच्या मुलाच्या ॲडमिशनला दे.'

त्या बाळूला चांगलं ओळखून होत्या. तो उधळ्या होता. फोनचं राहिलं बाजूला नि त्यांच्या खात्यातले पैसे मात्र या नावाखाली बाळूकडं द्यावे लागले.

त्याहीपेक्षा वाईट - फोन न ठेवल्याचा प्रसंग ! यांना सकाळ संध्याकाळ फोनचा सारखा त्रास होई. त्यांचं म्हणणं येऊ देत, पण त्यांचे फोन आहेत, त्यांना शक्य आहेत त्यांनी उठून घ्यावे. चारचार वेळा सकाळचा स्वयंपाक - कुमारचं आवरणं या सगळ्यात त्यांची नकळत इतकी चिडचीड झाली की, पाचवा फोन आल्याचं सांगताच त्या म्हणून गेल्या, 'एकदा काढून ठेवल्याशिवाय ही कटकट संपायची नाही.' त्या पुटपुटत स्वयंपाकघरात गेल्या.

थोडा वेळ त्यांचं कामात लक्ष असल्यानं त्यांच्या काही लक्षात आलं नाही. यजमान नेहमीप्रमाणं आवरून आले, ते तरातरा. आनंदीबाईंनी ओळखलं की, आणखी काही तरी बिनसलं असणार. त्यांची तिडीक त्यांना माहीत होती पण पुढं त्यांनी जे पाहिलं ते त्यांच्या आजन्म डोक्यात घण घालणारं होतं. ते आत आले. जेवणार का, डबा देऊ का विचारायच्या आतच स्वयंपाकाच्या कट्ट्यावर टेलिफोनच्या वायर उचकटून त्यावर टेलिफोनचं क्रेडल आदळीत ते म्हणाले, 'हा टाकला काढून फोन. तुझा त्रास संपला ? आता त्याला घरातून तूच बाहेर फेक. वाटलं तर मलाही फेकून दे !'

'अहो, अहो...' करीत त्या दरवाजापर्यंत पोचायच्या आत यजमान तरातर पायऱ्या उतरून आपल्या ऑफिसच्या कारनं वेगानं गेटमधून बाहेरही पडले होते. आनंदीबाईंना सुन्न झालं. त्या प्रथम खाली बसल्या. त्यांनी

शेजारच्या काकांना बोलवलं. फोन होता तिथं ठेवला. वायर त्यांच्याकडून जोडून घेतल्या. फोन पलीकडं ठेवताना त्या चुकून ओढल्या गेल्यानं निघाल्याचं त्यांना सांगून सावरून घेतलं. शेजारच्या काकांना काय झालं असेल याचा अंदाज होता. पण आनंदीबाई काय सोसत तेही त्यांना माहीत होतं.

'असू दे. मी करतो ते.' म्हणत त्यांनी ते पुरं केलं.

फोन सुरू झाला. तशाही भेदरलेल्या स्थितीत आनंदीबाईंनी शेजारच्या काकांना चहा दिला.

सकाळच्या गडबडीमुळं 'मी जातो' म्हणत ते घरी गेले. तेव्हा आनंदीबाईंचे हातपाय गळले. ऑफिसला जाण्याचीही त्यांच्यात हुशारी राहिली नाही. त्यांनी पहिल्यांदा ऑफिसला फोन करून येत नसल्याचं कळवलं.

सर्व कामं थांबवून कुमारची वाट पाहात राहिल्या. कुमारची चौथी होती. शाळा सकाळची होती. रिक्शा यायची होती. तेवढ्यात फोन वाजला. आनंदीबाईंना पुन्हा धडधडायला लागलं. पुन्हा फोन सुरू केल्याचं कळून रागावतात की काय, त्यांचाच फोन असेल तर ? त्यांच्या पायात फोनपर्यंत जाऊन तो उचलण्याचं त्राण नव्हतं. शेवटी रिंग थांबली.

पाच मिनिटांनी शेजारचे काका आले. त्यांचा चेहरा जरा गंभीरच होता.

त्यांनी विचारलं, 'काका काय नेहमीसारखेच ऑफिसात गेलेत ना?'

त्या म्हणाल्या, 'हो.'

'तुम्हाला जरा वेळ आहे का ? आम्ही दोघं आहोत बरोबर.आपण जरा जाऊन येऊ या.'

'का ?' आनंदीबाईंना अगदी मन चिंती ते वैरी न चिंती, असं झालं.

'ऑफिसचा फोन होता. साहेबांच्या गाडीला जरा धक्का लागला आहे. त्यांनी घरी फोन केला. लागला नाही. आमची ओळख आहे. म्हणून

मला आला. आपण जाऊन तरी येऊ. तुम्ही काळजी करू नका. हिलाही मी बरोबर घेतलं आहे, लागली तर मदत होईल.' शेजारी म्हणाले.

आनंदीबाई सुन्नपणे बसल्या. तेवढ्यात कुमारची रिक्शा आली. शेजारच्या दुसऱ्या काकूही आल्या. त्या म्हणाल्या 'मी बघते त्याच्याकडं. तुम्ही जाऊन या !'

आनंदीबाई यंत्रवत शेजारच्या जोडप्याबरोबर घराबाहेर पडल्या. त्यांना ऑफिसला न नेता मोठ्या हॉस्पिटलमध्ये नेलं. तिथल्या डॉक्टर्सची, नर्सेसची धावपळ सुरू होती. त्यावरून काय ते कळत होतं. सर्वांत सीनियर डॉक्टरनी आनंदीबाईंना सांगितलं, 'आमचे प्रयत्न चालू आहेत. पण आशा खूप कमी आहे. गाडी डिव्हायडरला खांबावर क्रॅश झाली आहे. पण ते बेशुद्धीत आहेत. असंबद्ध पुटपुटतात. तुम्ही एकट्याच जवळून पाहू शकता...'

आनंदीबाई पुतळ्यासारख्या हालचाली करीत होत्या. प्रचंड तळमळ, ग्लानी यानं क्षणक्षण मोजत असलेले यजमान त्यांनी पाहिले. त्यांच्या जवळ जाऊन, तोंडाला कान लावून, कानांत प्राण आणून ऐकत होत्या. जीवनाच्या शेवटच्या उंबरठ्यावरच्या त्या प्रवाशानं आनंदीबाईंना ओळखल्याचे भाव त्यांच्या डोळ्यांत तरळले. 'क्षमा..क्षमा..रागानं घात झाला....कुमारला..सांभाळ..' शेवटचा शब्द पुरा व्हायच्या आत मान कलंडली. आनंदीबाई कोसळल्या.

इतक्या क्षणात हे घडलं की, आजूबाजूच्यांना काय झालं तेही कळलं नाही. आधीच्या डॉक्टर्सची टीम यजमानांकडं, त्यांना वाचवण्यासाठी वळली.

बाकीच्या साऱ्यांनी आनंदीबाईंना उचललं. दुसऱ्या कॉटवर हालवलं. त्या मानसिक धक्क्यात होत्या. त्यांचे उपचार सुरू झाले. अपघात एवढा मोठा आणि उघडउघड होता की, त्याचीच चर्चा होत राहिली. अचानक त्यांचं

व्हीलवरचं नियंत्रण सुटून गाडी खूप वेगात असल्यानं कसा दुर्दैवी अपघात झाला, ते अकाली गेले, पत्नी-शाळकरी मुलगा- इ. चर्चा झाली. यथावकाश साऱ्या गोष्टी घरोघरी झाल्या. आनंदीबाईही घरी परतल्या. कुमारला प्रथम त्या अर्थानं काहीच कळलं नाही. फक्त अपघात वगैरे ऐकून असल्यानं तो गप्पगप्प होता. यजमानांचा सारा गोतावळा आठपंधरा दिवस कसे तरी जाऊन येऊन काढून हळूहळू कुठली जबाबदारी अंगावर येऊ नये अशा पद्धतीनं पांगला.

एक झालं, फार काही विषय मागं लागू नयेत म्हणून बराचसा गोतावळा आता कामापुरताच येऊ लागला. सणवार-कुलाचार वगैरे विषय कुणी काढेनासं झालं. आनंदीबाईंना हा धक्का प्रचंड होता. पुढचं भवितव्यही कठीण दिसत होतं. यजमानांच्या ऑफिसनं वेगवेगळे क्लेम देऊन त्यांना पेन्शनसारखी रक्कम कायमची उभी करून दिली. शिवाय हळूहळू त्यांची नोकरी परत सुरू झाली.

काळजी होती ती हळूहळू वाढणाऱ्या आणि पुढच्या बाहेरच्या परिस्थितीला बळी पडू शकणाऱ्या कुमारची. त्याच्या चौथीपासून आजच्या या इंजिनिअरिंगपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात त्याचा हट्ट न पुरवला तर त्याला येणारी तिडीक पाहून आनंदीबाईंच्या पोटात कालवाकालव होई. कशाला नाही म्हणायचं जणू त्यांना स्वातंत्र्यच नसावं, असं त्यांचं आयुष्य बनलं. हट्ट, राग, नाश - अशा अनेक गोष्टींचा एक अध्याय फार मोठा दणका देऊन संपला. पण या पुढच्या पिढीच्या या अध्यायाची सुरुवातच वरच्या पट्टीत होती. त्याच रागात होती.

त्यांना साथ होती ती फक्त शेजाऱ्यांची, इतर सहानुभूती असलेल्यांची. ते इतर कुठली उणीव भासू देत नव्हते. पण...हा घरगुती प्रश्न. ते तरी काय करू शकत होते. बरं बाहेरचं वातावरण तर शहाण्याला वेडं करील इतकं

बदलत चाललेलं. एके काळी पंधरावीस वर्षांपूर्वी जे फोनवरून झालं तेच आता मोबाईल अन् बाईकवरून सुरू होतं. फोन बरा म्हणायची वेळ येईल इतकं हे मोबाईल प्रकरण हॉलच्या कोपऱ्यात नव्हे, खिशाखिशात पोचलं होतं. मोठमोठ्या माणसांनाही वेड लावीत होतं. तिथं या अर्ध्या वयातल्या पिढीचं काय ! ती पिढी तर गळ टाकून आमिषांनी भुलवीत जावं तशी तंत्रज्ञानाच्या मायाजाळात आणि अनीतीच्या, अविचारांच्या जगात खेचली जात होती. एकट्या आनंदीबाई काय करू शकत होत्या.

त्यांना फक्त आठवत होते ते यजमानांच्या शेवटच्या क्षणातले चेहऱ्यावरचे हताश - केविलवाणे भाव, क्षमायाचना, विकारांचा पश्चात्ताप अन् निघून गेलेली वेळ...त्या आता फक्त सर्वसत्ताधीश परमेश्वरावर भरवसा ठेवून, प्रार्थना, साकडं घालीत होत्या. त्यांना आता स्वतःसाठी काही नको होतं. फक्त स्वास्थ्य, सद्‌बुद्धी, या कुमार आणि त्याच्या पिढीसाठी विवेक,विचार, शांती, प्रगती.

त्या अशा किती वेळ विचार करीत बसल्या असत्या कुणास ठाऊक. पुन्हा गॅलरीत एकदा जाऊन यावं की काय, असा विचार त्यांच्या मनात येत होता. तेवढ्यात खाली बाईक पार्क केल्याचा आवाज आला. धाडधाड जिना चढून आल्याचा आवाज आला. दार ढकलून कुमार आत आला. नेहमीच्या सवयीनं, थोड्या रागानं चपला भिरकावल्या - आई तिथं उभी असल्याची दखलही न घेता तो थेट आवरायला आतल्या खोलीत गेला.

'जेवायला येतोयस ना?' आई.

'मी मित्रांबरोबर मिसळ खाल्ली आहे. भूक नाही. नेट कॅफेत गेलो होतो.' कुमार.

'निदान थोडा दहीभात खा !' त्यांनी विनंती करून पाहिली.

'हं..' उपकार केल्यासारखा कुमारनं हुंकार दिला.

दोघं जेवणाच्या टेबलवर बसले. तो पटकन सटकायच्या विचारात आहे हे आईच्या लक्षात आलं. पुन्हा हा खोलीत दार लावून बसला म्हणजे भेटही व्हायची नाही म्हणून त्यांनी विचारलं, 'काय एम्.टेक्ला ॲडमिशन मिळतेय ?'

'हं..' म्हणत पुढं विषय वाढू न देता तो उठला.

आईला शंका वाटली. पण अविश्वासानं विषय उगीच तिसरीकडं जाऊ नये म्हणून ती काहीच बोलली नाही. रात्री पुन्हा एकदा तणावात दोघंही आपापल्या खोलीत झोपी गेले.

पहाटेपहाटे आईला दारावर टकटक ऐकू आली. भास असेल म्हणून तिनं अंथरुणावरूनच खात्री केली. नक्कीच कुणीतरी आलं आहे. आनंदीबाई पटकन उठून बाहेर आल्या. बाहेर नुकतं उजाडत होतं. दारात सहा फूट उंचीचे शुभ्र दाढीवाले अत्यंत तेजस्वी पुरुष ताठ उभे होते. अंगात साधा पांढरा शर्ट, धोतर, हातात एक काठी.

आनंदीबाईंनी पुन्हापुन्हा अविश्वासानं पाहिलं. आपण स्वप्नात तर नाही ? 'आजोबा तुम्ही ? तुम्ही आहात ?'

'होय बाळा, मीच आहे आणि अजून आहेही !'

या एका सुखद धक्क्यातून भानावर आल्यावर आनंदीबाईंनी दारातच वाकून त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं. त्यांना आधी आत या म्हणायचंसुद्धा भान राहिलं नाही. मग त्या त्यांना आत घेऊन आल्या. ते समोरच्या एका लाकडी चौरंगासारख्या फळीवर मांडी घालून बसले. आनंदीबाई अजून आनंद, आश्चर्य, उचंबळून आलेलं प्रेम, साऱ्या आठवणी - यांच्या धक्क्यातून सावरल्या नव्हत्या. हळूहळू त्या भानावर आल्या. स्वर्गातून एकदम एखादा देवदूत प्रकट व्हावा तसं त्यांना ते वाटत होतं. ते शांतपणे त्यांच्या या प्रतिक्रिया पहात होते.

जरा सावरल्यावर त्यांनी पुन्हा एकदा आजोबांना नमस्कार केला. 'आजोबा, पण तुम्ही आमचा निरोप घेऊन गेलात ते वीस-पंचवीस वर्षं होतात कुठं. खरंच आम्हाला तुम्ही आहात हेही माहीत नव्हतं. बाबासुद्धा गेले की मध्ये !'

'असू दे बाळ ! मी तिकडं हिमालयात होतो. काही काम पडलं म्हणून इकडं आलो आहे. वय कोण मोजतं आहे आता. शंभरी कधीच होऊन गेली. ठेवलं आहे. राहिलो आहे. काम आहे. आलो आहे. झालं, जाईनही परत !'

'आजोबा, तुमचं कोडं आम्हाला कधीच कळलं नाही !' आनंदीबाई.

'बाळा, ते कळायचंही नाही पण मला मात्र जरूर तेवढं तुमचं कोडं कळतं. तू सावरलीस की नाही अजून ?'

आनंदीबाईंचे डोळे भरून आले. अजूनपर्यंत असं कुणी प्रेमानं विचारलंच नव्हतं. आजोबांच्या मांडीवर डोकं ठेवून ती ओक्साबोक्शी रडू लागली. आजोबांनी तिला जरा हलकं होऊ दिलं. मग म्हणाले, 'हे देणंघेणं असतं. घ्यावंही शांतपणे, द्यावंही शांतपणे. असू दे. मी त्यासाठीच आलो आहे.!'

आता आनंदीबाईंना साध्या शिष्टाचारांचं भान आलं. आपण आलेल्या या विलक्षण पुरुषाला आपल्या घरी साधं पाणीही विचारलं नाही, आणलं नाही, त्या आत जाऊन हातपाय धुऊन पाण्याचं तांब्याभांडं नि गुळाचा खडा नि शेंगदाणे वाटीतून घेऊन आल्या.

'हे छान झालं. तुझ्या लक्षात आलं आहे, आता बाकीचं काही मला नको !'

'बरं तो कुमारबेटा कुठं आहे ?' आजोबा.

आनंदीबाई अजीजीनं म्हणाल्या, 'नाही उठत तो इतक्या लवकर!'

'ठीक आहे. मी उठवतो त्याला. मला फार वेळ नाही !' आजोबा.

आनंदीबाई त्याच्या खोलीकडं त्याला हाक मारायला पुढं झाल्या. आजोबा ताडकन उठून उभे राहिले. ते एखाद्या ध्वजासारखे दिसत होते. नेहमीप्रमाणं दरवाजाला आतून कडी होती. आनंदीबाईंनी एकदोनदा हाक मारली. नाइलाजानं त्यांनी आजोबांकडं पाहिलं.

आनंदीबाईंना काही कळायच्या आत आजोबांनी दरवाजाला हात लावला आणि तो उघडला. 'कुमार !' मगाचपासून अत्यंत निर्मळ, प्रेमळ आवाजात बोलणाऱ्या आजोबांचा आत्ताचा करडा आवाज आनंदीबाईंचा थरकाप करून गेला. अशा आवाजाची कुमारला कधी ओळख नव्हती. त्याला काय होतं आहे हेही कळलं नाही. ते कळेपर्यंत आजोबांनी त्याला कॉटवरून एखाद्या लहान मुलाला उचलावं तितक्या लीलया उचलून अधांतरी धरलं होतं.

आता मात्र त्याची झोप पार उडाली होती. आयुष्यभराची झोप उडावी तसा त्याचा चेहरा धक्का आणि भय यांमुळं ग्रस्त होता.

तितक्यात आजोबांनी करड्या आवाजात विचारलं, 'क्यूँ कैसे हो बेटा कुमार ! जग गये ?'

कुमारची एव्हाना बोबडी वळायची वेळ आली होती. आपण अजूनही अधांतरी आहोत हे लक्षात येऊन केलेली लाजिरवाणी धडपड, त्याचा कुठलाही न होणारा उपयोग - या साऱ्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. शांतपणे आजोबांनी विचारलं, 'जमिनीवर पाय टेकायचे आहेत ?'

'हो !' पंचविशीतला कुमार अगतिकपणे म्हणाला.

आनंदीबाई मागं उभ्या राहून अविश्वास आणि विस्मयानं सर्व पाहात होत्या.

जमिनीवर उभा राहिल्यावर अजूनही कुमार अविश्वास आणि किंचित

आदरयुक्त भीतीनं या गृहस्थांकडं पाहात होता. त्यांना आत कसं येता आलं हेही त्याला कळलं नाही. तोवर त्यांनी आतल्या खोलीतल्या नटनट्या-क्रिकेटर, मॉडेल्स यांच्या फोटोंकडं शांतपणे नजर फिरवली होती. मग त्याच्याकडं बघून ते म्हणाले, 'मी माझा परिचय देतो. मी तुझ्या आईचा आजोबा. तुझा पणजोबा !' कुमार पाय धरायला वाकला.

आयुष्यात पहिल्यांदा कुमारला पटकन पाया पडताना आनंदीबाईंनी पाहिलं.

'दुसरं मी आत कसा आलो. मला या विद्या येतात. तसं या दाराला मी एक लाथच काय, एक धक्का देऊनही मी आत येऊ शकलो असतो. पण मला उगाच तुम्हाला दुरुस्तीच्या खर्चात टाकायचं नाही, बरोबर ? कुणीच कुणाला उगीच खर्चात टाकू नये !'

ते पुढं म्हणाले, 'आता असं करूया. मलाही वेळ कमी आहे. तू तुझं आवरून बाहेर ये. तोवर मी बाहेर बसतो.'

कुमार प्रथम एकदम स्तब्ध, शांत, विचारमय दिसत होता. कितीतरी दिवसांनी तो पटकन कुणाचं तरी ऐकत होता. तेही शांतपणे आणि कृतीही करायला निघाला. आनंदीबाईंना सारं स्वप्नासारखं वाटत होतं. आजवर त्यांनी कितीतरी दुःस्वप्नंच पाहिली होती. आजचं हे सुखद स्वप्न खरं वाटेल एवढीसुद्धा त्यांच्या मनात ताकत राहिली नव्हती. पण का कुणास ठाऊक त्यांना लहानपणी ध्यानाला बसणारे, कामात असले की, अत्यंत एकाग्रपणे काम करणारे, सर्वांना सारं समजावून देऊन करून घेणारे आजोबा नजरेसमोर येत होते. खूप काळ रखरखीत उन्हातून घशाला कोरड पडेपर्यंत चालल्यावर डेरेदार, शांत वटवृक्षाखाली कुणीतरी बस म्हणावं, भरपूर गार पाणी द्यावं. तेवढ्यानं जेवल्यासारखं चित्त शांत व्हावं तसं वाटत होतं.

त्यांच्यासाठी आपण काय करू शकू ? ठरवणं कठीण वाटलं म्हणून

त्या हॉलमध्ये गेल्या. तोवर आजोबा कोपऱ्यात पद्मासन घालून ध्यानस्थ बसले होते. त्यांना चहा - नाश्ता - चहा - दूध विचारण्याची हाक मारणंसुद्धा त्यांना दुसऱ्या बाजूनं अपराध वाटला. त्यांच्या ठिकाणी इतकी शांतता होती की, त्या पटकन अंघोळ-पूजा करून हॉलमध्ये येऊन ध्यानाला बसल्या.

कुमार इतक्या वर्षांत प्रथमच सारं आन्हिकं आवरून देवांना नमस्कार करून हलक्या पावलांनी हॉलमध्ये आला. आजोबांच्या बरोबर जणू सगळा हॉल ध्यानस्थ बसला होता. कुमारला आपण कधीच असं शांत बसावं, स्वतःच्या विचारात बुडून शोध घ्यावा असं वाटलं नव्हतं. पण कुणी काहीही न म्हणता ते घडत होतं. तो स्वतः त्याचा अनुभव घेत होता.

पाच मिनिटांनी आजोबांनी शांतपणे डोळे उघडले. त्यांनी नातीकडं आनंदीकडं नजर टाकली. कुमारकडंही पाहिलं. आता त्या पाहाण्यात करडेपणा नव्हता. उलट करुणा होती. शांती होती. दैवी निर्धार त्यांच्या दृष्टीतूनच काय साऱ्या शरीरातून व्यक्त होत होता. ते हळुवार आवाजात कुमारला म्हणाले, 'मी तुझ्यासाठी आलो आहे, कळलं तुला ?'

आता कुमारच्या मनात भीती नव्हती. त्याला अजून हे सारं कळत नव्हतं. पण त्याला त्या आजोबांबद्दल - तशा पणजोबांबद्दल - फार आदर आणि प्रेम अकारण वाटू लागलं होतं. त्याला आतून सारखं सारं मन एकदम उलगडून, मोकळं करून त्यांच्यापुढं ठेवावं, त्रागा, त्रास, दुःख, मतं, कल्पना - अनेक गोष्टी त्यांच्याकडून स्वच्छ धुऊन घ्याव्या असं वाटत होतं. तो म्हणाला,

'होय आजोबा, माझ्या ते आता थोडं थोडं लक्षात आलं आहे. पण मला अजून नीट उलगडलेलं नाही. काहीतरी विलक्षण आणि चांगलं घडतं आहे, एवढंच मला आत्ता तरी वाटतं आहे.'

आनंदीबाई आता स्थिर होत्या. म्हणून त्या कुमारचे एवढे शांत,

समजूतदार शब्द खरे समजू शकल्या. नाही तर त्यांचा विश्वास यावर स्वप्नातही बसला नसता.

आजोबा पुढं म्हणाले, 'एक लक्षात घे. मी एक तसा सामान्य माणूस आहे. नात्यानंही तुला आजोबांसारखा आहे. मी काही कुणी गारुडी, चमत्कारी, जादूटोणावाला नाही. मला कुठल्या अनैसर्गिक शक्ती आहेत, असंही नाही...'

त्यांच्या प्रांजळ सांगण्यानं कुमार मनानं त्यांच्या अधिकच जवळ गेला.

ते म्हणाले, 'हे बघ, माणसाचं शरीर आणि विशेषतः त्यातल्या गोष्टी या अक्षरशः अतर्क्य पातळीवरच्या आहेत. कुणाला त्याची ओळख होत नाही. कुणाकडं श्रद्धा नाही. प्रामाणिकपणे प्रयोग करण्याची तयारी नाही. त्यासाठी लागणारे सततचे श्रमही घ्यायची इच्छा नाही. ते नसल्यामुळं असलं काही करून न पाहाताच , असं काही नसतं म्हणून पशूसारखं जगणं सोपं असतं. तेच बरंचसं जग करतं. बरंचसं जग तसं आहे, म्हणून ते बरोबर आहे, असं अजिबात समजू नको.पशूंमध्ये बाह्य जीवनाचं - दृश्य जीवनाचं प्रमाणच जास्त आहे. माणसाला बाह्य जीवन मर्यादित आहे. तेवढं त्याला पुरतं. पशूला खायला अख्खा पशू लागतो. माणसाला एक भाकरी पुरेशी होते. याचं कारण काय, त्याचं अंतर्जीवन खूप विशाल आहे. आत्मशक्तीचा तो कितीही विस्तार करू शकतो, कितीही खोल जाऊ शकतो. तू विचार कर, विज्ञान-विज्ञान म्हणजे या जडातल्या सूक्ष्माचं कार्यकारण भाव शोधणं आणि नियंत्रण करणं यातच अडकलेलं आहे. त्यानं दृश्य विश्व आणि इंद्रियं एवढंच गृहीत धरल्यामुळं त्याच्या त्यालाच मर्यादा पडल्या आहेत.'

'यात माणसाची फार मोठी मर्दुमकी नाही. ती आहे ती विशाल असलेलं अंतर्जीवन शोधणं, त्याला लांबीरुंदी-खोली देणं, इतकं की, ते

अनंताएवढं व्हावं. साध्या सूक्ष्माच्या अभ्यासानं आणि नियंत्रणानं माणूस आजार बरा करतो, विमान उडवतो, पाण्यावर तरंगतो, तर माणसाचं विशाल अंतर्जीवन हाती आलं तर, सूक्ष्मच काय, स्थूल - जड गोष्टी ज्याला एरवी आज फार कष्ट पडतात, काही गोष्टी तर अशक्य वाटतात त्या तिथं पालापाचोळा आहेत. तिथलं खरं कार्य हे नाहीच. कारण अंतरंगाएवढं व्हायला 'मी'पणा पूर्ण जायला हवा. तर मग एक तर 'माझी'म्हणून कुठली इच्छा नसण्यानं ती तुझी 'होतेच' 'करावी लागत नाही !' तुम्ही या विशाल अंतरंगानं ईश्वराएवढे होता, पण ईश्वराला ताब्यात घेऊन नाही, त्याच्याशी तादात्म्य होऊन ! मग या दृश्य जगातल्या गोष्टी किरकोळ, किरकोळ आहेत !'

कुमार डोळे विस्फारून ऐकत होता. ऐकता ऐकता आपण त्यांच्या जवळ कधी सरकलो हेही त्याला कळलं नाही. आजोबा पुढं म्हणाले, 'मी तुला एकदम काही कठीण सांगून गुंगवीत नाही. गुंतवीतही नाही. मला फक्त तुला जाणीव द्यायची आहे की, या फार फार विशाल, दैवी जगाला तू मुकू नकोस. आपल्यात ती क्षमता आहे.'

'आता तुला साध्या व्यवहारातलं सांगतो. पण तुला हे सारं पटतं आहे ना !' आजोबांनी विचारलं.

कुमारनं म्हटलं, 'आजोबा, मी आजवर असं काही कधी ऐकलं नाही. पण हे जे मी आत्ता ऐकलं आहे, ते मला पटतं आहे. काही गोष्टींचा उलगडाही मला झाला. पण हे आज, असं कशासाठी घडतं आहे, हे सांगाल का ?'

'जरूर. प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते. ते एक कारण आहेच. पण आपण जगात केलेली कुठलीही हालचाल तिचा परिणाम - प्रतिक्रिया घडवून आणते, बरोबर ?' आजोबा.

'हो !' कुमार.

'आता असं पहा, अभ्यास हे प्रयत्न आणि पास होणं हा त्याचा परिणाम ! पण नुसताच अभ्यास आणि पास असा संबंध आहे का ? अभ्यासाची कुवत, तासांची संख्या, त्याची गुणवत्ता - त्यामागची तळमळ, त्यातली अचूकता - एकाग्रता - सातत्य असे अनेक घटक या 'पास'ला कारणीभूत होतात ना ? चाळीसवरही पास, साठवरही आणि नव्व्याण्णववरही! पण सारं समजून न घेता, सगळीकडं झालेला अन्याय, वशिले, अलीकडं काहीही घडतं, प्रयत्न करूनही यश नाही, काहींच्या नशिबात आहे - अशा अगणित प्रतिक्रिया ऐकायला मिळतात. त्यात तथ्य आहे, असं म्हणता येईल? आपण मुळातच सावध व्हावं, प्रश्न नीट समजून घ्यावा, आपली परिस्थिती पाहावी - बहुधा प्रश्न उरतच नाही. मग सीईटीत नापास होणं स्वाभाविक आहे. ते असू दे. पण पास झालो म्हणणं अस्वाभाविक आहे. पुढच्या अवनतीला कारणीभूत ठरणारं आहे, बरोबर ?' आजोबांनी कुमारकडं पाहात विचारलं.

या वेळी या म्हणण्यावर उसळून काही उलटसुलट बोलावं अशी इच्छाही कुमारला झाली नाही. त्याला आपण रात्री आईला पास झाल्याला होकार दिल्याची उलट मनोमन खंत वाटली. आयुष्यातली पहिली ! आत्ता त्यानं आजोबांना होकार दिलाच पण आईकडं अपराधी भावनेनं पाहिलं. आईला तो पास होण्याच्या आनंदापेक्षा जास्त आनंद झाला, हायसं वाटलं. होऊ दे नापास. बघू. इतका विचार ती सहज करू शकली. तिकडं आत्ताच्या साऱ्या पार्श्वभूमीवर कुमारला हे आजोबांना कसं कळलं, हे विचारावंसंही वाटलं नाही. ते सत्य होतं आणि ते सत्यशक्तीशी तादात्म्य होते.

'बघ कुमार, तुझ्या एका अस्वाभाविक गोष्टीनं आईला ताण दिला. तू पास झालो म्हणून सांगूनही तिची रात्र अस्वास्थ्यात गेली. पण ते तू सहज-सरळ-नैसर्गिक राहिलास तर, नापास झालास हे कळूनही आईनं रागावणं सोडाच पण तिला तणाव नाही, दुःख नाही. उलट, शांत आहे, आनंदात आहे!

पास होणं गौण आहे. पण हा जो दुसऱ्याचा विचार तू करू शकतोस आणि सहज जगू शकतोस. ते फार फार मोलाचं आहे !' आजोबा त्याला समजावीत म्हणाले, 'नापास होणं हे काही पाप नाही - कमी पडलेल्या प्रयत्नांचा तो परिणाम आहे, पण आईचा विचार, तिच्या कष्टांचा, अंतरंगाचा विचार न करणं हा मात्र दोष आहे !'

कुमारनं प्रथमच सौम्यपणानं, क्षमायाचनेच्या दृष्टीनं आईकडं पाहिलं. आनंदीबाईंनी मान खाली घातली.

'बाळ..' आनंदीबाईंकडं वळून ते म्हणाले, 'तू किती वर्षं काय काय सोसलं आहेस याची मला कल्पना आहे. कुमार तुला माहीत आहे, तुझे वडील कशानं गेले ?'

आजोबांनी आत्तापर्यंतच्या पार्श्वभूमीवर विचारलेला हा प्रश्न कुमारला त्यामानानं एकदम सरळ, सोपा वाटला. तो पटकन बोलून गेला, 'ते कशानं नाही, अपघातात गेले. वेग होता, गाडी डॅश झाली..!'

आजोबा शांतपणे म्हणाले, 'बरं मग यापासून तू काय शिकलास. तू दुचाकी शांतपणे चालवतोस की, घरच्यांना निघाल्यापासून सुखरूप परतेपर्यंत काळजी लागेल अशी चालवतोस ?'

कुमारपुढं पर्याय नव्हता. सरळ, सहज राहायचं होतं. तो उद्‌गारला, 'नाही आजोबा ! माझं चालवणं इतकं शांतपणे नाही. मी रॅश चालवतो. यापुढं काळजी घेईन !'

'सांगितलंस हे फार चांगलं झालं. शिकत नाही तो माणूस कसला ? म्हणून तर तो उन्नत होऊ शकतो. तू जे वाहन चालवतोस, आजवर कसंही चालवलंस, त्यापोटी नुकसान झालं, दुरुस्त्यांचे खर्च झाले - ते वाहन तुझ्या कष्टाचं, स्वतःचं आहे ? जरा थांब, ऐक.तुला वाटेल मी अजून मिळवत नाही. स्वतःच्या खर्चानं कसं घेऊ शकणार ? स्वार्थी बुद्धी अशीच वकिली करून

माणसाचा घात करते. एक नक्की ती वस्तू दुसऱ्यानं - आईनं कष्टाच्या कमाईनं घेतली आणि तुला दिली. निदान ती तिची आहे, यासाठी तरी ती जाणीव ठेवून नीट, निर्धोकपणे वापरणं ही जबाबदारी कुणाची ? आईची ?'

'नाही आजोबा, माझी. मी हा विचार पूर्वी कधी केलाच नाही. हा विचार आला असता तर पूर्वीसुद्धा यापेक्षा जपून वापरली असती. आता आणखीन काळजी घेईन !' कुमार.

'तू गेली दोन वर्षं आणखी शिकणार-शिकणार म्हणून घरी बसला आहेस. फ्रेशर म्हणून तुला जी नोकरी तेव्हा आली होती, ती स्वीकारली असतीस तर या गाडीचं कर्ज तू फेडू शकला नसतास का ? तोपर्यंत तुला कामाचा, जगाचा आणखी अनुभव आला नसता का ? त्याचा उपयोग होऊन तू आणखी पुढं प्रगती करू शकला नसतास का ?' आजोबा थेट आणि निरुत्तर करणारे प्रश्न शांतपणे ठेवीत होते.

'बरोबर आहे आजोबा. हे मी जरूर करू शकलो असतो. पण बाकीचे सारे मित्र, पीजी करणं, डबल ग्रॅज्युएट होणं, इतर कोर्स करणं - असं करायचं म्हणत होते. म्हणून मीही तशाच प्रयत्नांत होतो !'

'आता हेही लक्षात ठेव. कळपाबरोबर जातात ती मेंढरं ! आपण माणूस ! फार क्षमतेचे आहोत. पण तेवढा स्वतंत्र विचार, झेप, पल्ला, कृती दाखवली तर ना ?' आजोबा.

'खरं आहे. मी या साईडला गेलो तेसुद्धा माझं थोडं चुकलंच असं मला वाटतं. सगळे गेले म्हणून मीही गेलो...' कुमार.

'असू दे कुमार, मागचा विचार आता न करणं हिताचं. अनायासे तुला डिग्री मिळाली आहे. पण पुढं तरी सावध हो. पुढची ही सारी दिवास्वप्नं आहेत. गेलेली दोन वर्षं आता परत येणार नाहीत. आहेत ती नीट दिशेनं, तुझ्या कुवतीप्रमाणं कामी लावता येतील.'

कुमारनं मनापासून मान हलवली.

आजोबा पुढं म्हणाले, 'आणखी एक महत्त्वाचं. तुझे वडील अपघातानं गेले नाहीत, रागानं गेले !'

कुमारनं धक्का बसून त्यांच्याकडं आणि आईकडं अविश्वासानं पाहिलं. तो सारा प्रसंग आठवून आईच्या डोळ्यांत पाणी आलं. कुमार तेव्हा लहान होता. त्याच्या दृष्टीनं अपघात डोळ्यांसमोर होता. खरा होता. इतकी वर्षं वडिलांच्या रागाचा त्याला बालपणाचा अनुभव होता. पण त्याची तीव्रता इतकी भयाण असेल, हे त्याच्या कल्पनेतही नव्हतं.

'कुमार राग हा नैसर्गिकरित्या उत्क्रांतीत आलेला असला तरीही तो रोग आहे. विष आहे. अरे, विषाचासुद्धा औषधात वापर होतो पण अत्यंत कमी. सांभाळून. सरसकट वापरतील तर माणसांचे जीव जातील ना ? आपल्या रागाची जाणीव नसली म्हणजे मग त्याचं रूपांतर रोगात होतं. हा रोग इतका वाईट आहे की, ज्याला होईल त्याचा नाश होणं, नुकसान होणं हे स्वाभाविकच आहे. पण हा रोग दुसऱ्याचं नुकसान, नाश करू शकतो. हा सारा विचार करण्याची क्षमता फक्त माणसात आहे ! त्याचं स्थान ओळखून त्याच्या जागी त्याला ठेवण्याची क्षमताही माणसात आहे. वेळी त्याच्यापासून मुक्त होण्याचीसुद्धा !'

तुला कल्पना नसेल पण ते नकळत तुझ्याकडून उचललं गेलं आहे. आईचा आधीचा दहा वर्षांचा भोग संपला. बाबांनी शेवटच्या श्वासाला क्षमा मागितली. ते त्या दोषातून थोडे तरी मोकळे झाले. तू आईला कधी मोठं झाल्यावर तरी विचारलंस शेवटी काय झालं ?'

'नाही, आजोबा !'

'एवढंच नाही. तो राग, तीच राख डोक्यात वागवून तू स्वतःचा नाश करतो आहेस.तो थांबवण्याची वेळ आली असं वाटतं ना तुला ? तुला

पाहायचा आहे तुझ्या रागाचा रोजचा परिणाम ?' असं म्हणत आजोबांनी त्याच्या दोन बाजूला अस्ताव्यस्त काढलेल्या चपलांकडं बोट केलं.

कुमार पटकन उठला. आता त्याला प्रत्यक्ष कृती केल्याशिवाय राहवेना. पण आजोबांनी त्याला रोखलं. ते म्हणाले, 'अरे, या चपला जड जगातील किरकोळ वस्तू आहे. ती तुझ्यासारख्या विलक्षण क्षमतेच्या मनुष्यजातीत रागामुळं काय काय करीत असते - त्याचं ते छोटंसं प्रतीक आहे. बाबांच्या रागात बेभान होऊन गाडी हाकण्याचं - मृत्यू हे मोठं प्रतीक ! मी ज्या अंतर्जगात वावरतो त्याच्या सूक्ष्म सत्तेपुढं यासाठी उठण्याचीही गरज नाही..' म्हणत आजोबांनी दोन्ही चपलांकडं टक लावून पाहिलं. नजरेबरोबर पहिली, नंतर दुसरी शेजारी समांतर लागली.

'लक्षात ठेव हं, मी कुणी गारुडी नव्हे. याचंही शास्त्र आहे. ते स्वतंत्रपणे चालतं. गेल्या शतकापर्यंत याचा प्रयोग करून दाखवणारे तपश्चर्येचे लोक होते. आजही आहेत. पण जग इतकं उथळ आहे. आधीच प्रयत्नवाद - उद्धार - यांऐवजी सारा पैसा स्वार्थ नि चैनींकडं लागला आहे. असला माणूस या जगाला कुणी सापडलाच तर त्याला अस्वलासारखं हिंडवून, त्याच्यावरसुद्धा पैसे कमवतील. तपश्चर्या नाही करणार कुणी ! माणसाच्या ठिकाणी तादात्म्यानं सृष्टिकर्त्या देवाइतकं सामर्थ्य कृपेनं येऊ शकतं एवढंच...!'

कुमार परतपरत डोळे चोळून आपण सावध आहोत ना पाहात होता.

'कुमार, मला तुझ्याकडून लौकिक अर्थानं काहीही नको आहे. मी आहे असा कुठंही, कितीही, कसाही राहू शकेन. तुझा आधीचा प्रश्न. वडिलांनी जे चांगलं केलं, जितपत माणुसकी दाखवली तिच्यापोटी मी त्यांच्या शेवटच्या क्षणी कानांत 'क्षमा,क्षमा,क्षमा, क्षमा' पुटपुटून गेलो. तुझ्या आईचा भोग अजून संपला नव्हता. येता आलं नाही. तुझीही वेळ

अजून आली नव्हती. ती आज आली म्हणून आलो. आईच्या साऱ्या सोसण्याचं फळ तिला आता तरी निश्चिंत जीवन देऊन, तू यापुढं ती असेल तोपर्यंत देशील ?'

'देईन आजोबा. मी आधी माणूस होण्यासाठी धडपडेन. शब्दन्‌शब्द लक्षात ठेवीन. अंमल करीन. पुढं शिकणं हा विषय संपला. पण नोकरी मिळेपर्यंत तरी मला आईच्या आधारावरच राहावं लागेल...' आता कुमार जमिनीवर आला होता.

आईच्या डोळ्यांत अश्रू आले. 'अरे, तू मला भार का आहेस, अजून माझी नोकरी चालू आहे. नुसता एवढा चांगला वागलास तरी मला मरेपर्यंत कसलीही अपेक्षा वाटणार नाही..'

आजोबा म्हणाले, 'दुसऱ्यांच्या कष्टांची जाणीव बाळगणं, जगण्यासाठी आणि इतरांसाठी स्वतः सतत कष्टांत, झिजत राहाणं, क्षमेनं अंतःकरण भरलेलं असणं, नम्रतेनं राहणं, बोलणं, सहानुभूतीनंच सर्व प्राणिमात्रांशी वागणं - विचार करीत जा. सारं शक्य आहे. पण त्यासाठीही सतत कृपा हवी. त्यासाठी देवाचं स्मरण ठेव, नाम घे. तुला जे जमेल ते कर. याच मार्गानं पशुत्व ओलांडता येतं. माणूस होता येतं. इतकंच काय मनुष्यत्व ओलांडून देवत्वात जाता येतं. सगळं जग उलट्या मार्गानं गेलं तरी ज्यांनी सन्मार्ग सोडला नाही, देव सोडला नाही तेच जगाचं कल्याण करून नाव अमर करून गेले. असल्या फसव्या, विकारी, स्वार्थी माणसांच्या हजारो पिढ्या गेल्या त्यांचं काय राहिलं...'

'आणखी एक सांगतो. दोन वर्षं गॅप गेली. तू प्रेशर नाही राहिलास तर नोकरीचं अवघड. पण त्याची काळजी तू करू नकोस. तू फक्त हा निर्धार ठेव. नोकरीची व्यवस्था माझ्याकडनं, इतकंच नव्हे कुमार एक वर्षानं मुलगी येईल तिच्याशीच लग्न कर. आईचा भार हलका कर...' आजोबांच्या प्रत्येक

शब्दाला ब्रह्मलिखिताइतकं वजन आहे, याची कुमारला जरासुद्धा शंका राहिली नाही. हे कसं नि काय होईल, हे विचारावं असंही त्याला वाटलं नाही. फक्त एक श्रद्धा. जी जागृत झाली होती. ती इकडचं विश्व तिकडं करू शकत होती.

आता मात्र त्याला राहावेना. आजोबांच्या पाया पडून तो आईजवळ गेला. आयुष्यात प्रथम सुखदुःखानं तिच्याजवळ हमसून हमसून रडत होता. 'आई, क्षमा कर. आजोबांचा शब्द मला देवाचा शब्द आहे. मी पाळीन. तू काळजी करू नको...'

'चला, सगळे आता शांत रहा. आज आता हा केवढा आनंद या हॉलमध्ये, घरात भरून राहिला आहे...आता मी जरा ध्यानाला बसतो. थोड्या वेळात मला निघायचं आहे.'

आई-मुलगा रडवेले होते. पण आधी आजोबांचं ऐकायचं होतं. आई शांतपणे आत स्वयंपाकाला गेली. इतक्यात दारावरची बेल वाजली. कुमारनं दार उघडलं. शेजारचे काका होते. त्यांनी आत डोकावून कुमारला घरी बोलावून घेतलं. ते आत डोकावले तेव्हा त्यांना एखाद्या ऋषितुल्य माणसाचा पुतळा केला आहे, असं वाटलं. पण ते लगेच काही बोलले नाहीत.

कुमार परतला. त्यानं दार लावलं. तो आजोबांसमोर मांडी घालून शांत बसला. डोळ्यांत पाणी होतं. शेजारच्या काकांच्या ओळखीच्या कंपनीच्या मालकांनी त्याला बोलावल्याचा आणि नोकरीत इंटरेस्टेड आहेस का, असं विचारण्यासाठी निरोप दिला होता. कुमारला बारा वाजता यायलाही सांगितलं होतं. त्याला होय म्हणून, त्यांचे आभार मानूनच तो आला होता. त्यानं आईकडं जाऊन हे सारं थोडक्यात सांगितलं.

अर्ध्या तासानं आजोबा ध्यानातून उठले. 'आनंदी बाळा, आता

मला जावं लागेल...' कुमारकडं वळून ते म्हणाले, 'एक काम झालं ना ? आता इमानानं, कष्टानं काम कर, मी त्यांना शब्द दिला आहे...पुढं एक वर्षानं शेजारचेच काका तुझ्या आईजवळ तुझ्यासाठी मुलगी सुचवतील. ती मीच पाठवलेली आहे. लग्न ठरवा. करा. आता माणुसकीची पहाट उगवली आहे. संध्याकाळ देवत्वाची करायच्या निर्धारानं वाटचाल करा...तुमच्या माणुसकीच्या या दिंडीतसुद्धा तुम्हाला हेच ध्येय चालणारे वारकरी भेटतील. सावध राहून प्रतीक्षा करा. आधी माणसं जोडत जा. सोबत आणि बळ तुम्हालाही मिळेल आणि त्यांनाही मिळेल...माणुसकीचा आनंद असाच मिळवा....वाटा... आज श्रद्धेची झालेली पहाट विसरू नका...!'

आनंदीबाईंना आजोबांना काय द्यावं काही सुचेना. काय खातील न खातील. 'तुझे बाबा देवाला नैवेद्य ठेवीत तेवढी चिमूटभर साखर घेईन. पुढच्या वर्षी याच दिवशी लग्नाला मी हजर असेन !' कुमारच्या पाठीवर हात थोपटून ते दरवाजातून बाहेर पडले, ते कधी जिने उतरून गेले ते कळलेच नाही. त्यांच्या ठिकाणी काही विलक्षणता होती. शेजारच्या काकांना मगाशी कोपऱ्यात ठेवलेला तेजस्वी पुतळा, त्यांच्या डोळ्यांसमोर जिना उतरताना बघून, ते गॅलरीत थक्क होऊन थांबले होते.

दुपारी कुमार मुलाखतीला गेला. तो हजर होऊनच आला. 'एक बाबाकी कल सपने में मुझे आज्ञा थी की तुम्हे नौकरी में रखो. तुम्हारा कल्याण होगा. मैं तुम्हारे पिता को जानता था, लेकिन दिव्य पुरुष कौन थे मालूम नहीं आप यहाँ जरूर जॉइन हो जाइए. कोई दिक्कत हो तो मुझे मिलना...!'

एकदा माणुसकीची सकाळ उजाडली की, साऱ्या दिशा किती स्वच्छ, सरळ, आनंदी असतात. कुमारला पुढचा अनुभव येणार ही खात्री होताच, आजोबांचं ओझरतं दर्शन झाल्यावर थक्क झालेले शेजारचे काका कुमारच्या घरी आले. प्रथमच कुमारनं त्यांना अदबीनं, आपुलकीनं या-बसा

म्हटलं. आईला त्यांना काही चहापाणी देशील का विचारलं. काकांनी कुतुहलानं विचारलं, 'हे कोण?'

'हे आईचे आजोबा, माझे पणजोबा, हिमालयात असतात. आमचं भाग्य आज कुठं उदयाला आलं, कुणास ठाऊक. त्यांचं सारं अतर्क्य आहे. सामर्थ्यसुद्धा. माझ्या आयुष्याची दिशाच ते एका सकाळी बदलून टाकून गेलेसुद्धा. काका, आजवर माझ्यापासून तुम्हाला काही त्रास झाला त्याबद्दल क्षमा करा. यापुढं कधीही मला हक्कानं चूक दाखवा..!'

शेजारचे काका याच घरात ही वाक्यं आपण ऐकतो आहोत का - यासाठी पुन्हापुन्हा त्याच्याकडं, हॉलकडं, स्वतःकडं पाहात होते.

'खरंच आहे काका. सिन्सिअरली !'

'अरे, तुझं कौतुकच आहे. पण आमचं केवढं भाग्य की हा महापुरुष इथं प्रत्यक्ष पाहिला...छेः छेः मी कल्पनाच करू शकत नाही. मला इतका आनंद आतून होतो आहे. सांगणं अवघड आहे...'

'काका, खरं आहे. आमचा अजूनही विश्वास बसत नाही. पण आईनं त्यांना लहानपणी वीस वर्षं पाहिलं आहे. ते या मार्गात कुठल्या कुठं जातील, हे अनेक जण म्हणत. पण ते गेल्यानंतर आज आमचं घर सावरायला ऐन वेळी आले.'

संध्याकाळी वेळ झाल्यावर शेजारचे काका कंपनी मालकांना भेटले. स्वप्न विचारलं. वर्णन विचारलं. मग सांगितलं, 'ते आज इथं तीन-चार तास येऊन गेले.' मालक हळहळले. कुठं, कधी भेटतील का ? काकांनी मोघम पुन्हा एकदा येणार आहेत तेव्हा सांगतो, म्हणून आश्वासन दिलं. सर्व खात्री परत झाली.

शेजारचे काका सारं ऐकूनच देवाच्या पंथाला लागले. ते म्हणाले, 'मीसुद्धा जर या बाबतीत देवाचं एक माध्यम बनू शकत असेन आणि तुझ्या

विवाहात होणार असेन तर त्याला मलाच आता पात्र बनलं पाहिजे. या कृपेबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे.' वर्ष व्हायच्या आधीच पंधरा दिवस त्यांच्या ओळखीच्या गृहस्थांचा फोन आला. 'मुलीसाठी प्रयत्न...' एवढं ऐकल्यावर शेजारच्या काकांना देव प्रसन्न झाल्याचा आनंद झाला. आता वाट होती फक्त पुन्हा एकदा त्या दिवशी अवचित दर्शनाची. कधी, कुठं, कसं कळवणार? कुमार पूर्ण श्रद्धेनं म्हणाला, 'त्याची त्यांना गरज नाही. आपण सर्व निश्चिंत राहून वाट पाहू ! माझ्या आयुष्यात त्यांनी माणुसकीचं भान दिलं, देवत्वाची जाणीव दिली. ती श्रद्धेची पहाट कायमचीच स्मरणात राहणार. त्यांनी एक पहाट घडवून आणली म्हणून हा दिवस, हे विचार, हे स्वास्थ्य...सारं अनुभवतो आहोत... जे अशी श्रद्धेची पहाट घडवून आणतात ते तो आनंदाचा दिवस पहायला अचूक येणार..येणार..!'

कुमार साऱ्यांच्या मनातली खात्री बोलत होता. त्यानं भावी पत्नीला तो क्षण चुकवू नको, एवढंही सांगितलं होतं. शेजारचे काका, कंपनीचे मालक दर्शनाच्या इच्छेनं जागा धरून मांडवात बसले होते. लग्न लागताच झपाट्यानं गर्दीत कुणालाही स्पर्शसुद्धा न होता ते थेट कुमारजवळ पोचले.

'आशीर्वाद. तुझ्या हाती देव दिला आहे. तो तुला सांभाळील आणि तू इतरांना सांभाळ...'

शेजारच्या काकांना नि मालकांना धन्यधन्य झालं. गर्दीला काही कल्पनाही नव्हती. सारे आपापल्या कामांत, भेटीगाठीत गुंतलेले होते. गर्दीतून झपाझप वाट काढीत डोळ्यांना दिसत नाहीशा झालेल्या पण अंतःकरणात खोल खोल ठसत चाललेल्या आजोबांकडं कुमार, पत्नी, आनंदीबाई, शेजारी आणि कंपनीचे मालक पाहात होते.

पाहातच होते....श्रद्धेची पहाट, माणुसकीची सकाळ आणि देवत्वाची वाटचाल...!

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद



..आता माणुसकीची पहाट उगवली आहे. संध्याकाळ देवत्वाची करायच्या निर्धारानं वाटचाल करा..तुमच्या माणुसकीच्या या दिंडीतसुद्धा तुम्हाला हेच ध्येय चालणारे वारकरी भेटतील.सावध राहून प्रतीक्षा करा. आधी माणसं जोडत जा. सोबत आणि बळ तुम्हालाही मिळेल आणि त्यांनाही मिळेल..माणुसकीचा आनंद असाच मिळवा..वाटा..आज श्रद्धेची झालेली पहाट विसरू नका..!